CMYK



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT


सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित  सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, २ एप्रिल २०२५। युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक १४४ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

आजचा सामना
रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु वि. गुजरात टायटन्स
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरु



मानवामानवांमध्ये खराखुरा बंधुभाव उत्पन्न होईल अशा तत्त्वज्ञानाचे आणि व्यवहाराचे अवलंबन केले जाण्याची खरी गरज आहे. 'हे विश्वचि माझे घर' अशी ज्यांची मती बनली आहे, तेच खरे तर विश्वशांतीचा प्रचार करू शकतात. भारतमातेच्या सुपुत्रांनी या सत्याचा साक्षात्कार प्रत्यक्ष अनुभवलेला आहे. इतकेच नव्हे तर तो आत्मसात करून वैज्ञानिक सिद्धान्ताच्या रूपात आपल्यासमोर मांडलाही आहे. प्रत्यक्ष प्रयोग आणि त्याची अनुभूती याच्या आधारे त्यांनी तो सिद्धही केला आहे. समाजाचा स्वाभिमान जागृत करणे, तो सुरक्षित ठेवणे, त्या समाजाला स्वतंत्र आणि श्रेष्ठ बनवणे हेच आपले काम आहे.

**- द्वितीय सरसंघचालक श्रीगुरुजी**

# तेलगू देसम करणार वक्फ विधेयकाच्या बाजूने मतदान

- जदयुनेही दिला सायंकाळी पाठिंबा
- भाजपाने जारी केला व्हीप
- आज लोकसभेत होणार सादर

**◆ नवी दिल्ली, १ एप्रिल**

संपूर्ण देशाचे लक्ष लागलेले वक्फ दुरुस्ती विधेयक बुधवारी लोकसभेत सादर केले जाणार आहे. हे विधेयक याच दिवशी पारित करून घेण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. वक्फ दुरुस्ती विधेयकाला पाठिंबा देण्याचा निर्णय मोदी सरकारचा मित्रपक्ष असलेल्या तेलगू देसम आणि जनता दल संयुक्तने घेतला आहे. यामुळे हे विधेयक लोकसभेत पारित होण्याची केवळ औपचारिकता राहिली असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

वक्फ दुरुस्ती विधेयक उद्या सभागृहात सादर होणार असल्यामुळे भाजपाने सभागृहात उपस्थित राहण्याबाबतचा तीन ओळींचा पक्षादेश (व्हीप) जारी केला आहे. आपल्या मित्रपक्षांनीही असा व्हीप जारी करण्याची सूचना भाजपाने केली आहे.

वक्फ दुरुस्ती विधेयकावर तेलगू देसमने सूचवलेल्या तीन सुधारणा मान्य करण्यात आल्यामुळे तसेच त्याचा सुधारित विधेयकात समावेश करण्यात आल्यामुळे तेलगू देसमने मतदानाच्या वेळी या विधेयकाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे, असे समजते.

जदयुने या विधेयकाला सूचवलेल्या काही दुरुस्त्याही सरकारने मान्य केल्या आहेत, त्यामुळे जदयूही या विधेयकाला पाठिंबा देण्याची शक्यता आहे. सुरुवातीला चिराग पासवान यांचा लोकजनशक्ती पक्षही या विधेयकाच्या विरोधात होता. आता मात्र त्याने विधेयकाला पाठिंबा देण्याची भूमिका घेतली आहे. दुपारपर्यंत जदयूच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, त्यांनी पाठिंबा दिला. किरेन रिजिजू हे विधेयक दुपारी १२ वाजता लोकसभेत सादर करतील.

### ४४ पैकी १४ दुरुस्त्या केल्या समितीने मान्य

जगदंबिका पाल यांच्या नेतृत्वातील संयुक्त सांसदीय समितीच्या बैठकीत या विधेयकावर ४४ दुरुस्त्या सूचवण्यात आल्या. यापैकी १४ दुरुस्त्या समितीने मान्य केल्या. त्यानुसार सुधारित वक्फ दुरुस्ती विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने नुकतीच मान्यता दिली आहे.

**कामकाज सल्लागार समितीतून विरोधकांचा सभात्याग**

वक्फ विधेयकावर झालेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीतून आज काही विरोधी पक्षांनी सभात्याग केला. लोकसभेच्या कामकाज सल्लागार समितीची बैठक आज लोकसभचे सभापती ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली झाली. विधेयकावर किमान १२ तास चर्चा करण्याची विरोधकांची मागणी होती. ती मान्य न झाल्याने विरोधी पक्षांनी सभात्याग केला. नंतर आठ तास या विधेयकावर चर्चा करण्यावर सहमती झाली.

**लोकशाही पद्धतीने विरोध करणार : काँग्रेस**

वक्फ दुरुस्ती विधेयकाला विरोध करण्याची भूमिका काँग्रेस आणि अन्य काही विरोधी पक्षांनी घेतली आहे. सरकारतर्फे उद्या बुधवारी लोकसभेत हे विधेयक मांडले जाणार आहे. काँग्रेस, द्रमूक, डावे पक्ष, शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष, राजद, आप आदमी पक्ष यासह काही विरोधी पक्ष या विधेयकाला विरोध करणार असल्याचे समजते. *(तभा वृत्तसेवा)*

# रिझर्व्ह बँक भारताच्या आर्थिक स्थैर्याचा आधारस्तंभ : राष्ट्रपती



भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९० वा स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**◆ मुंबई, १ एप्रिल**

भारत २०४७ मध्ये 'विकसित भारत' होण्याच्या दिशेने पुढे जात असताना, अर्थव्यवस्थेतील नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नाविन्यपूर्ण आणि समावेशक वित्तीय प्रणाली आवश्यक आहे. भारतीय रिझर्व्ह बँक भारताच्या आर्थिक स्थैर्याचा आधारस्तंभ राहणार आहे. मजबूत बँकिंग प्रणाली, वित्तीय नवउपक्रम आणि ग्राहकांचा विश्वस कायम राखण्याच्या दृष्टीने याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असेल, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंगळवारी येथे केले.

एनसीपीए नरिमन पॉईंट येथे आयोजित रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ९० व्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमात मुर्मू बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन्, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा उपस्थित होते.

द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ९० व्या वर्धापन दिनाचा उत्सव आज साजरा करीत आहोत. रिझर्व्ह बँक या प्रतिष्ठित संस्थेच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर ही देशातील सर्वांत महत्त्वाच्या संस्थांपैकी एक आहे. देशाची केंद्रीय बँक म्हणून रिझर्व्ह बँक भारताच्या अद्वितीय विकास प्रवासाच्या केंद्रस्थानी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील खडतर स्थितीपासून ते आजच्या जागतिक महासत्तेपर्यंतच्या प्रवासात आरबीआय हा महत्त्वाचा आधारस्तंभ राहिला आहे. १९३५ मध्ये स्थापन झालेली ही संस्था नेहमीच देशाच्या विकासाच्या प्रवासापेक्षा एक पाऊल पुढे राहिली असून, या प्रवासात देशाचे नेतृत्वही केले असल्याचे मुर्मू म्हणाल्या.

आरबीआय केवळ केंद्रीय बँक नसून वित्तीय समावेशन व संस्थात्मक उभारणीमध्येही महत्त्वाची भूमिका बजावत आहे. संस्थात्मक बांधणीच्या दृष्टिकोनातून आरबीआयने नाबार्ड, आयडीबीआय, सिडबी आणि नॅशनल हाऊसिंग बँक यांसारख्या महत्त्वपूर्ण वित्तीय संस्था स्थापन केल्या आहेत, ज्या शेती, लघु व्यवसाय आणि गृहनिर्माण क्षेत्रासाठी महत्त्वाचा पाठिंबा देतात, असे मुर्मू म्हणाल्या.

डिजिटल व्यवहारांत देशाला जागतिक नेतृत्व मिळवून देण्यात वाटा भारताला डिजिटल व्यवहारांमध्ये जागतिक नेतृत्व मिळवून देण्यात आरबीआयचा मोठा वाटा आहे. युपीआय सारख्या नाविन्यपूर्ण प्रणालींमुळे आर्थिक व्यवहार सहज, सुरक्षित आणि किफायतशीर झाले आहेत. याशिवाय, आरबीआयने एक संपन्न वित्तीय-तंत्रज्ञान पर्यावरण निर्माण करण्यासही मदत केली आहे, असे द्रौपदी मुर्मू यांनी सांगितले. *(तभा वृत्तसेवा)*

# सुरक्षित आरोग्यासाठी १८१० महिलांनी केले कुटुंबनियोजन

### वाशीम जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी

**◆ वाशीम, १ एप्रिल**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. रामहरी बेले यांच्या कुशल नेतृत्वाखाली जिल्ह्यात एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत एकूण १८१० स्त्रियांच्या कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्या. हा उपक्रम जिल्हा आरोग्य विभागाच्या प्रभावी योजना अंमलबजावणीचे प्रतीक असून महिला आरोग्य आणि कुटुंब कल्याणाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

महिला सशक्तीकरण व आरोग्याच्या दृष्टीने जिल्हा आरोग्य विभाग सतत विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करीत आहे. या शस्त्रक्रिया महिलांच्या सुरक्षित आणि निरोगी भविष्यासाठी महत्त्वपूर्ण ठरल्या आहेत. आरोग्य विभागाच्या सहकार्याने स्थानिक रुग्णालये व आरोग्य केंद्रांमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली या शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हा आरोग्य विभागाने प्रभावी जनजागृती मोहिमा राबवून महिलांना कुटुंबनियोजनाचे महत्त्व पटवून दिले तसेच आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या मोहिमेंतर्गत महिलांना मोफत वैद्यकीय तपासणी, समुपदेशन आणि शस्त्रक्रियेनंतरच्या काळजीविषयी मार्गदर्शनदेखील करण्यात आले.

या यशामध्ये आरोग्य विभागातील अधिकारी, डॉक्टर, परिचारिका, आरोग्य सेवक तसेच आशा कार्यकर्त्यांचे मोठे योगदान आहे. विशेषतः डॉक्टर रामहरी बेले यांनी आपल्या कौशल्यपूर्ण शस्त्रक्रियांच्या माध्यमातून महिलांना सुरक्षित व यशस्वी आरोग्यसेवा प्रदान केल्या आहेत. त्यांनी परिश्रम घेत महिलांपर्यंत ही सुविधा पोहोचवली आणि कुटुंबनियोजन कार्यक्रम प्रभावीपणे राबविला. *(तभा वृत्तसेवा)*

## ट्रम्पच्या टेरिफने धास्तावला शेअर बाजार

**मुंबई** : मागील सत्रात थोड्या वाढीनंतर आता भारतीय बाजार पुन्हा कोसळला. मंगळवारी निफ्टी आणि निर्देशांकात मोठी पडझड झाली. अमेरिकी टेरिफची घोषणा एक दिवसावर येऊन ठेपल्याच्या धास्तीने निर्देशांकात तब्बल १४०० अंकांची मोठी घसरण झाली. दिवसअखेर निर्देशांक १,३९० अंकांनी घसरून ७६,०२४ वर बंद झाला तर निफ्टी ३५३ अंकांनी खाली येत २३,१६५ वर बंद झाला. बाजारातील मोठ्या घसरणीने गुंतवणूकदारांचे लाखो कोटी रुपयांचे नुकसान झाले.

# प्रशांत कोरटकरचा जामीन अर्ज फेटाळला

**कोल्हापूर, १ एप्रिल**

कोल्हापुरातील इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकी दिल्याप्रकरणी आणि छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अवमानकारक विधान केल्याप्रकरणी प्रशांत कोरटकरला अटक करण्यात आली आहे. दरम्यान ५ दिवसांच्या पोलिस कोठडीनंतर आता कोल्हापूर कोर्टाने प्रशांत कोरटकरला न्यायालयीन कोठडी सुनावलेली आहे. त्यानंतर कोरटकरच्या वकिलांनी जामिनासाठी अर्ज दाखल केला आहे. त्यावर आज न्यायालयात सुनावणी पार पडली.



प्रशांत कोरटकरचा जामीन अर्ज कोल्हापूर न्यायालयाने फेटाळला आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याप्रकरणी प्रशांत कोरटकरला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. यानंतर प्रशांत कोरटकरने जामिनासाठी कोल्हापूर न्यायालयाकडे अर्ज केला होता. परंतु, न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे.

आम्ही तपासामध्ये वारंवार सहकार्य करू, असे प्रशांत कोरटकरच्या वकिलाने युक्तीवाद करताना म्हटले. तर आरोपीला जामीन दिल्यास तो फरार होऊ शकतो, असा युक्तीवाद सरकारी वकिलांनी केला. गुन्हा दाखल झाल्यापासून आरोपी हा एक महिना फरार होता. त्यामुळे आरोपीला जामीन देण्यात येऊ नये, असेही सरकारी वकिलांनी म्हटले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर कोल्हापूर न्यायालयाने प्रशांत कोरटकरचा जामीन अर्ज फेटाळला. यामुळे कोल्हापूर पोलिसांना या प्रकरणात तपासासाठी आणखी वेळ मिळणार आहे.



राजधानी दिल्लीतील हैदराबाद हाऊसमध्ये मंगळवारी झालेल्या बैठकीपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी व चिलीचे राष्ट्राध्यक्ष गॅब्रिएल बोरिक फॉण्ट यांचे टिपलेले छायाचित्र.

## जीएसटी संकलन १.९६ लाख कोटींवर

*नवी दिल्ली, १ एप्रिल*

मार्च महिन्यात वस्तू व सेवा कर अर्थात् जीएसटी संकलन ९.९ टक्क्यांनी वाढून १.९६ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त झाले आहे. अर्थ मंत्रालयाने मंगळवारी यासंदर्भात आकडेवारी जारी केली आहे.

२०२४-२५ च्या शेवटच्या महिन्यात जीएसटी संकलनाने विक्रम केला आहे. जीएसटीतील संकलनात सीजीएसटीचा वाटा ३८,१०० कोटी, तर एसजीएसटीचा वाटा ४९,९०० कोटी आणि एकात्मिक महसूल अर्थात् आयजीएसटीतून ९५,९०० कोटी रुपये सरकारच्या तिजोरीत जमा झाले. मार्च २०२४ च्या तुलनेत जीएसटी संकलनातून मिळणाऱ्या महसुलात ९.९ टक्क्यांनी वाढ होऊन ते १.९६ लाख कोटींवर पोहोचले आहे. मागील वर्षीच्या तुलनेत जीएसटी संकलनात झालेली वाढ आर्थिक स्थिरतेसह कंपन्यांनी नियमांनुसार कर भरल्याचे दर्शवते. २०२४-२५ या आर्थिक वर्षांत जीएसटी संकलन २२.०८ लाख कोटी रुपये झाले आहे.

# गुजरातच्या फटाका कारखान्यात स्फोट; २० कामगार ठार

**अहमदाबाद, १ एप्रिल**

गुजरातच्या बनासकांठा जिल्ह्यातील डीसा एमआयडीसीमध्ये मंगळवारी फटाका कारखान्यात बॉयलरचा स्फोट होऊन इमारतीचे छत कोसळले. या भीषण स्फोटात २० कामगारांचा मृत्यू झाला, तर २२ जण ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. त्यांना बाहेर काढण्यासाठी बचाव पथकाकडून युद्धपातळीवर काम सुरू आहे.

या घटनेत सहा जण जखमी आहेत. स्फोटानंतर जवळच असलेल्या गोदामाला लागलेल्या आगीत अनेक जण होरपळल्याची माहिती आहे. डीसा ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विजय चौधरी यांनी सांगितले की, मंगळवारी सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास फटाका कारखान्यातील बॉयलरचा स्फोट झाला. यानंतर कारखान्याचे छत कोसळले आणि फटाके ठेवलेल्या गोदामाला आग लागली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे पथक घटनास्थळी पोहोचले. त्यांनी छताच्या ढिगाऱ्याखालून १७ कामगारांचे मृतदेह बाहेर काढले तसेच गोदामाला लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळविले. मलब्याखाली अडकलेल्या कामगारांना बाहेर काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. स्फोटानंतर भिंती आणि छत कोसळल्याने अनेक कामगार ढिगाऱ्याखाली अडकले असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. मृत्युमुखी पडलेले सर्व मजूर मध्यप्रदेशातील रहिवासी होते.

**मानवी अवयव दूरवर विखुरले**

पोलिस अधीक्षक नेहा पांचाळ म्हणाल्या की, अचानक झालेल्या स्फोटामुळे कामगारांना पळ काढण्याची संधीही मिळाली नाही. स्फोट इतका भीषण होता की अनेक कामगारांच्या शरीराचे अवयव दूरवर विखुरले गेले. कारखान्याच्या मागे असलेल्या शेतात काही मानवी अवयवही सापडले आहेत.

## भारतावर जशास तसा कर आकारण्याची वेळ

**न्यू यॉर्क, १ एप्रिल**

भारत अमेरिकी कृषी उत्पादनांवर १०० टक्के कर लादतो आणि इतर देशांकडून आकारल्या जाणाऱ्या उच्च करांमुळे त्या देशांना निर्यात करणे अमेरिकेला जवळपास अशक्य झाले, असे व्हाईट हाऊसने म्हटले आहे.

भारत आणि इतर देशांनी अमेरिकन वस्तूंवर लादलेल्या उच्च करांबाबत राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वारंवार टीका केली आहे. २ एप्रिल रोजी परस्पर कर लागू करण्याची त्यांची योजना आहे. तो अमेरिकेसाठी 'मुक्ती दिन' असेल, असे त्यांचे म्हणणे आहे. दुर्दैवाने हे देश दीर्घ काळापासून आपल्या देशाला फसवत आहेत आणि त्यांनी अमेरिकन कामगारांबद्दलचा त्यांचा तिरस्कार दाखवून दिला आहे, असे व्हाईट हाऊसच्या माध्यम सचिव कॅरोलिस लेविट यांनी सोमवारी सांगितले. तर आमच्याकडे दुग्धजन्य पदार्थांवर युरोपियन युनियनकडून ५० टक्के, अमेरिकी तांदळावर जपानकडून ७०० टक्के शुल्क आकारले जाते.

# वक्फ विधेयकावर कुणाचे समर्थन, कुणाचा विरोध!

**◆ नवी दिल्ली, १ एप्रिल**

संसदेच्या चालू अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात मोदी सरकार वक्फ सुधारणा विधेयक आणण्याच्या तयारीत आहे. हे विधेयक बुधवारी लोकसभेत मांडले जाणार आहे. हे विधेयक भाजपासाठी अत्यंत महत्त्वाचे असून, विरोधक ते रोखून धरण्याचा प्रयत्न करतील.

यापूर्वी, संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक कल्याण मंत्री किरेन रिजिजू यांनी ८ ऑगस्ट २०२४ रोजी हे विधेयक लोकसभेत सादर केले होते. तेव्हा या विरोधकावरून जोरदार गदारोळ झाला होता. यानंतर, हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवण्यात आले होते. जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखालील जेपीसीच्या अहवालानंतर, या सुधारित विधेयकाला मंत्रिमंडळाने आधीच मंजुरी ही दिली आहे. मात्र, असे असले तरी, हे विधेयक संसदेत आल्यानंतर, मंजूर करणे सरकारसाठी कमी आव्हानात्मक नसेल.



### अशी आहे लोकसभा, राज्यसभेतील स्थिती

### असे आहे संसदेतील गणित

लोकसभेतील गणिताचा विचार करता, लोकसभेतील सध्याची सदस्य संख्या ५४२ एवढी आहे आणि भाजपा २४० सदस्यांसह सर्वांत मोठा पक्ष आहे. भाजपाच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडे २९३ सदस्य आहेत. ही संख्या, विधेयक मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या २७२ या जादूई आकड्याच्या तुलनेत अधिक आहे. मात्र, यावर जदयू आणि तेदेपाची भूमिका महत्त्वपूर्ण राहील. विरोधकांचा विचार करता, काँग्रेसचे ९९ सदस्य आहेत. इंडिया ब्लॉकचा विचार करता, या आघाडीतील पक्षांची एकूण संख्या केवळ २३३ पर्यंत जाते. याशिवाय, आझाद समाज पक्षाचे वकील चंद्रशेखर, शिरोमणी अकाली दलाच्या हरसिमरत कौर बादल हे असे खासदार आहेत ज्यांचे पक्ष इंडिया आघाडीसोबत नाहीत. याशिवाय काही अपक्ष खासदारही आहेत.

### राज्यसभेतील स्थिती

राज्यसभेचा विचार करता, सध्या राज्यसभेत एकूण २३६ सदस्य आहेत. यात, भाजपचे ९८, तर रालोआचा विचार करता, जवळपास ११५ सदस्य आहेत. यात, सहा नामनिर्देशित सदस्य जोडले, तर रालोआची संख्या १२१ वर पोहोचते. कारण, नामनिर्देशित सदस्य हे साधारणपणे सरकारच्या बाजूनेच मतदान करतात. ही संख्या, विधेयक मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या ११९ सदस्य संख्येपेक्षा दोनने अधिक आहे. राज्यसभेत इंडिया आघाडीतील काँग्रेसचे २७, तर इतर सर्व पक्षांचे ५८ असे एकूण विरोधी पक्षाचे ८५ खासदार आहेत. याशिवाय, वायएसआर काँग्रेसचे नऊ, बीजेडीचे सात आणि एआयएडीएमकेचे चार सदस्य आहेत. लहान पक्ष आणि अपक्षांसह, तीन सदस्य आहेत. *(वृत्तसंस्था)*

### अशी आहे सरकारची भूमिका

या विधेयकासंदर्भात सत्ताधारी पक्षाचे म्हणणे आहे की, वक्फ सुधारणा विधेयकाच्या माध्यमाने त्यांच्या मालमत्तेशी संबंधित वाद मिटवण्याचा अधिकार मिळेल. वक्फ मालमत्तेचा वापर योग्य पद्धतीने होईल. याशिवाय, मुस्लिम समुदायाच्या महिलांनाही मदत होईल. भाजपा खासदार जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखालील जेपीसीने रालोआ घटक पक्षांनी सादर केलेल्या १४ सुधारणांसह संसदेत आपला अहवाल सादर केला होता. तसेच, विरोधकांनी सुचवलेल्या ४४ सुधारणा जेपीसीने फेटाळल्या आहेत.

### वक्फ विधेयकावरील प्रमुख आक्षेप?

- कुठल्याही वक्फ मालमत्तेच्या वादासंदर्भातील निर्णयाविरोधात आता उच्च न्यायालयात जाता येणार. यापूर्वी वक्फ लवादाचा निर्णय अंतिम मानला जात असे.
- आता दान करण्यात आलेल्या मालमत्तेशिवाय, कुठल्याही मालमत्तेवर वक्फला आपला अधिकार सांगता येणार नाही. मात्र, यापूर्वी, कोणतीही मालमत्ता केवळ दाव्याने वक्फची मालमत्ता होत होती.
- वक्फ बोर्डात महिला आणि इतर धर्मांचे दोन सदस्य असायला हवे. यापूर्वी बोर्डावर महिला आणि इतर धर्माच्या सदस्यांना स्थान नव्हते.
- जिल्हाधिकाऱ्याला वक्फच्या संपत्तीच्या सर्वेक्षणाचा अधिकार मिळेल तसेच त्यांना मालमत्तेचे निर्धारण करण्याचा अधिकारही देण्यात आला आहे.

# सतीश भोसले प्रकरणात व्हिलन ठरवून माझ्या खूनाचा कट : धस

**बीड, १ एप्रिल**

सतीश भोसले उर्फ खोक्या प्रकरणात मला व्हिलन ठरवून माझ्या खुनाचा कट रचण्यात आला होता, असा गंभीर आरोप भारतीय जनता पक्षाचे आमदार सुरेश धस यांनी केला आहे. सतीश भोसले हा हरिणाची शिकार करून सुरेश धस यांना पुरवतो, असे बिष्णोई समाजाला सांगण्यात आले होते. तसेच माझा खून करण्यासाठी या समाजातील काही माणसांना राजस्थानवरून विमानाने मुंबईत आणण्यात आले होते. या लोकांना मला मारण्यासाठीच मुंबईत आणले असल्याचा दावा सुरेश धस यांनी केला आहे.



भारतीय जनता पक्षाचे आमदार सुरेश धस यांनी बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण उचलून धरले होते. या संपूर्ण प्रकरणात राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. यामुळेच मंत्री धनंजय मुंडे यांना देखील राजीनामा द्यावा लागला आहे. या सर्व घटनांदरम्यान सतीश भोसले उर्फ खोक्या भोसले या सुरेश धस यांच्या कार्यकर्त्यांवर देखील अनेक गंभीर आरोप करण्यात आले आहेत. सतीश भोसले हा हरिणाची शिकार करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या माध्यमातून आपल्याला जिवे मारण्याचा कट रचण्यात आला होता, असा आरोप धस यांनी केला आहे. सतीश भोसले उर्फ खोक्या याच्या माध्यमातून सुरेश धस हे हरणांचे मांस खात असल्याचे पसरवण्यात आले. त्यात राजस्थान मधून बिष्णोई समाजाची काही माणसे थेट विमानाचे तिकीट काढून मुंबईत आणण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त




### लोकमंगल कृषी महाविद्यालयात म. फुले कृषी विद्यापीठाचा स्थापना दिवस उत्साहात

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत २९ मार्च रोजी राहुरी विद्यापीठाचा स्थापना दिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी मौजे कौठाळी या गावामध्ये स्वच्छता अभियान राबवून श्रमदान केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अमोल शिंदे होते. सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रास्ताविकात विद्यार्थी दत्तप्रसाद चव्हाण याने राहुरी विद्यापीठ स्थापना, विस्तार आणि कार्यक्षेत्रबाबत जागृत केले. यावेळी दिग्विजय विधाते याने आपले विचार मांडले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे यांनी देशाच्या तथा महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीचा संशोधन क्षेत्रात सिंहाचा वाटा असल्याचे विशेष नमूद केले. डॉ. अमोल शिंदे यांनी विद्यापीठाच्या कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्तार या बाबी तसेच विद्यापीठातील विविध संशोधन आणि सद्यस्थितीला सुरू असलेले नाविन्यपूर्ण उपक्रमाबाबत विशेष माहिती दिली. प्रा. अजित कुरे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी दत्तप्रसाद चव्हाण याने केले. या कार्यक्रमास प्रा. सुजाता चौगुले, प्रा. नम्रता गोरे, प्रा. मीनाक्षी नाईकनवरे, प्रा. सुकन्या जाधव, प्रा. कल्पना मिटकरी आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.




### शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांचा मंगेश चिवटे यांच्या हस्ते सत्कार

**सोलापूर, दि.१ एप्रिल-**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांची मंगळवारी सायंकाळी यांची भेट घेण्यात आली. श्री. चिवटे यांनी शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांचा आरोग्यदूत हे पुस्तक त्यांना भेट देण्यात आले. काही शिक्षकांच्या अडचणी मुख्यमंत्र्यांच्या ऑफिस पर्यंत पोहोचल्या होत्या म्हणून काही शिक्षकांचा मनस्ताप व्यक्त केला होता, यावेळी, धावती भेट म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे जडऊ मंगेश चिवटे यांनी जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षण विभागातील सचिन जगताप यांना भेटून लवकरात लवकर शिक्षकांच्या अडचणी लवकरच मार्गी लावा, मुख्यमंत्र्यांचे ऑफिसपर्यंत कोणताच शिक्षक येऊ नये अशा ठोस सूचना दिल्या. यावेळी जिल्हा जिल्हा प्रमुख मनीष काळजे, स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे बापूसाहेब अडसूळ, सोलापूर वैद्यकीय मदत कक्षाचे सुरज जम्मा,आदी शिक्षक उपस्थित होते.

### मुंबईच्या संस्थेतर्फे ग्रामदैवत सिध्देश्वर मंदीरात आज सामुहीक गीतापाठ यज्ञ

**सोलापूर, दि.१ एप्रिल -**

**श्रीगुरुकुलम संस्थेचा स्वातंत्र्याच्या अमृतपर्वानिमित्त उपक्रम; ३०० जणांचा सहभाग**

कल्याण (मुंबई) येथील श्रीगुरुकुलम न्यास संस्थेतर्फे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतपर्वानिमित्त हुतात्म्यांच्या जन्म किंवा कर्मस्थानी सामुदायिक श्रीभगवदगीतापाठ यज्ञ (सामुहिक संपूर्ण गीता पठण) करण्याचा उपक्रम सुरू आहे. त्याअंतर्गत हुतात्मा नगरी सोलापूर येथे देऋब्रा शिक्षणोत्तेजक संस्थेच्या सहकार्याने उद्या बुधवारी दि.२ एप्रिल रोजी दुपारी तीन वाजता सोलापूरचे ग्रामदैवत सिध्देश्वर मंदीरात सामुहिक संपूर्ण गीता पठण कार्यक्रम होणार आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य स्वीकारलेल्या क्रांतीवीरांप्रती कृतज्ञता म्हणून त्यांच्या जन्मस्थानी अथवा कार्यस्थानी एकत्रितपणे श्रीभगवदगीतापाठ यज्ञ (सामुहिक संपूर्ण गीता पठण) रुजू करायचा उपक्रम कल्याण (मुंबई) येथील श्रीगुरुकुलम न्यास संस्थेतर्फे राबवण्यात येत आहे. सोलापूर शहरातील चार हुतात्म्यांनी जे शौर्य दाखवले त्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सोलापूरात हा कार्यक्रम घेत असल्याचे संस्थेच्या अध्यक्षा मंजीरी फडके यांनी सांगितले. येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या सहकार्याने तसेच मंदीर समितीच्या पाठबळावर सिध्देश्वर मंदिरात उद्या बुधवारी दि.२ एप्रिल रोजी दुपारी तीन वाजता सामुहिक संपूर्ण गीता पठण करण्यात येणार आहे. यावेळी डॉ. श्रीकांत येळेगावकर यांचे 'सोलापूरचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान' या विषयावर व्यख्यानही होणार आहे. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन राजश्री देशपांडे (कल्याण), किशोर दुधगीकर तसेच देऋब्रा संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

### कोठे यांच्या जयंतीनिमित्त विडी घरकुल येथे आज आरोग्य तपासणी शिबिर

**सोलापूर, दि. १ एप्रिल -**

स्व. विष्णुपंत कोठे मेमोरियल हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर व डॉ. कोठेज् गॅस्ट्रो लिव्हर केअर आणि जी. आय. एन्डोस्कोपी सेंटर सोलापूर यांच्या वतीने स्व. महेश कोठे यांच्या जयंती निमित्त बुधवार दि.२ एप्रिल रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत विडी घरकूल परिसरातील गरजु रुग्णांसाठी मोफत आरोग्य व औषधोपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती आयोजक डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांनी पत्रकार परिषदेत दिली. संभाजीराव शिंदे विद्या मंदीर, जुना विडी घरकूल, हैद्राबाद रोड, सोलापूर या ठिकाणी हे शिबीर होणार आहे. या शिबीरामध्ये पोटविकार तपासणी, नेत्र तपासणी, दंत व कान-नाक-घसा तपासणी, बालरोग व स्त्री रोग आदी तपासणी व मोफत औषधोपचार तसेच प्रकारच्या तपासण्या मोफत केल्या जाणार आहेत. या शिबीरामध्ये तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

# पालकमंत्री गोरे घेणार उद्या जिल्ह्यातील विविध विकासकामांचा आढावा!

## थांबलेल्या विकासाला बैठकीनंतर मिळणार का चालना?

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

दर आठवड्याला सोलापूरला भेट देवून जिल्ह्यातील विकासकामांना चालना देतो; असे जाहीरपणे बोलणारे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी अनेक दिवसानंतर आता गुरूवार, दि. ३ एप्रिल रोजी सोलापूर भेटीसाठी सवड काढली आहे. दरम्यान, शहर-जिल्ह्यात शासन स्तरावरून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, विकासकामांची गती मंदावल्याच्या तक्रारी काही जाणकार नागरिकांकडून वाढू लागल्याने ते आता या विकासकामांसाठी जिल्हा नियोजन भवन येथे आढावा बैठक घेणार आहेत. दरम्यान, त्यांच्या या आढावा बैठकीनंतर थांबलेल्या जिल्हा विकासाला चालना मिळेल का? असाही सवाल जिल्ह्यातील नागरिकांतून विचारला जात आहे.

या आढावा बैठकीमध्ये पालकमंत्री गोरे हे अरण येथील संत सावता माळी तीर्थक्षेत्र विकास, श्री बसवेश्वर महाराज स्मारक, मंगळवेढा यासह जिल्हा वार्षिक योजना निधीचा आढावाही घेणार आहेत. इतकेच नाहीतर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या १०० दिवशीय सात सुत्री कार्यक्रमातून झालेल्या कामांवरही ते धावती नजर टाकणार आहेत. सोलापुरातील होटगी रोड विमानसेवा चालू करणे आणि बोरामणी विमानतळाचा



विषयही त्यांच्या अजेंड्यावर असल्याचे सांगण्यात येते. सोलापूर महानगरपालिका प्रशासनाकडून उजनी ते सोलापूर दुहेरी जलवाहिनीचाही ते आढावा घेणार आहेत. महावितरणकडून पुरविण्यात येणारी वीज, जिल्ह्यातील उजनी व अन्य प्रकल्पातील पाणीसाठ्याचा अंदाज घेवून ते आगामी उन्हाळ्यासाठी पाणी नियोजन करणार आहेत. जिल्हा परिषदेतील उमेद मॉल जागा निश्चितीबाबतचाही विषय आणि जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचाही विषयावर ते विस्ताराने अधिकाऱ्यांसमवेत विस्ताराने चर्चा करून आढावा घेणार आहेत.

मुख्यमंत्र्यांनी पंढरीतील कॉरीडॉरचा नव्याने घेतलेला विषय, उजनी जल पर्यटन, शहरातील उड्डाणपुलांचा विषयही पालकमंत्री गोरे यांनी आता त्यांच्या अजेंड्यावर घेणे गरजेचे आहे. कारण यातील प्रलंबित पडलेल्या विविध विकासकामांचा उल्लेख फक्त निवडणुकांतूनच निघत आहे. निवडणुका पार पडल्यावर स्थानिक लोकप्रतिनिधी यावर भाष्यच करीत नसल्याची नागरिकांची खंत आहे.

यामुळे पालकमंत्री म्हणून शहर जिल्ह्यातील सर्व प्रलंबित प्रश्नांचा निपटारा गोरे यांनी करावा, अशीही मागणी स्थानिक नागरिकांची आहे.

### विमानसेवा लवकर चालू करण्यासाठी पाठपुरावा करावा

सोलापूरकरांच्या जिव्हाळ्याचा असलेला विमानसेवेचा विषय त्यांनी आता गतीने मार्गी लावावा. कारण या विमानतळावरून विमान उड्डाण करण्यासाठीच्या आवश्यक त्या सर्व परवानग्याचा पाठपुरावा जिल्हा प्रशासनाकडून आणि विमानतळ व्यवस्थापकांकडून करण्यात आला आहे. राहिलेला ७२ आसनीचा डिजीसीएचा परवानाही नुकताच मिळाला आहे. त्यामुळे विमानसेवा कशी लवकर चालू होईल, यासाठी पालकमंत्री गोरे यांनी पाठपुरावा करावा, अशी मागणी स्थानिक व्यापारी, चेंबर ऑफ कॉमर्स, सोलापूर विचार मंच सदस्यांची आहे.



# लोकप्रतिनिधींनी बनवले सोलापूरकरांना एप्रिल फूल

## संभाजी ब्रिगेडचे एप्रिल फूल आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल -**

सोलापूर शहरा चा सर्वांगिक विकास न झाल्यामुळे आणि याला लोकप्रतिनिधी व अधिकारी प्रशासन जबाबदार असल्याचा आरोप करत संभाजी ब्रिगेडच्या वतीने मंगळवारी सोलापूर शहरातील विविध समस्यांचे फलक हाती घेऊन चार हुतात्मा चौकात निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी लोकप्रतिनिधींच्या नावाने बोंब मारण्यात येऊन लक्ष द्या लक्ष द्या लोकप्रतिनिधींनी सोलापूरच्या विविध प्रश्नावर लक्ष द्या या घोषणा कार्यकर्त्यांनी दिल्या. गेल्या अनेक वर्षापासून सोलापुरातील लोकप्रतिनिधींच्या अकार्यक्षमतेमुळे सोलापूर शहराच्या म्हणावा तसा चौफेर विकास झाला नाही. प्रत्येक लोकप्रतिनिधी आपापल्या मतदारसंघापूरतेच सीमित कामे करतात. त्यामुळे सोलापूरचा विकास होण्याऐवजी सोलापूर हे एक भकास खेडेगाव बनत चाललेले आहे असा आरोपी संभाजी ब्रिगेडच्या वतीने करण्यात आला.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, संपर्कप्रमुख शत्रुघन माने, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, कार्याध्यक्ष अरविंद शेळके, वकील आघाडीचे जिल्हाध्यक्ष गणेश कदम, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मीनल दास, शहराध्यक्ष मोनाली धुमाळ, दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष सुनिता घंटे, शहर संघटक जयश्री जाधव, शहर उपाध्यक्ष मनीषा कोळी, दिलीप निंबाळकर, उमेश गायकवाड, शेखर कंटेकर, सतीश वावरे, सिद्धाराम सावळे, संतोष सुरवसे, प्रशांत देशमुख, रमेश भंडारे, गणेश सोलापुरे आदी उपस्थित होते.

# १५ मे पर्यंत उड्डाणपुलासाठी भूसंपादन पूर्ण करणार

## आ. विजयकुमार देशमुख यांनी घेतली महापालिका आयुक्तांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल -**

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची भेट घेतली. सोलापूर शहरातील दोन उड्डाणपूलाच्या कामासंदर्भात चर्चा केली. येत्या १५ मे पर्यंत उड्डाणपुलासाठी भूसंपादन करण्यात येणार आहे. त्यानंतर निविदेसह पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. आयुक्तांकडून नियमित आढावा आणि पाठपुरावा सुरू आहे. तातडीने कार्यवाही पूर्ण करण्यासाठी सूचना केली आहे, अशी माहिती भाजपचे आ. विजयकुमार देशमुख यांनी दिली.

सोलापूर शहरातील दोन्ही उड्डाणपुलाच्या भूसंपादनाचे काम पूर्ण करून पुढील प्रक्रिया तातडीने पूर्ण व्हावी यासंदर्भात आ. विजयकुमार देशमुख यांनी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. सद्यस्थितीतील कामाचा आढावा घेतला. महापालिका आयुक्तांनी झालेल्या कामाची माहिती दिली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगरचना विभागाचे उपसंचालक मनीष भिष्णूरकर , अंतर्गत लेखापरीक्षक राहुल कुलकर्णी , भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, माजी नगरसेवक अनंत जाधव, राजाभाऊ काकडे आदी उपस्थित होते.



केंद्र शासनाने सोलापुरात दोन उड्डाणपूल बांधण्याची योजना सन २०१६ मध्ये जाहीर केली होती. जुना पुना नाका ते पत्रकार भवन तसेच जुना बोरामणी नाका ते पत्रकारभवन असे दोन उड्डाणपूल शहरात होणार आहेत. यामुळे शहराच्या रहदारी व वाहतुकीमध्ये लक्षणीय सुधारणा होण्यास मदत होणार आहे. सन २०१६ मध्ये या प्रकल्पाची घोषणा झाली होती. मात्र अनेक वर्षे यासंदर्भातील कामाला गती मिळाली नव्हती. त्यामुळे हा प्रकल्प रखडला होता. प्रकल्पासाठी भूसंपादन ही अतिशय महत्त्वाची बाब आहे. गत दोन वर्षात मात्र भूसंपादनाच्या कामाला गती आली. अद्याप भूसंपादनाचीच प्रक्रिया सुरू आहे.

दरम्यान, शहरातील उड्डाणपूलांचे काम कातडीने मार्गी लावावे यासंदर्भात आयुक्तांची भेट घेतली. आवश्यक त्या सूचना केल्या. येत्या १५ मे पर्यंत भूसंपादनाचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. दर आठवड्याला या संदर्भात आढावा घेण्यात येतो, असे महापालिका आयुक्तांनी सांगितले आहे. भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून निविदा काढण्यात येणार आहे, अशी माहिती आ. विजयकुमार देशमुख यांनी पत्रकारांना दिली. जुना पुणे नाका ते पत्रकार भवन या पहिल्या टप्प्यातील प्रकल्पात एकूण १३७ मिळकती बाधित होणार आहेत. त्यापैकी १०० खाजगी तर ३७ या शासकीय निमशासकीय आहेत. यापैकी खाजगी मिळकतींच्या भूसंपादनाचे काम राज्य शासन नियुक्त व जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांमार्फत होत आहे. दरम्यान, या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात ३७ तर दुसऱ्या टप्प्यात १२ असे एकूण ४९ शासकीय- निमशासकीय जागा आहेत. या प्रकल्पाच्या कामी शासकीय- निमशासकीय भूसंपादन होणे

आवश्यक आहे. पहिल्या टप्प्यातील प्रकल्पाच्या १०० खाजगी मिळकतींपैकी केवळ ८ मिळकतींच्या निवाड्यांचे काम बाकी आहे. या भूसंपादनाची प्रक्रिया जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त स्तरावर केली जात आहे. भूसंपादनानंतर राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून उड्डाणपूल बांधण्याची निविदा काढण्यात येणार आहे.



# फॅमिली प्लॅनिंगच्या कर्मचाऱ्यांना एचपीव्ही व्हॅक्सिनेशनचे ट्रेनिंग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

बदललेली जीवनशैली, अति प्रमाणात प्लास्टिकचा वापर, रसायुक्त फवारणी करून पीकविलेले अन्नधान्य, पालेभाज्या, सीजन नसताना येणारे फळे, फळे पिकवण्यासाठी वापरले जाणारे रसायने, अतितणाव, फ्रिजमध्ये साठवून ठेवलेले अन्नपदार्थ, अन्नपदार्थ पार्सल घेऊन जाण्यासाठी वापरले जाणारे प्लास्टिकच्या पिशव्या यांचा सर्रास वापर अशा विविध कारणांमुळे दिवसेंदिवस कॅन्सरचे प्रमाण वाढताना दिसत आहे, असे प्रतिपादन छ. शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाच्या विभाग प्रमुख डॉ. विद्या तिरणकर यांनी केले.

सध्या गर्भाशयाचा कॅन्सर रोखण्यासाठी मुला मुलींना एचपीव्ही व्हॅक्सिनेशन बाजारात आले आहे. सध्या ते महाग असले तरी ९ ते १४ वयोगटासाठी एचपी. ही व्हॅक्सिनचा पहिला डोस झाल्यानंतर सहा महिन्यानंतर दुसरा डोस, १५ ते २६ या वयोगटासाठी एकूण तीन डोस घेणे जरुरीचे आहे. पहिला डोस झाल्यानंतर, दोन महिन्यानंतर दुसरा डोस तर सहा महिन्यानंतर तिसरा डोस, २७ ते ४५ या वयोगटासाठी देखील एकूण तीन डोस घेणे जरुरीचे आहे. पहिला डोस झाल्यानंतर, दोन महिन्यानंतर दुसरा डोस तर सहा महिन्यानंतर तिसरा डोस घेतल्यास गर्भाशयाच्या कॅन्सर विरुद्ध यशस्वी लढा देऊ शकतोज्वेलेक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड प्रकल्पांतर्गत फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या कर्मचाऱ्यांकरिता छ. शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय येथील स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विभागाच्या ओ.पी.डी. मध्ये आयोजित एच.पी.व्ही. व्हॅक्सिनेशन ट्रेनिंग मध्ये मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. यावेळी एआरटी विभागाच्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. अग्रजा चिटणीस-वरेकर, एचपीव्ही वॅक्सिंन - सर्वाव्याक कंपनीचे सोलापूर प्रतिनिधी वैभव पराडकर, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी आदी उपस्थित होते. यावेळी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक, परिचारिका आशालता मस्के, रोजमेरी गायकवाड, सुकेशनी सोनकांबळे आधी कर्मचाऱ्यांनी एच.पी. व्ही. व्हॅक्सिनेशनचे ट्रेनिंग घेतले. कार्यक्रमाचे स्वागत आकाश गायकवाड यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार आशालता मस्के यांनी मानले.

# पोलीसांच्या सहकार्याने गुन्हेगार होणार शासकीय योजनेचे लाभार्थी

## पात्र उमेदवारांची कागदपत्रे व फॉर्म अधिकाऱ्यांनी भरून घेतले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल -**

पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून सोलापूर ग्रामीण पोलिसांकडून राबविण्यात येत असलेल्या पहाट उपक्रमांतर्गत मंगळवारी पोलिस मुख्यालयातील अलंकार हॉल येथे गुन्हेगार व त्यांच्या कुटुंबियांचा मेळावा घेऊन गुन्हेगारांमधून पात्र उमेदवारांचे आवश्यक कागदपत्रं व विहित नमुन्यातील फॉर्म भरून घेण्यात आले.

या मेळाव्यास पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस ठाणेकडील नोडल अधिकारी व पोलीस अधीक्षक कार्यालायतील पोलीस निरीक्षक अतुल मोहीते, सहायक पोलीस विशाल वायकर, पोलीस उपनिरीक्षक सुबोध जमदाडे हे उपस्थित होते.

पहाट उपक्रमांतर्गत मंगळवारी दुपारी अलंकार हॉल येथे शासनाकडून अनुसुचीत जाती व जमातीमधील गुन्हेगार तसेच शेती असणारे गुन्हेगारांना बोलावण्यात आले होते. यावेळी शासनाकडील समाज कल्याण विभाग, कृषी अधिकारी, आदिवासी विकास प्रल्कप यांचे अधिकारी हजर होते. या विभागाकडून उपस्थितांना विविध योजनांची माहिती त्यांना देवून तिथे हजर असलेल्या गुन्हेगारांमधून पात्र उमेदवारांचे आवश्यक कागदपत्र व विहीत नमुन्यातील फॉर्म जागीच भरून घेण्यात आले. यामुळे लवकरच अशा गुन्हेगारांना या योजनांच्या शासकीय नियमानुसार लाभ दिला जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने रिक्षा खरेदी, दुकान, सायकल, पिठाची गिरणी, तिकट काडंप मशिन या मिळणार आहेत. यामुळे गुन्हेगारांना त्यांच्या रोजच्या गरजा पूर्ण होण्यासाठी चलन उपलब्ध होणार आहे. तसेच ज्यांच्या नावे शेती असून ७/१२ उतारा आहे त्यांना कृषी विभागाकडील योजनांचा लाभ मिळणार आहे. सदर मेळाव्यास मानसोपचार तज्ञ डॉ. भोगे, सहायक सरकारी वकिल श्रीमती शैलजा क्यातम, सामाजिक कार्यकर्ते गणेश चादरे यांनी मार्गदर्शन केले असून गुन्हेगारी तसेच वाईट व्यसनांपासून दूर राहण्याबाबत उपचार पध्दती, जिवन पध्दती याबाबत मार्गदर्शन केले आहे.

पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी गुन्हेगारांना गुन्हेगारीच्या दलदलीतून बाहेर पडण्यासाठी ''पहाट'' हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत सोलापूर जिल्हयातील पोलीस अधीक्षक ते पोलीस उपनिरीक्षक या दर्जाच्या पोलीस अधिकारी यांना वारंवार गुन्हे करणारे आरोपींना दत्तक दिले आहे. सदर आरोपींच्या हालचालीवर पालक अधिकारी हे लक्ष ठेवून असून ते त्यांच्याशी नियमीत संपर्कात आहेत. त्यांच्यावर दाखल केसेस, त्यांचे कुटूंबीय यांची देखील माहिती घेतली आहे. तसेच त्यांना गुन्हेगारीपासून बाहेर येण्यासाठी मदत करत आहेत. यामध्ये प्रामुख्याने त्यांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करून देण्यावर सुरूवातीस भर देण्यात येत आहे.




### मुलींना शिकवून मोठे करण्याची इच्छा - पवार



या मेळाव्याला कुटुंबासमवेत उपस्थित असलेला गुन्हेगार उमेश जाफर पवार (रा. सिध्दापूर, ता. मंगळवेढा) याने गुन्हेगारी सोडून कष्ट करीत मेंढीपालन व शेती करून जगण्याचा मानस व्यक्त केला. उमेश पवार याचे वडील जाफर पवार सध्या आजन्म कारावासाची शिक्षा भोगत आहे तर उमेश पवार याच्यावर ५ गुन्हे दाखल आहेत. उमेश पवार याला चार मुली असून त्याने मुलींना शिक्षण शिकवून मोठे करणार असल्याचे सांगितले. पोलिस कर्मचारी जाधवर यांनी आर्थिक मदत मिळवून दिल्याने उमेश पवार याची मोठी मुलगी सध्या कामती (बु) येथील श्रीराधा गुरूकुलमध्ये शिकत असून पोलिस अधिक्षकांच्या या उपक्रमांतर्गत शेतीसाठी पाईपलाईन मिळवण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे उमेश पवार याने सांगितले.



सन २०२४ मध्ये जेलमधून सुटून आलेल्या नरखेड (ता. मोहोळ) येथील जेवर हरिदास काळे याने गुन्हेगारी सोडून श्री विठ्ठल-रुक्मीणीची माळ घालून वारकरी होऊन नामस्मरण करीत शेती करण्याचा मार्ग निवडला आहे. जेवर काळे याच्यावर १० ते १५ गुन्हे असून अनेक गुन्हे दाखल आहेत. यापुढील काळात गुन्हेगारी करण्याचा विषयच नाही असे सांगताना जेवर काळे याने स्वतः बरोबरच समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# शुभम गुप्ता नागपूर विदर्भ वैधानिक विकास मंडळाचे सदस्य सचिव

## राज्य सरकारने केल्या पाच सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या, नियुक्त्या

◆ **मुंबई, १ एप्रिल**



महाराष्ट्र सरकारने नुकत्याच पाच सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. यात सांगली-मीरज-कुपवाडा महानगर पालिकेचे आयुक्त शुभम गुप्ता यांची नागपूर विदर्भ वैधानिक विकास मंडळाच्या सदस्य सचिवपदी नियुक्त करण्यात आली आहे.

पाच सनदी अधिकाऱ्यांमध्ये २०१३ तुकडीचे आयएएस अधिकारी बी. एच. पलावे यांची महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती देण्यात आली असून, २०१४ तुकडीचे आयएएस अधिकारी मनोज रानडे यांची पालघर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

२०२२ तुकडीचे आयएएस अधिकारी जेनिथ चंद्र देवंथुला प्रकल्प अधिकारी, आयटीडीपी, किनवट आणि सहाय्यक जिल्हाधिकारी, किनवट उपविभाग, नांदेड म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

यासोबतच मध्यप्रदेश केडरमधून बदली झालेल्या २०२० तुकडीच्या आयएएस अधिकारी अंजली रमेश यांना हिंगोली जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नियुक्ती देण्यात आली

# मुंडेंचा सहकारी घनवटकडून शेतकऱ्यांची कोट्यवधींची फसवणूक ?

**अंजली दमानिया यांचा आणखी एक' बॉम्ब '**

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.१ एप्रिल -**

वादग्रस्त माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्याशी संबंधित कोट्यावधीच्या गैरव्यवहाराचे आणखी एक प्रकरणाचा सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सोमवारी गौप्यस्फोट केला. त्यांच्या सानिध्यातील राजेंद्र धनवट आणि धनंजय मुंडे यांची पत्नी राजश्री मुंडे यांनी ११ शेतकऱ्यांच्या सुमारे वीस कोटी रुपये किमतीच्या जमिनी बळकावल्या आहेत. असा आरोप करून सरकारने या प्रकरणाची त्वरित चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी पत्रकार परिषदेत केली. मीराताई सोनवणे व राजेंद्र सोनवणे या फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांच्या समवेत पत्रकार परिषद घेऊन त्यांनी हे आरोप केले. त्या म्हणाल्या, एका डिबेटमध्ये मी राजेंद्र घनवट यांचे नाव घेतले होते . त्यानंतर काही शेतकरी माझ्या घरी आले. त्यांनी घनवटने छळ केल्याचे सागून त्यांनी व्यंकटेश्वरा इंडस्ट्रीयल सर्व्हीसेसमध्ये राजश्री धनंजय मुंडे आणि राजेंद्र पोपटलाल घनवट हे दोघे संचालक आहेत. त्यांनी ११ शेतकऱ्याची फसवणूक केली असून २० कोटींची जमीनीचा ८ लाखांत व्यवहार केला आहे. मिराताई आणि इतर शेतकऱ्यांचा छळ केला गेला आहे. मिरा सोनावणे यांच्या घरचे १९५७ मध्ये मृत पावले, पण २००७ मध्ये त्यांच्या नावे व्यवहार केला गेला आहे. तक्रार करायला गेले तर त्यांना अपशब्द वापरले, मानहानीचे, ३०७ चे गुन्हे दाखल केले आहेत. एक जण पीएसआय आहे, न्याय मागणाऱ्या अशा लोकांवरच अफाट गुन्हे दाखल केले आहेत. पोपटलाल घनवट यांना आव्हान माझे आहे की त्यांनी वाटेल तेवढे मानहानीचे गुन्हे दाखल करावे, पण त्यांचा पर्दाफाश करणारच असे सांगून त्या म्हणाल्या,' त्याच्यावर कारवाईची मागणी गृहमंत्र्याकडे करणार असून महसूल मंत्री बावनकुळे यांच्याकडे या सगळ्या लोकांना पाठवणार आहे. या सगळ्यांवर सक्त कारवाई झालीच पाहीजे, धनंजय मुंडे यांच्याशी या सगळ्यांचे लागेबांधे आहेत



### पंकजा मुंडे यांच्याविरोधात पुरावे घेऊन धनंजय मुंडे व धनवट आले होते

पाच वर्षांपूर्वी धनंजय मुंडे व राजेंद्र धनवट हे आपल्याकडे पंकजा मुंडे यांच्या विरोधातील कागदपत्रांची फाईल घेऊन आले होते , असा गोपी स्पोर्ट अंजली दमानिया यांनी आज केला. त्या म्हणाल्या, कागदपत्रांचे गट्टे घेऊन त्यांनी आपल्याला हे प्रकरण प उघड करण्याची विनंती केली होती .मात्र आपण अशी कामे करत नसल्याचे सांगून ते फेटाळून लावले.

या संदर्भात मिराताई सोनावणे म्हणाल्या की आम्ही अंजली दमानिया यांच्याकडे आलो आहोत. खेडमध्ये पोपटलाल घनवट यांची दहशत आहे.आमच्यावर खोटे गुन्हे दाखल केले आहेत. शंकर मारूती रौंदळ यांच्याकडे जमीन गहाण ठेवली होती, पण वडिलांनी खरेदी खत करून घेतलं, वयाच्या ९ व्या वर्षी तमाशात काम केलं, लहानपणी भिक मागितली पण आम्हाला कोर्टात खेचलं. आमचे जमिनीसाठी हाल केले. पोपट घनवट, राज घनवट यांनी आमचे हाल केले. पोपट घनवट समोर येत नाही. घनवटमुळे अनेकांचं आयुष्य उदध्वस्त झाले आहे. राजेंद्र सोनवणे म्हणाले की, पोपट घनवट याने वडिलांना धमकी दिल्यानंतर. त्यांना हार्ट अटॅक आला. तुझ्या वडिलांनी जमीन विकली सही कर असे ते सांगून बंदुकीचा धाक दाखवला. मी कोर्टामार्फत लेटर पाठवलं आहे , १० वर्षे झाले आम्ही तिथे जाऊ शकत नाही .

# टायगर मेमनची मालमत्ता सरकारने ताब्यात घ्यावी

## विशेष टाडा न्यायालयाचा निर्णय

◆ **मुंबई, १ एप्रिल**

मुंबईत १९९३ मध्ये झालेल्या साखळी बॉम्ब स्फोटाचा सूत्रधार टायगर मेमनची मालमत्ता सरकारच्या ताब्यात देण्याचा निर्णय विशेष टाडा न्यायालयाने मंगळवारी दिला. यात फ्लॅट, दुकाने, कार्यलये आणि भूखंडासह १४ मालमत्तांचा समावेश आहे. मेमनच्या मालमत्ता वांद्रे, पश्चिम अलमेडा, सांताक्रूझ, कुर्ला आणि माहीम या भागांत आहेत.

मेमन कुटुंबीयांनी मालमत्तांवर केलेला दावा फेटाळत विशेष टाडा न्यायालयाचे न्यायाधीश व्ही.डी. केदार यांनी आदेश दिला की, टायगर मेमनने देशाविरोधात कट रचून आणि गुन्हेगारी मार्गातून ही मालमत्ता मिळविलेली आहे. त्यामुळे मेमनच्या कुटुंबीयांचा या मलमत्तेवर दावा सांगता येणार नाही.

सरकारने तातडीने मुंबईतील १४ मालमत्ता ताब्यात घ्याव्या. या मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया १९९२ मध्ये महाराष्ट्र सरकारच्या एका आदेशाच्या आधारावर सुरू करण्यात आली होती. मात्र, १९९४ मध्ये याला स्थगिती देण्यात आली होती. तब्बल ३० वर्षांनंतर केंद्र सरकारने याविरोधात अपील करून मालमत्ता सरकारच्या ताब्यात देण्याची मागणी केली होती. त्यावर न्या. केदार यांनी मेमन कुटुंबीयांना नोटीस पाठवून उत्तर मागितले होते. मात्र, मेमन कुटुंबीय समाधानकारक उत्तर सादर करण्यात अपयशी ठरले. त्यामुळे न्यायाधीशांनी केंद्र सरकारच्या बाजूने निर्णय दिला. मुंबई बॉम्बस्फोटातील सूत्रधार टायगर मेमन फरार आहे, तर त्याचा भाऊ याकूब मेमनला २०१५ मध्ये फाशी देण्यात आली. ◀(वृत्तसंस्था)

# प्रशासनात 'एआय'च्या वापरासाठी मार्वल कंपनीसाठी शक्ती प्रदत्त समितीची स्थापना



## मंत्रीमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई,दि.१ एप्रिल -**

राज्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये एआय (कृत्रिम बुद्धिमत्ते)चा प्रभावी वापर व्हावा, यासाठी मार्वल या शासकीय कंपनीच्या कामाची व्याप्ती वाढवण्यासाठी शक्ती प्रदत्त समिती स्थापन करण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीत गडचिरोलीत खनिकर्म प्राधिकरण स्थापण्यासह बीड जिल्ह्यातील अनेक प्रलंबित बंधारे दुरुस्ती व बाईक टॅक्सीचे धोरण निश्चित करण्यासाठीचे महत्त्वाचे निर्णयही घेण्यात आले. राज्य पोलीस दलातील कृत्रिम बृद्धीमत्तेच्या वापरासाठी महाराष्ट्र रिसर्च अँण्ड व्हिजिलन्स फॉर एनहान्स्ड लॉ एन्फोर्समेंट लि. ही कंपनी २०२४ मध्ये स्थापन्यात आली आहे. आता राज्यातील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालये, तसेच विभागांनी कृत्रिम बृद्धिमत्ता तंत्रज्ञानाशी निगडीत विविध प्रकल्प राबवण्याचे नियोजन केले जात आहे. या प्रकल्पांमध्ये शासकीय माहिती गोपनीय व सुरक्षित रहावी यादृष्टीने मार्वल कंपनी मदत करणार आहे. त्यासाठी या कंपनीच्या कामाची व्याप्ती वाढविण्यात येणार आहे. कोणते प्रकल्प या कंपनीकडे द्यायाचे हे निर्णय घेण्यासाठी व ते मार्गी लावण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली तसेच संबंधित विभागांच्या सचिवांची शक्ती प्रदत्त समिती स्थापन करण्यास आज मान्यता देण्यात आली. ही समिती प्रकरण निहाय तपासणी करून प्रकल्पांबाबत निर्णय घेणार आहे.समितीमध्ये संबंधित विभागाचे अन्य वरिष्ठ अधिकारी आहेत. गडचिरोलीत खनिकर्म प्राधिकरण होणार आहे. या प्राधिकरणामुळे गडचिरोली जिल्ह्यातील खनिज क्षेत्राचा विकास जलद गतीने होईल आणि औद्योगिक प्रकल्पांना चालना मिळेल.

### बाईक टॅक्सीसाठी अ‍ॅग्रीगेटर धोरण

राज्यातील एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या सर्व शहरांमध्ये दुचाकी टॅक्सी समुच्चयक अ‍ॅग्रीगेटर सेवा सुरू करण्याबाबतचे धोरण लागू करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. त्यासाठी स्थापलेल्या रामनाथ झा यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशीनुसार हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे राज्यातील नागरिकांसाठी वाहतुकीचा किफायतशीर आणि सोयीचा पर्याय उपलब्ध होणार आहे. यातून मोठी रोजगारनिर्मिती होणार असून महिला चालकांना देखील प्रोत्साहीत केले जाणार आहे.

### वडसा-देसाईगंज-गडचिरोली रेल्वे मार्गासाठी ९४३ कोटीचा निधी

वडसा-देसाईगंज-गडचिरोली या रेल्वे मार्ग प्रकल्पाच्या सुधारित खर्चास आणि राज्याच्या हिश्श्याचे ९४३ कोटी २५ लाख रुपये देण्यास मंजुरी देण्यात आली. हा निधी केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानाच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने वितरित केला जाणार आहे. बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीवरील ब्रम्हनाथ येळंब कोल्हापूर पध्दतीच्या बंधारे प्रकल्पाचे बॅरेजम ध्ये रुपांतरीत करण्याच्या कामाला मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.



# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते महाबळेश्वर पर्यटन महोत्सव बोधचिन्हाचे अनावरण

## २ ते ४ मे दरम्यान महोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १ एप्रिल-**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागांतर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व स्थानिक जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी २ ते ४ मे या कालावधीत तीन दिवस महाबळेश्वर पर्यटन महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे म हाबळेश्वर पर्यटन महोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, म हसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज सूर्यवंशी, पर्यटन संचालक डॉ. बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, एमटीडीसीचे मुख्य लेखा वित्त अधिकारी जितेंद्र सोनवणे उपस्थित होते.

## चित्रपट वार्ता

### अल्लू अर्जुन नाव बदलणार!



**हैदराबाद** : दाक्षिणात्य अभिनेता अल्लू अर्जुन सध्या खूप चर्चेत आहे. याचे कारण त्याचे नाव आहे. अभिनेता त्याचे नाव बदलण्याचा विचार करीत आहे आणि त्याच्या नावात आणखी काही अक्षरे जोडू इच्छित आहे. तथापि, याबाबत त्याच्याकडून अद्याप कोणतेही अधिकृत विधान आलेले नाही. अल्लू अर्जुन त्याच्या कारकीर्दीत अधिक यश मिळवण्यासाठी अंकशास्त्राच्या सल्ल्यानुसार त्याच्या नावात दोन यू आणि दोन एन जोडण्याचा विचार करत आहे. अल्लू अर्जुन लवकरच दिग्दर्शक ॲटली यांच्या चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटाचे तात्पुरते शीर्षक 'एए२२' आहे. अल्लू अर्जुनच्या वाढदिवशी (८ एप्रिल) या चित्रपटाची घोषणा केली जाऊ शकते. ■

### सुधांशु पांडेचा 'वागले की दुनिया'मध्ये प्रवेश

**मुंबई** : सोनी सबवरील 'वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से' मालिका भावनिक दृष्ट्या समृद्ध आणि दैनंदिन जीवनाशी निगडीत कथा सादर करून लहान-थोर सर्वांचे निखळ मनोरंजन करते. या मालिकेत प्रसिद्ध अभिनेता सुधांशु पांडेचा प्रवेश होणार आहे. वंदनाचा (परिवा प्रणती) कॉलेजचा जुना मित्र रॉकीच्या रूपात तो वागले कुटुंबात येणार आहे. या रॉकस्टारच्या आगमनामुळे वागले कुटुंब काहीसे विस्कळित होणार आहे. या रोमांचक कथानकात राजेश (सुमित राघवन) आणि वंदनाची मुले एका मोठ्या कॉन्सर्टची तिकिटे न मिळाल्याने हिरमुसतात. पण, परिस्थितीला एक आश्चर्यकारक वळण मिळते, जेव्हा वंदना सांगते की, त्या कार्यक्रमातील कलाकार रॉकी हा तिचा कॉलेजचा जुना मित्र आहे आणि कधी काळी त्याने एक गाणे म्हणून तिला लग्नाची मागणी देखील घातली होती. हे ऐकल्यावर राजेशला मनातून ईर्ष्या आणि कुतुहल वाटू लागते. असुरक्षितता आणि ईर्ष्या यांच्या भोवऱ्यात अडकलेल्या राजेशला मात्र आपल्याला एक स्पर्धक आल्यासारखे वाटते! ■



### 'रेड-२'मध्ये दिसणार तमन्ना भाटिया



**मुंबई** : अजय देवगण, रितेश देशमुखच्या 'रेड-२' मध्ये लोकप्रिय अभिनेत्री तमन्ना भाटियाचा प्रवेश झाला आहे. अजय देवगण यात अमेय पटनायक या अधिकाऱ्याच्या भूमिकेत झळकणार असून, रितेश देशमुख खलनायकाच्या भूमिकेत राहणार आहे. 'दादाभाई' असे त्याच्या भूमिकेचे नाव आहे. तमन्ना एका खास गाण्यासाठी चित्रपटात दिसणार असून तिच्यासोबत यो यो हनीसिंगही राहणार आहे. तमन्ना आणि हनीसिंगचे गाणे एक प्रमोशनल स्वरूपाचे असून, ते सिनेमाच्या शेवटी प्रेक्षकांना पाहता येणार आहे. येत्या ३ आणि ४ एप्रिलला या गाण्याचे चित्रीकरण होणार आहे. ■

### ॥ उसंतवाणी ॥

१४६७



पाडवा मेळावा । हिंदुंवर टीका ।
कुंभमेळा फुका । भरविला ॥१॥

'राज'कीय भाषा । काय यांची निष्ठा ।
भक्तांची ती विष्ठा । दिसे यांना ॥२॥

नाशिक मनपा । आली होती हाती ।
तेंव्हा तिची माती । केली यांनी ॥३॥

नदी प्रदूषण । आत्ता आली जाग ।
काढा जरा माग । शासकीय ॥४॥

मुंबईवरती । कोणाची ती सत्ता ।
कोणा मिळे हप्ता । नियमित ॥५॥

खळ्ळ् खट्याक् ची । करूनिया भाषा ।
विकासाची दिशा । फिरवली ॥६॥

कांत 'राज'कीय । ओळखा हा नग ।
रंगलेला वग । जत्रेतला ॥७॥

श्रीकांत उमरीकर
९४२२८७८५७५
०१ एप्रिल २०२५

# मोदींनी कधी निवृत्त व्हावे हे जनता ठरवते, सकाळचा भोंगा नाही

## चंद्रशेखर बावनकुळेंचा राऊत यांना जोरदार टोला

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.१ एप्रिल-**

संजय राऊतांचं मानसिक संतुलन बिघडले आणि भाजप द्वेषाची कावीळ झाली आहे. त्यांची विधाने ही केवळ स्टंटबाजी आहे असा टोला भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी लगावला आहे.

पंतप्रधान मोदी यांच्या राजकीय निवृत्तीबाबत ठाकरे गटाचे नेते खा. राऊत हे रोज वेगवेगळे दावे करत आहेत. त्याला बावनकुळे यांनी 'एक्स' वरून प्रत्युत्तर दिले आहे. त्यात म्हटले आहे की,७५ वर्षे वयानंतर निवृत्तीचा कोणताही नियम नाही आणि इतिहासही नाही. २०४७ पर्यंत विकसित भारताचा संकल्प मोदींच्याच नेतृत्वाखाली पूर्ण होईल. संजय राऊत यांचे विधान ही केवळ राजकीय स्टंटबाजी आहे. ७५ वर्षे वयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजकारण सोडावे, असा कोणताही नियम नाही किंवा असा कुठलाही निर्णय झालेला नाही. भाजपच्या कोणत्याही अधिकृत धोरणातही असे म्हटलेले नाही.



भारतीय संविधानातही असा कोणताही ठराव किंवा नियम नाही. भाजपचे नेते आदरणीय अटलबिहारी वाजपेयी वयाच्या ७९ वर्षांपर्यंत पंतप्रधान होते. तर मोरारजी देसाई (८३ वर्षे) आणि डॉ. मनमोहन सिंग तर वयाच्या ८१ वर्षांपर्यंत पंतप्रधान होते. पण मानसिक संतुलन बिघडल्याने भाजप द्वेषाची कावीळ झालेल्या राऊतांना हे आठवणार नाही. भारतीय लोकशाहीत पंतप्रधानांनी कधी निवृत्त व्हायचे, हे राऊत यांच्यासारख्या सकाळच्या भोंग्यावर ठरत नाही, तर निवडणुकीतील जनादेशावर आणि लोकांच्या आशीर्वादावर ठरते. पंतप्रधान म्हणून मोदी जी यांचा कार्यकाळ या देशातील जनता ठरवते, राऊत किंवा विरोधकांना तो अधिकार नाही.२०४७ पर्यंत विकसित भारत करण्याचा संकल्प पंतप्रधान मोदी यांनी केला आहे. हा संकल्प त्यांच्याच नेतृत्वात पूर्ण केला जाईल., असेही बावनकुळे यांनी म्हटले आहे.

# जिल्हा प्रशासनामध्ये १५ एप्रिलपर्यंत ७ सुत्री कार्यक्रम

## आराखड्याची अत्यंत प्रभावी अंमलबजावणी केल्याचा प्रशासनाचा दावा

## उच्च संस्थेच्या समितीकडून होणार कामकाजाची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेप्रमाणे राज्याच्या सर्वांगिण प्रगतीसाठी १०० दिवसांचा आराखडा तयार करण्यात आला होता. या आराखड्यात लोक केंद्रीत योजना, तंत्रज्ञानाच्या उपयोगाने सहजतेने नागरिकांना लाभ मिळणाऱ्या योजनांचे ध्येय धोरण ठरविले होते. या आराखड्यातून प्रत्येक विभागांनी ठोस कामगिरी करण्याच्या सूचनाही डिसेंबरमध्ये मुख्यमंत्र्यांनी दिल्या होत्या. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्हा प्रशासन विभागाने या सुचनांची योग्य पध्दतीने अंमलबजावणी करून विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांची शाब्बासकी नुकतीच मिळविली आहे. दरम्यान, हा कार्यक्रम १५ एप्रिलपर्यंत चालणार आहे आणि यानंतर उच्चस्तरीय संस्थेच्या समितीकडून या कामकाजाची पाहणी झाल्यानंतर जिल्ह्याचा राज्यातील गुणक्रम कळणार आहे.

सोलापूर जिल्ह्यात या अंतर्गत काम जोरात सुरू आहे. या कार्यक्रमातून सर्वसामान्यांचा शासकीय कार्यालयाकडे पाहण्याचा पूर्वीचा नकारात्मक दृष्टिकोन बदलून सकारात्मक दृष्टिकोन व्हावा तसेच या कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरावर सोलापूर जिल्ह्याचा प्रथम क्रमांक आला पाहिजे, असे आवाहन विभागीय आयुक्त पुलकुंडवार नुकतेच केले होते. त्या ध्येयाने सर्व विभागप्रमुखांचे काम चालू आहे.

या अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाचा पोट खराबा जमीन तसेच बिगर शेती असलेल्या जमिनीसाठी सनद वाटप कार्यक्रम हा अत्यंत चांगला असून, राज्यातील इतर जिल्ह्यापेक्षा वेगळा व लोकांसाठी खूप महत्त्वपूर्ण कार्यक्रम असल्याचे डॉ. पुलकुंडवार यांनी सांगून अभिलेखासाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करून त्या अनुषंगाने अभिलेखाचे निंदनीकरण व सुसूत्रीकरण केले जात असल्याबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले. त्याप्रमाणेच सोलापूर जिल्हा परिषद तसेच महापालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवून घेण्याची कार्यवाही त्वरित पार पाडावी. यासाठी आवश्यक निधी शासकीय तसेच सीएसआर फंडातून उपलब्ध करून घ्यावा, असेही त्यांनी सूचित केले. त्या अनुषंगाने सोलापूर प्रशासनाने काम केले आहे. सर्व कार्यालय प्रमुखांनी त्यांचे कार्यालय तसेच कार्यालय परिसर कार्यालयातील स्वच्छता घरे तसेच अभ्यागतासाठी असलेली स्वच्छतागृहे चकाचक ठेवली आहेत. शहर-जिल्ह्यात उद्योगस्नेही वातावरण वाढविले आहे. एकंदरीत, हा कार्यक्रम अजून १३ दिवस चालणार असून, यानंतर या कामकाजाचे श्रेष्ठ संस्थेकडून तपासणीचे काम होणार आहे. यानंतरच आपल्या जिल्ह्याचा राज्यातील गुणक्रम ठरणार आहे. दरम्यान, या १०० दिवशीय कार्यक्रमात उशिराने सहभाग नोंदविलेल्या कार्यालयांचा हा कार्यक्रम मे च्या पहिल्या आठवड्यापर्यंत चालणार असल्याचेही समजते.

# मुंबई पोलीस, 'कामरा'चे नाही कामाचे बोला

## रोहिणी खडसे यांनी व्यक्त केला संताप

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. १ एप्रिल -**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या टीका केल्य प्रकरणी स्टॅण्डअप कॉमेडियन कुणाल कामराच्या शोला उपस्थित लावणाऱ्या प्रेक्षकांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे.

मुंबई पोलीसांनी कामराच्या शोला उपस्थित राहणाऱ्या प्रेक्षकांना नोटीस पाठवल्या आहेत. शिवाय त्यांचा जबाबही नोंदवला जाणार आहे. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी संताप व्यक्त केला आहे. कुणाल कामरा प्रकरणात मुंबई पोलिसांनी गेल्या दोन दिवसांपासून या प्रकरणात शोला उपस्थित असणाऱ्या प्रेक्षकांना समन्स बोलव जाऊन त्यांचा जबाब नोंदवत आहे.

त्याबद्दल विविध स्तरावर पोलिसांवर टीका होत आहे याबाबत रोहिणी खडसे यांनीही सोशल मीडियावरून आपला राग व्यक्त केला आहे .त्यात त्यांनी म्हटले आहे की रोहिणी खडसे म्हणाल्या आहेत की, कामराच्या शोला ज्यांनी प्रेक्षक म्हणून हजेरी लावली त्यांना नोटीसा कसल्या पाठवता ? आधी आपली मुंबई ही महिलांसाठी खरंच सुरक्षित आहे का ? ते पहा असे म्हणत त्यांनी मुंबई पोलीसांना धारेवर धरले आहे.

## अग्रलेख...

# मोबाईल वापरातील वाढीची दुसरी बाजू

भारताने मोबाईल फोन्सच्या उत्पादनात जागतिक आघाडी घेतलेली असताना मोबाईलची देशांतर्गत मागणीही प्रचंड वाढल्याचे वृत्त एकीकडे आनंदाचे आणि दुसरीकडे विचार करण्यासारखेही आहे. काही प्रमाणात ते चिंता जागविणारेदेखील आहे. भारतात २०१४ मध्ये १२ अब्ज डॉलर्सचे मोबाईल फोन्स विकले गेले. दशकभरात प्रतिवर्षी सरासरी १३ टक्के वाढ होऊन २०२४ मध्ये मोबाईल फोन्सच्या विक्रीचा आकडा ३६ अब्ज डॉलर्सवर गेला. याचा अर्थ दशकभरात मोबाईल्सची मागणी तिप्पट वाढली. लोकसंख्या तिप्पट झाली नाही. लोकांची कमाई तिप्पट झाली नाही. पण, मोबाईल फोन्सची मागणी तिप्पट झाली. हा खरे तर संशोधनाचा विषय आहे. सुबत्ता आणि गरजेचा भाग म्हणून एकेक माणूस दोन-तीन फोन वापरतो हे मान्य केले तरी ही वाढ जरा जास्तच वाटते. टेलिकॉलिंग कंपन्या आणि ऑनलाईन फ्रॉड करणाऱ्यांनी वापरावयाच्या मोबाईल्सची संख्या वाढवली आहे काय, हेही तपासले पाहिजे.

गेल्या दोन दशकांमध्ये जागतिक मोबाईल फोनची बाजारपेठेत प्रचंड वाढ झाली आहे. २०२४ पर्यंत जगभरातील मोबाईल फोन बाजारपेठ अंदाजे ५५० अब्ज डॉलर्सची होती. विकसित देशांमध्ये स्मार्टफोनचा वापर ८० टक्क्यांपेक्षा जास्त झाला आहे आणि विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये तो सातत्याने वाढत आहे. या विस्तारात भारताने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वांत मोठा स्मार्टफोन बाजार आहे, जिथे १.२ अब्जापेक्षा जास्त मोबाईल कनेक्शन्स आहेत. भारत दरवर्षी ३० कोटींहून अधिक स्मार्टफोनचे उत्पादन करतो. दरवर्षी जागतिक स्तरावर १.५ अब्जपेक्षा जास्त स्मार्टफोन विकले जातात. चीन हा सर्वांत मोठा स्मार्टफोन उत्पादक देश आहे. त्यानंतर भारताचा क्रमांक लागतो. ही आकडेवारी मोबाईल फोन उद्योगातील भारताच्या आघाडीचे उदाहरण म्हणून पाहता येते. तसे ते पाहिले जाते आहे. मात्र, यात काही गोष्टी चिंताजनक आहेत, ज्याकडे आताच लक्ष दिले पाहिजे. मोबाईलचे व्यसन आता सर्व वयोगटातील लोकांमध्ये आढळते. लहान मुलांनादेखील मोबाईलवर गुंतवून ठेवण्याची पद्धत आली आहे. एका अभ्यासानुसार, भारतीय लोक त्यांच्या स्मार्टफोनवर दररोज चार तासांपेक्षा अधिक वेळ घालवतात. हा कालावधी फार जास्त आहे. दिवसातील २४ तासांचे वाटप काम, आराम, व्यायाम, मनोरंजन-कौटुंबिक संवाद अशा चार प्रमुख गोष्टींमध्ये होते किंवा व्हायला हवे. २४ तासांपैकी चार तास मोबाईलवर जात असतील तर यातले काही ना काही बाधित होतच असणार. 'इंडियन जर्नल ऑफ सोशल रिसर्च'ने केलेल्या सर्वेक्षणात असे आढळून आले आहे की, जास्त मोबाईल फोन वापरामुळे ६७ टक्के विवाहित जोडप्यांना नातेसंबंधात ताण जाणवतो. गेल्या दशकात भारतात घटस्फोटाचे प्रमाण १५ टक्क्यांनी वाढले आहे आणि त्यातील प्रमुख मुद्दा हा मोबाईलचा अतिवापर हा आहे. मोबाईलमुळे पालक त्यांच्या मुलांसोबत कमी वेळ घालवतात, त्यामुळे कौटुंबिक नाती कमकुवत होतात. एक अभ्यास तर असे सांगतो की, आजकाल ८ ते १८ या वयोगटातील मुले दररोज सरासरी ७ तास मोबाईल स्क्रीनवर घालवतात. यातून शिक्षण, अभ्यास यावर परिणाम होतोच; शिवाय नैराश्य, आक्रमकता असे विकारही जडतात. जास्त मोबाईल वापरामुळे झोपेचे विकार आणि चिंताग्रस्तता यासारख्या मानसिक आरोग्य समस्या विविध वयोगटातील लोकांना जाणवत आहेत. थेट संभाषणांची जागा मोबाईलसारख्या डिजिटल संवादाने घेतल्याने मानवी नातेसंबंधांमध्ये काही प्रश्न उद्भवू लागले आहेत. एका अभ्यासातून असेही दिसून आले आहे की, सोशल मीडिया आणि मेसेजिंग प्लॅटफॉर्मचा वाढता वापर हा संबंधित लोकांमध्ये एकाकीपणाची भावना निर्माण करीत असून, लोक सतत ऑनलाईन असूनही एकमेकांपासून दूर आहेत. यातला आणखी एक एक चिंताजनक ट्रेंड म्हणजे कुटुंबातील सदस्य शारीरिकरीत्या एकत्र असतानाही भावनिक उपस्थितीचा अभाव असणे. घरातले चार लोक एकत्र बसले आहेत. पण, एकमेकांशी बोलण्याऐवजी मोबाईलशी चाळा करीत आहेत, हे अनेक घरांतले चित्र झाले आहे. त्यावरून घरांमध्ये वाद होतात.

सामाजिक व कौटुंबिक प्रश्नांखेरीज मोबाईल फोन्सच्या अतिवापरामुळे इलेक्ट्रॉनिक कचऱ्याची (ई-वेस्ट) समस्याही वाढत असल्याचे दिसून येत आहे. निकामी झाल्यामुळे फेकून दिलेले मोबाईल फोन, बॅटरी आणि ॲक्सेसरीजसह ई-कचरा हा पर्यावरणासाठी एक महत्त्वाचा धोका आहे. जागतिक पातळीवर, दरवर्षी ५० दशलक्ष मेट्रिक टनांहून अधिक ई-कचरा निर्माण होतो, ज्यामध्ये मोबाईल फोनचा वाटा जवळजवळ ८ टक्के आहे. भारत ई-कचरा निर्मितीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. जागतिक स्तरावरील ई-कचऱ्यापैकी फक्त २० टक्के कचऱ्याचा योग्यरीत्या पुनर्वापर केला जातो; उर्वरित कचरा जमिनीत दाबला, दडपला जातो व त्यामुळे माती आणि पाणी दूषित होते. मोबाईल फोनमध्ये शिसे, पारा आणि कॅडमियम यांसारखे घातक पदार्थ असतात, जे वातावरणात मिसळून प्रदूषण वाढवितात. व्यवस्थित विल्हेवाट न लावल्याने जड धातूंचे दूषितीकरण होते, ज्यामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याचे स्रोत प्रभावित होतात. ई-कचऱ्याचा पुनर्वापर क्षेत्रातील कामगारांना हानिकारक रसायनांच्या संपर्कात आल्यामुळे श्वसन आणि मज्जासंस्थेशी संबंधित विकार होतात, असेही संशोधक सांगतात. पर्यावरणीय प्रदूषणाच्या भारात भर म्हणजे वारंवार मोबाईल फोन अपग्रेड करण्याची पद्धत. कंपन्या दरवर्षी नवीन मॉडेल्स जारी करतात. त्यामुळे लाखो उपकरणे विनाकारण वापरातून बाजूला केली जातात. ती खराब होतात. त्यामुळे विषारी ई-कचरा धोकादायक प्रमाणात जमा होतो. विकसनशील देशांमध्ये प्रचलित असलेल्या अनौपचारिक ई-कचरा पुनर्वापर उद्योगात ॲसिड बाथ आणि पार्ट्स उघड्यावर जाळणे यासारख्या असुरक्षित पद्धती वापरल्या जातात आणि त्यामुळे हानिकारक प्रदूषक हवेत आणि जलसाठ्यात सोडले जातात. या संकटांचा सामना करण्यासाठी ई-कचरा संकलन आणि पुनर्वापर प्रक्रियेचे मजबुतीकरण करणे आवश्यक आहे. मोबाईल फोन उत्पादन, वापर व विल्हेवाटीच्या प्रक्रियेत वर्तुळाकार अर्थव्यवस्थेच्या (सर्क्युलर इकॉनॉमी) मॉडेल्सना प्रोत्साहन देणे आणि ग्राहकांना शाश्वत विल्हेवाट पद्धतींबद्दल शिक्षित करणे आवश्यक आहे. हे सारे लक्षात घेतले तर भारताची मोबाईल फोन उत्पादनातील व वापरातील प्रगती उल्लेखनीय असली, तरी त्यातील काही घटक चिंता वाटावे असे आहेत, हे आपण मान्य केले पाहिजे. शाश्वत विकास हा आता जगभर वापरला जाणारा परवलीचा शब्द आहे; ज्यातून पर्यावरणाची हानी कमीत कमी होते किंवा होत नाही, असा विकास म्हणजे शाश्वत विकास किंवा सस्टेनेबल डेव्हलपमेंट. वर्तमानाच्या गरजा भागविताना भविष्यातील पिढ्यांच्याही काही गरजा असतील याबद्दल कटाक्ष ठेवणे हे सस्टेनेबल डेव्हलपमेंटचे प्रमुख लक्षण होय. मोबाईल फोन्स सर्वांना वापरावे लागतील, यात वाद नाही. त्याला पर्यायही नाही. मात्र, त्यांचा एवढा अतिवापर होऊ नये की भविष्यातील पिढ्यांचे व्यसनाधीनता, ई-वेस्ट, सामाजिक व कौटुंबिक ताणतणावाच्या माध्यमातून नुकसान होऊ नये. शाश्वत विकासासाठी तांत्रिक प्रगतीची सांगड संसाधनांच्या जबाबदार वापराशी घालावी लागते. त्यात समतोल साधायचा असतो. डिजिटल वेलनेसला प्रोत्साहन देऊन, मानवी संबंध मजबूत करून आणि प्रभावी ई-कचरा व्यवस्थापन धोरणे राबवून तसेच सामाजिक आणि पर्यावरणीय व्यवस्थेशी तडजोड न करता मोबाईल तंत्रज्ञानाचे फायदे आपण वापरू शकलो तर मानवजात खऱ्या अर्थाने बुद्धिमान ठरेल. विकासाच्या मागे धावताना आंधळेपणा कामाचा नाही. जागतिक पातळीवर मोबाईलच्या उत्पादनात आणि वापरात भारताची आघाडी हा प्रत्येक भारतीयाच्या आनंदाचा विषय आहेच. पण, त्यातून आपण काही गमावणार नाही ना, याची शंका आपल्याला सतत येत राहिली पाहिजे. तशी ती आली तर आपण सजग आहोत, असे म्हणता येईल. आकड्यांमध्ये दिसणाऱ्या प्रत्येक वाढीमागे जसे वृद्धीचे अर्थकारण असते, तसे त्यामागे कुठल्या तरी घटीचेही संकेत असतात, हे समजून घेणे आवश्यक आहे. मोबाईल फोनच्या उत्पादनातील व वापरातील वाढ याला अपवाद नसावी.

## विशेष

# शस्त्रास्त्रनिर्मितीमध्ये आत्मनिर्भरतेच्या वाटेवर

प्रा. सुखदेव बखळे

देश आज एका नव्या वाटेवर चालत आहे. देशाच्या सैन्याला बळकट करण्यासाठी बाहेरून शस्त्रास्त्रे खरेदी करण्याऐवजी देशातच शस्त्रास्त्रे तयार करण्याचा प्रयत्न होत आहे. भारतीय लष्कर शक्तिशाली व्हावे, देशाचा पैसा वाचावा आणि आपण स्वयंपूर्ण व्हावे, अशी सरकारची इच्छा आहे; पण हा मार्ग सोपा नाही. भारताभोवतीचे वातावरण नेहमीच अशांत असते. कधी शेजारी देशांशी तणाव वाढतो, तर कधी संकट येते. अशा परिस्थितीत बाहेरून शस्त्रास्त्र घेणे लगेच बंद करता येणार नाहीत; परंतु भारताला स्वतःची शस्त्रे बनवावी लागतील. सैन्य कायम शस्त्रसज्ज असेल, अशी व्यवस्था करावी लागत असल्याने इतर कोणत्याही देशाच्या मदतीची गरज भासणार नाही, अशी व्यवस्था आपल्याला निर्माण करावी लागेल. स्वतःच शस्त्रे निर्मिल्याने देशात काम वाढेल. तरुणांना कारखान्यांमध्ये रोजगार मिळेल. लहान-मोठे उद्योग प्रगती करतील. भारत आता आपली शस्त्रे विकत आहे. यातून पैसा येईल आणि भारताची ताकद जगाला दिसेल. नवीन शोध लागतील. लष्करासाठी नवीन तंत्रज्ञान तयार केले जाईल. गावे आणि लहान शहरांमध्येही कारखाने सुरू होतील. तेथील लोकांचीही प्रगती होईल. अर्थात आज हे स्वप्न राहिलेले नाही, तर देशाने या दिशेने मोठी झेप घेतली आहे. यापूर्वी संरक्षण वस्तूंचे उत्पादन ४६,४२९ कोटी रुपये होते. आता ते दुप्पट झाले आहे. शस्त्रास्त्रांची निर्यातही गगनाला भिडत आहे. २०१४ मध्ये शस्त्रास्त्रांची निर्यात केवळ ६८६ कोटी रुपयांची होती. २०२४ मध्ये ती २१,०८३ कोटी रुपयांवर पोहोचली. म्हणजे ३० पट वाढ!

भारत आता तेजस विमाने, आकाश क्षेपणास्त्रे आणि वेगवान नौका बनवत आहे. आता ६५ टक्के संरक्षण उत्पादने भारतात बनतात. पूर्वी ती बहुतेक आयात केली जायची. १६,००० हून अधिक लहान कंपन्या आणि ४३० मोठ्या कंपन्या या कामात गुंतल्या आहेत. सरकारने बनवण्यायोग्य ५,५०० वस्तूंची यादी तयार केली. त्या आता बाहेरून आयात केल्या जाणार नाहीत. यापैकी तीन हजार वस्तू भारतात बनवल्या जाऊ लागल्या आहेत. उत्तर प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये संरक्षण क्षेत्रे तयार करण्यात आली आहेत. येथे ८,६५८ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली असून, ५३ हजार ४३९ कोटी रुपयांचे सौदे झाले आहेत. भारतात 'आयडेक्स' नावाचा कार्यक्रम सुरू आहे. यामध्ये ६१९ स्टार्टअप्सना ४४९.६२ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. असे असले, तरी सर्व काही चांगले आहे, असे नाही. त्यात काही अडचणीही आहेत. भारताला मोठ्या शस्त्रास्त्रांचे तंत्रज्ञान माहीत नाही. उदाहरणार्थ, लढाऊ विमानाचे इंजिन किंवा विशेष इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञान. त्यासाठी अजूनही परदेशी मदतीची गरज आहे. खाजगी कंपन्याही या बाबतीत कमी काम करत आहेत. त्यांचा वाटा फक्त २१ टक्के आहे. उर्वरित काम सरकारी कंपन्या करतात. कच्चा माल खरेदीला बराच विलंब होतो. अजूनही निर्णय लवकर घेतले जात नाहीत. यामुळे लष्कराला नवीन उपकरणे मिळण्यास वेळ लागतो. संशोधनावरही कमी पैसा खर्च होतो. शास्त्रज्ञ नवीन गोष्टी तयार करतात; पण त्या मोठ्या प्रमाणावर बनवल्या जात नाहीत. भारत अजूनही पाणबुड्या, लढाऊ जहाजे आणि ड्रोन बाहेरून खरेदी करतो.

भारत हा शस्त्रास्त्र खरेदी करणारा जगातील सर्वांत मोठा देश असल्याचे एका अहवालात म्हटले आहे. बहुतेक संरक्षण सामुग्री रशियातून येते. संरक्षणमंत्र्यांनी आत्मनिर्भरता आणि प्रगत उपायांवर भर दिला. संरक्षण क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणूक ४९ टक्क्यांवरून ७४ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आली आहे. आतापर्यंत ५०० हून अधिक शस्त्रे आणि यंत्रणांच्या आयातीवर बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे संरक्षण क्षेत्रात स्वावलंबी होण्यासाठी देश वेगाने पुढे जात आहे. यामध्ये लष्कराची लढाऊ वाहने, जहाजावर आधारित मानवरहित हवाई यंत्रणा, मध्यम-श्रेणीची अचूक स्ट्राईक यंत्रणा, सागरी पाळत ठेवणारी विमाने, युद्धनौका, हेलिकॉप्टर, टाक्या, तोफखाना, क्षेपणास्त्रे, हलकी वाहतूक विमाने, लांब पल्ल्याची क्रूझ क्षेपणास्त्रे, ट्रेनर विमाने यांचा समावेश आहे. आजचे शत्रू पारंपरिक शस्त्रे घेऊन हल्ला करत नाहीत. सायबर हल्ले, चुकीच्या माहितीच्या मोहिमा आणि स्पेसआधारित हेरगिरी हे नवीन युगाचे धोके म्हणून उदयास येत आहेत. यासाठी प्रगत उपाय आवश्यक आहेत. आधुनिक जगात सुरक्षाविषयक नवी आव्हाने निर्माण होत आहेत. अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेतील गरजा वाढत आहेत. आपल्या संस्थांनी या गोष्टी समजून घेणे आणि सशक्त, सुरक्षित आणि स्वावलंबी भारत घडवण्यासाठी सहकार्याने कार्य करणे अत्यावश्यक आहे.

भारताने संरक्षणसामग्रीच्या क्षेत्रात आत्मनिर्भरता वाढवण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. यामध्ये विविध प्रकारची शस्त्रे, यंत्रणा, दारूगोळा, गंभीर उपप्रणाली आणि इतर गोष्टींवर टप्प्याटप्प्याने आयातबंदी लादण्यात आली आहे. तसेच, देशात उत्पादित लष्करी हार्डवेअर खरेदी करण्यासाठी स्वतंत्र बजेट तयार करावे लागेल. एक काळ असा होता, जेव्हा भारत शस्त्रास्त्रांसाठी जगातील देशांवर अवलंबून होता; पण आता काळ बदलला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारताने 'आत्मनिर्भर भारत' मोहिमेअंतर्गत जगातील अनेक देशांना शस्त्रे पुरवली आहेत. भारतीय शस्त्रे जवळपास ८५ देशांमध्ये पोहोचली आहेत. गेल्या काही वर्षांचा आढावा घेतल्यास भारताच्या संरक्षण निर्यातीत झपाट्याने वाढ झाली आहे. भारताने जगातील अनेक देशांना क्षेपणास्त्रे, तोफखाना, रॉकेट, आर्म्ड वाहने, वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे, रडार, पाळत ठेवणारी यंत्रणा आणि इतर शस्त्रे पुरवली आहेत. संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, ३४ देशांनी भारताकडून बुलेटप्रूफ जॅकेट्स खरेदी केली असून त्यात ऑस्ट्रेलिया, जपान, इस्रायल आणि ब्राझील यांचा समावेश आहे. सुमारे दहा देशांनी भारताकडून दारूगोळा खरेदी केला आहे. अमेरिका, ब्रिटनसारख्या देशांनीही शस्त्रे खरेदी केली आहेत. संरक्षण मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्ससारख्या महासत्तांनी भारताकडून संरक्षण इलेक्ट्रॉनिक्स वस्तू खरेदी केल्या आहेत. भारताने मॉरिशस, सेशेल्स आणि मालदीवमध्ये वेगवान इंटरसेप्टर बोटींची निर्यात केली आहे.गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये 'हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड'ने तेजस मल्टीरोल फायटर जेट खरेदी करण्यासाठी तीन देशांशी चर्चा सुरू असल्याचे सांगितले होते. नायजेरियाशी चर्चा प्राथमिक टप्प्यात आहे. तसेच अर्जेंटिनाला १५ तेजस लढाऊ विमाने आणि इजिप्तला वीस लढाऊ विमाने विकण्याची चर्चा सुरू आहे. भारताने व्हिएतनाम आणि फिलिपाईन्सला आकाश क्षेपणास्त्रे विकण्याची ऑफर दिली आहे तर इजिप्तनेही त्यात रस दाखवला आहे. असे असले, तरी या शस्त्रास्त्रनिर्मिती आणि निर्यातीला अधिक चालना देण्यासाठी शास्त्रज्ञ, खाजगी कंपन्या आणि स्टार्टअप यांना एकत्र आणावे लागेल. 'एआय', वेगवान क्षेपणास्त्रे आणि छुप्या शस्त्रांवर काम करावे लागणार आहे. खाजगी कंपन्यांना अधिक संधी द्याव्या लागतील. त्यांच्यासाठी नियम सोपे करावे लागतील. शस्त्रास्त्रांच्या चाचणीसाठी नवी ठिकाणे निर्माण करावी लागतील. यासाठी खाजगी कंपन्या मदत करू शकतात. तंत्रज्ञान आणि उत्पादनात भारताने इतर देशांशी भागीदारी केली पाहिजे. अशी व्यवस्था निर्माण केली पाहिजे, ज्यामध्ये स्वावलंबनाच्या दिशेने प्रगती दिसून येईल. भारताचे आत्मनिर्भर संरक्षण अभियान हे एक मोठे स्वप्न आहे. त्यामुळे देशाला बळ मिळेल. सैन्य मजबूत असेल. देशात पैसा वाढेल. भारत जगावर वर्चस्व गाजवेल; मात्र यासाठी सर्वांना एकत्र काम करावे लागेल. हे स्वप्न पूर्ण झाल्यास भारत जगाचे संरक्षण केंद्र बनू शकेल.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

विजय निचकवडे

# गुढी-बिढी अन् भानगड!

काय झालंय ना, आज राजकारणात स्वतःला जिवंत ठेवायचे असेल तर चर्चेत येणारी व्यक्तव्य करण्याचा नवा 'फंडा' राजकारण्यांना सापडला आहे. काहीतरी वेडवाकडं बोला अन् फुकटची प्रसिद्धी मिळवून घ्या. बाकीचं काम, हातात दंडुके घेऊन असलेले माध्यमांचे चाणाक्ष प्रतिनिधी करतातच! हिंदुत्व, हिंदू संस्कृती, थोर पुरुष यावर केलेले भाष्य चांगली प्रसिद्धी मिळवून देते, असा ठाम विश्वासच राजकारण्यांना झाला असावा, म्हणून तर आता गुढीपाडव्यासारख्या परंपरेवर बोलण्याचे धारिष्ट्य नेत्यांचे झाले. आता गुढीची 'गुढी-बिढी' झाली अन् ती जर 'भानगड' वाटू लागली असेल तर हा नक्कीच मानसिकतेचा आणि स्वतःच्या राजकीय अस्तित्वाच्या चिंतेचा परिपाक म्हणावा लागेल.

रोज कुणीतरी माध्यमांसमोर येतो आणि काहीतरी बोलून जातो. अनेकांची अनेक वक्तव्ये वादाला तोंड फोडणारी असतात. आता सामान्य माणसाने काहीही बोलले तरी चालते हो, पण ज्यांच्याकडे आम्ही लाखो लोकांचे प्रतिनिधी म्हणून पाहतो, ज्यांना विश्वासाने जनतेने विधिमंडळाच्या सभागृहात पाठवून सकारात्मक आणि परिणामकारक बदल घडवून आणण्याची संधी दिली आहे, अशा लोकांनी काहीही बोलावे म्हणजे खेदच वाटतो.



विजय, सौभाग्य आणि समृद्धीचे प्रतीक म्हणून आम्ही गुढीपाडव्याच्या सणाकडे पाहतो. ही आमची परंपरा आहे. उंच उंच गुढीप्रमाणे आमचे विचार प्रगल्भ होत जाऊन सकारात्मकतेचे वातावरण तयार होवो, अशीच काहीशी प्रार्थना या गुढीपाडव्याच्या निमित्ताने प्रत्येक जण करीत असावा. आत्मनिरीक्षण, कृतज्ञता, समृद्धी, शांतीसाठी देवाचे आशीर्वाद मिळविण्याची संधी म्हणूनही गुढीपाडव्याकडे पाहिले जाते. प्रत्येक हिंदूंची आस्था आणि श्रद्धेचे प्रतीकही हीच गुढी आहे. पण झालं काय? स्वतःला हिंदू म्हणविणाऱ्या एका नेत्याला अचानक ही गुढी 'बिढी' वाटू लागली अन् ती उभारणे म्हणजे 'भानगड'. आता मला सांगा, ज्या विजय वडेट्टीवारांनी गुढीला भानगड म्हटले, त्यांनी हातात भगवा घेऊन यापूर्वी गुढी उभारली नाही का? शिवसेनेत असताना या सर्व भानगडी त्यांनी खरंच केल्या नाहीत का? मग तेव्हा गुढी उभारण्याची भानगड करताना मनात, अंतःकरणात असलेले हिंदू अचानक कसे काय पुसट झाले, साहेब! संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतरचा दुसऱ्या दिवशी गुढीपाडवा करून आनंद साजरा करायचा का म्हणणाऱ्या वडेट्टीवारांना यापूर्वी हे का सुचले नाही मग?

आज राज्यात वातावरण बदलते आहे. आपले राजकीय अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी काहीतरी विधान करून चर्चेत राहणे गरजेचे आहे, कळल्यानंतर विजूभाऊसुद्धा अन्य वाचाळांच्या रांगेत जाऊन बसले. हिंदूंच्या गुढीपाडवा सणाबद्दल आक्षेपार्ह बोलून त्यांनी जी काही प्रसिद्धी मिळविण्याचा प्रयत्न केला, तो नक्कीच केविलवाणा होता. शिवसेनेत असताना अगदी कर्मठ हिंदुत्ववादी वैदर्भीय नेता, अशी त्यांची ओळख होती. पण आज काँग्रेसच्या विचारांचा पगडा त्यांना असे काहीतरी बोलण्यास बाध्य करीत आहे, हे तेवढेच खरे! गुढीपाडवा भानगड म्हणताना कधीतरी इतर धर्मीयांच्या प्रथा, परंपरा, सणांवर बोलण्याचे धाडस दाखविले जाईल का हो?

वडेट्टीवारांच्या या वक्तव्यावर आ. संदीप जोशी यांनी दिलेली प्रतिक्रियाही तेवढीच बोलकी आहे. अर्थार्जनासाठी मुलीला बार उघडून देणाऱ्या वडेट्टीवारांकडून दुसरी कोणती अपेक्षा केली जाऊ शकते, असे म्हणत हिंदू असून हिंदूंच्या बाबतीत असे बोलणे खेदाचे असल्याचे ते म्हणाले. आता संदीप जोशी यांचे हे विधानही विचार करण्यास भाग पाडणारे आहे. आरोप-प्रत्यारोप हा राजकीय भाग म्हणून सोडला तरी खरंच ज्या हिंदुत्वाचा झेंडा घेऊन आपल्या राजकारणाला सुरुवात झाली, त्यातूनच तुमचे व्यक्तिमत्त्व घडले, लोकांनाही ते भावले. अशा हिंदुत्वाच्या प्रथा-परंपरांविषयी घेतलेली नकारात्मक भूमिका राजकारणीय स्वार्थ डोळ्यांपुढे ठेवून असेल तर नक्कीच हा प्रकार केविलवाणा आहे. मग अशावेळी गुढीपाडव्याच्या शुभेच्छा देण्याचा अधिकारही कसा असेल तुम्हाला! आज महाराष्ट्रात काही वाचाळवीर कायम तोंडाची वाफ व्यर्थ घालवीत असतात. आता तर माध्यमांनाही ते नकोसे वाटू लागलेलं, अशावेळी नव्यांची भर पडून, आपणच आपल्या संस्कृतीचा उद्धार करू नये म्हणजे झाले?

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# श्रीरामायण : भारताचा देदीप्यमान, अस्सल इतिहास!

प्रा. दिलीप जोशी

भगवान श्रीराम हे कपोलकल्पित पात्र असून, रामायण ही केवळ कविकल्पना आहे, असा अपप्रचार काही छद्मधर्मनिरपेक्षवादी आणि अर्ध्या हळकुंडात पिवळे झालेले वोकिझमवाले करीत असतात. रामसेतू तोडण्यात यावा यासाठी काँग्रेसच्या महाभागांनी राम ही केवळ कविकल्पना अशा आशयाचे न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले होते. करोडो भारतीयांचे प्रेरणास्थान, आदर्श राजे, आदर्श पती, भाऊ, पुत्र, मित्र, प्रजापालक असलेले भगवान श्रीराम सर्वांचा आदर्श आहेत. शौर्य, धैर्य, पराक्रम यांचे प्रतीक म्हणजे भगवान श्रीराम. एकपत्नी, एकवचनी, एकबाणी असलेले भगवान श्रीराम. भारतीय संस्कृतीचा प्राण म्हणजे भगवान श्रीराम. भगवान राम कविकल्पना नसून ते आपले भारतीयांचे इतिहास पुरुष आहेत. महर्षी वाल्मीकि आणि भगवान श्रीराम हे समकालीन आहेत. श्रीरामाचा काळ नेमका कोणता यावर चर्चा होत असली, तरी सर्व विद्वानांचे मतसार घेतले तर तो कालावधी किमान इ. स. पूर्व ७००० असावा. म्हणजे आजपासून ९००० वर्षांपूर्वीचा असेल. त्या काळात बखरी किंवा पत्र नव्हते तर महापुरुषांचा इतिहास काव्यरूपात लिहिला जात असे. रामायण या महाकाव्यात भगवान श्रीरामांचे चरित्र प्रत्यक्ष साक्षीदार असणाऱ्या महर्षी वाल्मीकि ऋषींनी लिहिले आहे. स्वतः वाल्मीकिच रामायणात युद्धकांडात १२८ व्या सर्गात ११४ व्या श्लोकात लिहितात-

**पूजयश्च पठेश्चैव, इतिहासं पुरातनं ।**

वाल्मीकि आदिकवी आहेत. त्यांनी स्पष्ट लिहिले की, हा इतिहास आहे. आपण दरवर्षी श्रीरामनवमी म्हणजे भगवान रामचंद्रांचा जन्म दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करतो. जयंती किंवा पुण्यतिथी या काल्पनिक व्यक्तींच्या नसतात तर त्या अस्तित्वात होत्या त्या महापुरुषांच्याच साजऱ्या होतात. भारताचा भूगोल पाहिला तर वाल्मीकि रामायणात उल्लेख असलेली अयोध्या नगरी, श्रीलंका, पंचवटी, किश्किंधा अशा अनेक नगरी आजही अस्तित्वात आहेत. वाल्मीकि रामायणात उद्धृत नद्या, पर्वत आणि अरण्य आजही अस्तित्वात आहेत. गंगा, यमुना, मंदाकिनी, गोदावरी इत्यादी नद्या, ऋषमुख पर्वत, विंध्य, हिमालय, महेंद्र, मलय असे पर्वत इतिहाससाक्ष आहे. ज्या रामसेतूला तोडण्याचा प्रयत्न झाला तो रामसेतू कसा बांधला, याचे वर्णन युद्धकांडात २२ व्या सर्गात ६० व्या आणि ६५ व्या श्लोकात आहे.

**हस्तिमात्रांत महाकायः, पाषाणश्च महाबलः ।**
**पर्वतांश्च समुत्पाट्य, यंत्रैः परीवहंतीच ॥**



रामसेतू तयार करताना नळाने हत्तीच्या आकाराच्या शिळा, महेंद्र पर्वतासारखे पर्वत कापून यंत्रांच्या साह्याने आणल्याचे वर्णन आहे.

'तरुभिःसेतू बध्नंति वानरः।' म्हणजे मोठमोठ्या वृक्षांची लाकडे त्या सेतूवर लावली होती. हा सेतू बांधताना पाच टप्पे पाडले होते. त्यात अनुक्रमे १४ योजने, २०, २१, २२, २३ अशा पाच टप्प्यांत १०० योजने हा सेतू तयार केल्याचे वर्णन आहे. हा सेतू आजही अस्तित्वात आहे. भगवान ज्या मार्गाने अयोध्या ते पंचवटी आणि पंचवटी ते श्रीलंका गेले तो मार्ग, ती स्थाने आजही अस्तित्वात आहेत. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलात भगवान रामभद्रांचा स्पष्ट उल्लेख आहे.

**भद्रो भद्रया सचमान आगात्स्वसारं जारो अभ्येति पश्चात् ।**
**सुप्रकेतैर्द्युभिरग्निर्वितिष्ठन्नुशद्भिर्वर्णैरभि राममस्थात् ।**

इथे भद्र म्हणजे रामभद्र, भद्राया म्हणजे सीतामाता, इथेच रावणाचाही उल्लेख आहे.

याज्ञवल्क्य स्मृतीत भारद्वाज संहितेतही स्पष्ट उल्लेख आहे.

**अवताराः बहवः सन्ति कलाश्चांशविभुतयः।**
**राम एव परंब्रह्म सच्चिदानन्दाव्ययम्॥**

कला, अंश, अंशांश, विभूती असे अवताराचे प्रकार सांगतांना राम हे सच्चिदानंद स्वरूप परब्रह्म असल्याचा उल्लेख आहे. स्वतः श्रीराम मात्र मी मनुष्यच आहे, राजा दशरथाचा मी पुत्र असल्याचे सांगतात.

**आत्मानं मानुषं मन्ये रामं दशरथात्मजम् ।**
**योऽहं यस्य यतश्चाहं भगवांस्तद्ब्रवीतु मे ॥**

कितीतरी ठिकाणी भगवान रामचंद्रांचा प्रत्यक्ष पुरावा दिसतो. अभ्यासकांनी प्रचंड अभ्यास करून अयोध्या ते श्रीलंका हा मार्ग शोधून काढला आहे. महाकुंभ मेळ्यात गेलेल्या कोट्यवधी लोकांनी त्रिवेणी संगम काठावर श्रीराम कुठे थांबले होते, गुह राजांनी त्यांना गंगापार कुठल्या स्थानावरून केले ती स्थाने पाहिली आहेत. महाकवी कालिदासांनी रघुवंशात वर्णन करताना इथे कोणती झाडे आहेत, मसाल्याचे पदार्थ, मोती-शिंपल्याची शेती यांचे वर्णन आहे.

अज राजांच्या काळातील सर्व बाबी आजही जशाच्या तशा जुळतात. महाभारत युद्धात देशोदेशीच्या राजांनी सहभाग नोंदविला होता.याच युद्धात भगवान श्रीरामांच्या साधारण ३२ व्या पिढीतील राजा बृहद्वल यांनी सहभाग घेतल्याचे महाभारत सांगते. अनेक साधुसंतांनी आपल्या ग्रंथातून भगवान श्रीरामाचा उल्लेख केलेला आढळून येतो. 'श्रीगुरुग्रंथसाहेब' या पवित्र ग्रंथात अडीच हजार वेळा श्रीरामनाम आहे. उत्तरेत तुलसीरामायण, मराठीत भावार्थ रामायण, पंजाबीत गोविंद रामायण, कानडीत पंप रामायण, तेलगूत मल्लरामायण, तामिळमध्ये कंब रामायण, बंगालीत कृत्तिवास रामायण इतकेच नाही तर आंग्ल, जर्मन, इटालियन, चिनीसह अनेक विदेशी भाषांत रामायण लिहिले गेले आहे. त्यातील कुटुंबव्यवस्था, एकमेकांविषयीचा जिव्हाळा, प्रेम आदर, संस्कार याबद्दल सर्वांनाच आस्था आहे. श्रीराम हे इतिहासपुरुष आहेत आणि श्रीरामायण हा अस्सल इतिहास आहे.

या देशात आदर्श घ्यावा असे तीन युगपुरुष राजे होऊन गेले ते म्हणजे राजे श्रीरामचंद्र, राजे श्रीकृष्णचंद्र आणि राजे छत्रपती शिवाजी महाराज. हे तिन्ही राजे आपला इतिहास आहेत. ते आपले प्रेरक आहेत. म्हणूनच भगवान श्रीराम हे आपले आदर्श आहेत. ते काल्पनिक पात्र नसून ते आपला देदीप्यमान आणि अस्सल इतिहास आहे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### एक तरी हायब्रीड मार्गिका हवी !

एमएसआरडीसी महामंडळाच्या अखत्यारीतील टोलनाक्यांवर फास्टॅगद्वारे पथकर न भरणाऱ्या वाहन चालकांकडून दुप्पट कर आकारला जाणार, त्यासाठी सर्व मार्गिका फास्टॅगमध्ये रूपांतरित करण्यात आल्याची बातमी वाचण्यात आली. खरंतर दुप्पट आकार स्वीकारणार हे नाही म्हटलं तरी अन्यायकारक आणि वाहनचालकांना त्रासदायक, एक प्रकारे भुर्दंडच आहे असं म्हटल्यास ते चुकीचे होईलच असे नाही? एमएसआरडीसीने याबाबत पुनर्विचार करून निदान एक तरी मार्गिका हायब्रीड पद्धतीची ठेवण्यात यावी जेणेकरून अन्य मार्गानेही वाहनचालकांना आपला पथकर भरता येईल.

**विश्वनाथ पंडित**/९५८८४५०४४२

### विदर्भ सिंचन अनुशेष अन्यायकारक

नुकतीच तरुण भारतात विदर्भ सिंचन अनुशेष प्रकरणी एक बातमी प्रसिद्ध झाली, ती अशी की, विदर्भ सिंचन अनुशेष प्रकरणी मुख्य सचिवांना शेवटची संधी. तीन आठवड्यांत उत्तर सादर करण्याचा न्यायालयाचा आदेश.

विदर्भातील केवळ ३५ टक्के सिंचन प्रकल्प पूर्णत्वास गेले आहेत. सिंचन प्रकल्पाचा अनुशेष का? अशी विचारणा करीत राज्याच्या मुख्य सचिवांनी यावर तीन आठवड्यांत उत्तर द्यावे असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला. विशेष म्हणजे अनुशेषाबाबत उपाययोजना करण्यासाठी वारंवार आदेश देऊनही पूर्तता न झाल्यामुळे मुख्य सचिवांना अवमानना नोटीस बजावण्याचे संकेतच न्यायालयाने दिले होते. विदर्भातील एकूण १३१ प्रस्तावित प्रकल्पांपैकी केवळ ४६ अर्थात सुमारे ३५ टक्के सिंचन प्रकल्प पूर्ण झाले आहेत. त्यातच राज्य सरकार बंद पडलेले प्रकल्प सुरू करीत आहे, अशी माहिती खुद्द राज्याचे तत्कालीन मुख्य सचिव डॉ. नितीन करीर यांनी दिली होती.

देशामध्ये विदर्भात शेतकरी आत्महत्या सर्वांत जास्त होत आहे असे असतानाही अशा प्रकारे सिंचन अनुशेष असावा, ही दयनीय स्थिती आहे. सांगली येथील टेंभू प्रकल्पासाठी ६००० कोटी, तर पुण्यातील एका नदी प्रकल्पासाठी ४००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. अशात ११ जिल्ह्यांच्या विदर्भाला केवळ दोन हजार कोटी दिले जातात, हे अत्यंत अन्यायकारक आहे.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

### छावाची शिकवण

'छावा' चित्रपट प्रदर्शित झाला आणि पुन्हा इतिहासाची उजळणी झाली. काही जणांना पहिल्यांदाच इतिहास समजला. आपला समाज जणू जागृत झाला. काहींनी चित्रपट गृहातच संताप व्यक्त केला तर काहींनी देशभक्तीचे नारे देऊन देशाप्रति प्रेम व्यक्त केले. धर्मवीर आणि स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराजांचा झालेला छळ पाहून औरंगजेबाचे थडगे हटवून टाकण्याची मागणी केली . समजा ती मागणी मान्य झाली तर पुढे काय? मग पुन्हा मराठा आरक्षणाची आठवण होईल. दुसरी जात त्याला विरोध करेल. काही जातींना भटक्या जातीतून मागासवर्गीयांत टाकण्यास आंदोलन होईल, मग मागासवर्गीय त्याला विरोध करतील. त्यावेळी कुठे जाते आपली देशभक्ती? छत्रपती शिवरायांना आणि छत्रपती संभाजी राजांना ही जाती जातीत तेढ अपेक्षित नाहीच. आजची गरज जातिविरहित समाजाची. ज्यावेळी संपूर्ण हिंदू समाज जातिविरहित होईल तोच काळ खरा सुवर्ण युग असेल. आम्ही सारे एक आहोत हे दाखवण्यासाठी पाकिस्तान विरुद्ध कोणत्याही स्पर्धेची व युद्धाची गरज नाही किंवा कुंभमेळ्याची गरज नाही. आपल्या समाजाला इतिहास काळापासून फितुरीची जी कीड लागली आहे, ती नाहीशी करून आपण सर्व एक होऊन जातिविरहित हिंदू समाजाची निर्मिती करू. हीच खरी छावा या चित्रपटाची शिकवण आहे .

**किशोर केळापुरे**/९८२३०४७९२४

### शालेय शिक्षण सक्तीचे करा

केंद्र सरकारने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) अंतर्गत इयत्ता ११वी व १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी शालेय शिक्षण सक्तीचे करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जात सुधारणा घडवून आणण्यासाठी महत्त्वाचा ठरू शकतो. त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्य शासनानेही इयत्ता ११वी व १२वीच्या विद्यार्थ्यांसाठी शालेय शिक्षण सक्तीचे करण्याचा विचार करणे गरजेचे आहे. सध्या अनेक विद्यार्थी कॉलेज टाईपच्या नावाने खाजगी शिकवणी वर्गात धुमाकूळ घातला असून त्यांचे शिक्षण बाह्य शिक्षण संस्थांवर अवलंबून आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार आणि नियोजनबद्ध शिक्षण मिळावे, तसेच शालेय जीवनातील शिस्त, शैक्षणिक वातावरण आणि एकसंध अभ्यासक्रम यांचा लाभ मिळावा, यासाठी हा निर्णय आवश्यक आहे. त्यामुळे राज्य शासनाने लवकरात लवकर हा निर्णय घ्यावा.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### डायल ११२ वर खोटा कॉल; गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १ एप्रिल -**

डायल ११२ वर खोटा कॉल करणाऱ्यावर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनायक विलास गायकवाड (रा. निवारा ानगर, सिध्द हनुमान मंदीर जवळ, सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. एमआयडीसी पोलिस ठाण्यातील पोलिस शिपाई सोमनाथ वाघमारे हे २७ मार्च रोजी पोलिस ठाण्याकडील पीसीआर मोबाईल १ मध्ये ड्यूटीवर होते. त्यावेळी त्यांना मध्यरात्री पावणे दोनच्या सुमारास डायल ११२ वरून कॉल आला की, गणेश टेक्स्टाईल, एमआयडीसी, सोलापूर येथे कॉलर घटनास्थळी असून कॉलरच्या भावाने मर्डर केला आहे. त्यामुळे पोलिस शिपाई वाघमारे यांनी तात्काळ घटनास्थळ गाठले व चौकशी केली. त्यावेळी विनायक गायकवाड याने मीच डायल ११२ वर कॉल केला होता अे सांगितले. त्यामुळे पोलिसांनी कॉलच्या अनुषंगाने चौकशी केली असता अशी कोणतीही घटना घडली नसल्याचे दिसून आले. त्यामुळे डायल ११२ वर गायकवाड याने खोटा कॉल केल्याचे निष्पन्न झाल्याने याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**खोटा कॉल करणाऱ्यास १ वर्षे कारावास किंवा १० हजार रुपये दंडाची शिक्षा**


कोणीही डायल ११२ अथवा इतर कोणत्याही माध्यमातून खोटे कॉल करू नयेत. खोटे कॉल करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होऊन संबंधितास १ वर्षाचा कारावास किंवा १० हजार रुपये दंडाची शिक्षा होऊ शकते, असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

### 'फास्टॅग'द्वारेच टोल वसुली; रोखीने भरल्यास लागणार दुप्पट टोल

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास (एमएसआरडीसी) यांच्या अखत्यारितील टोल फास्टंगद्वारे पथकर न भरणाऱ्या वाहनांकडून दुप्पट पथकर आकारला जाणार आहे. त्याची अंमलबजावणी सुरू १ एप्रिलपासून होणार आहे. त्यानुसार टोलनाक्यांवरील सर्व मार्गिका फास्टंगमध्ये परावर्तित करण्यात आल्या आहेत. दरम्यान, टोल नाक्यांकर फास्टंगच्या जोडीला हायब्रीड पद्धतीनेही टोल वसुली केली जात असल्याने दोन मार्गिका हायब्रीड पद्धतीच्या ठेवण्यात आल्या आहेत. त्यामध्ये रोख, स्मार्ट कार्ड, पीओएस, डेबिट कार्ड, क्यूआर कोड, आदींद्वारे टोल स्वीकारला जात होता. मात्र, आज, मंगळवारपासून या हायब्रीड मार्गिका बंद करून सर्व मार्गिका फास्टैग, मार्गिकेत रूपांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे एम एसजारडीसीमार्फत टोल वसुली होणाऱ्या नऊ रस्ते प्रकल्पांतर्गत येणाऱ्या सर्व टोल नाक्यांवर केवळ फास्टंगमार्फतच टोल वसूल केला जाणार आहे. नव्या निर्णयामुळे फास्टॅग नमलेल्या वाहनांकडून दुप्पट शुल्क आकारले जाणार आहे. त्यामुळे वाहन चालकांनी फास्टंग स्टीकर खरेदी करावेत, असे आवाहन अधिकाऱ्यांनी केले आहे.

# शहरात गळफास घेऊन आत्महत्येच्या दोन घटना



### विवाहितेने सार्वजनिक पाण्याच्या टाकीला साडीने घेतली गळफास

### दुसऱ्या घटनेत राहत्या घरात गळफास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल -**

विवाहितेने राहत्या घराच्या परिसरातील सार्वजनिक पाण्याच्या टाकीला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार सोमवारी रात्री १२.३० च्या सुमारास उघडकीस आला. दरम्यान यामकरणातील मयत महिलेच्या पतीनेदेखील गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या घटनेला २४ तासदेखील पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत विवाहितेनेदेखील गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. पूजादेवी विनायक पवार (वय २५, रा. भगवान नगर, सोलापूर) असे विवाहितेचे नाव आहे. दरम्यान पूजादेवी हिचा पती विनायक पवार यांनीदेखील ३१ मार्च रोजी रात्री सव्वा बाराच्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. भगवान नगरातील सार्वजनिक पाण्याच्या टाकीला पूजादेवी हि गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आली. हा प्रकार मंगळवारी रात्री १२.३० वाजता उघडकीस आला. त्यानंतर तिला बेशुध्दावस्थेत जेलरोड पोलीस ठाण्यातील हवालदार कांबळे यांनी मध्यरात्री १.४० वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच ती मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

दुसऱ्या घटनेत उत्तर सदर बझार परिसरातील कुंभार गल्लीत मंगळवारी रात्री १.३० च्या सुमारास एकाने राहत्या घरातील अँगलला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. राम श्रीमंत आळसंदे (वय ५०) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. मंगळवारी रात्री दीडच्या सुमारास राम हे घरातील छताच्या लोखंडी अँगलला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. ही बाब लक्षात येताच नातेवाईकांनी त्यांना गळफासातून सोडवून खाली उतरवले. त्यांना बेशुध्दावस्थेत पुतण्या किरण मिसालोलू याने रात्री २.३० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.



### 'दयानंद'च्या प्रा. सोनवणे यांना पीएच.डी.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

दयानंद महाविद्यालयातील स्वप्नगंधा सोनवणे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून विद्यापीठाचे प्र-कुलगुरु लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते पीएच. डी. प्रदान करण्यात आली. बाह्य परीक्षक म्हणून डॉ. होमी भाभा स्टेट यूनिवर्सिटीचे डॉ.मनोहर पडूळ, सोलापूर विद्यापीठातील सायन्स आणि टेक्नॉलॉजीचे डीन डॉ.प्रशांत पवार, विदयापीठाचे सिनेट सदस्य वीरभद्र दंडे,डॉ.रमेश सोनवणे,रेखा सोनवणे, समन्वयक डॉ. अनमोल वळसंगे यांची उपस्थिती होती.. प्रा. स्वप्नगंधा सोनवणे यांनी जैवतंत्रज्ञान विषयातील इंवित्रो स्क्रिनिंग ऑफ सम मेडिसिनल प्लांट्स फॉर अँटीहाइमलीटीक अँड अँटिऑक्सिडंट ऍक्टिव्हिटी ऑन रॅट या विषयावर प्रबंध सादर केला आहे. या शोध कार्यासाठी प्राध्यापक डॉ.लक्ष्मीकांत दामा यांचे मार्गदर्शन लाभले.

## शिक्षण विस्ताराधिकारी पदोन्नती प्रक्रिया लवकरच

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ एप्रिल -**

विस्ताराधिकारी पदोन्नती प्रक्रियेवेळी विविध शिक्षक संघटनांनी हरकती घेतल्या होत्या. त्या हरकती प्राथमिक शिक्षण विभागाने दूर केल्या आहेत. त्यामुळे आता विस्ताराधिकारी पदोन्नती प्रक्रिया लवकरच होणार आहे.

प्राथमिक शिक्षण विभागाने विस्ताराधिकारी पदोन्नतीमधील हरकती दूर करुन पदोन्नतीसाठी अंतिम यादी बनविली आहे. ती यादी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांच्याकडे पाठवून पदोन्नती प्रक्रियेसाठी तारीख घेण्यात येणार असल्याचे प्राथमिक शिक्षण विभागाने सांगितले.

**सीईओ जंगम ठरवणार तारीख**

विस्ताराधिकारी पदोन्नतीवेळी शिक्षक संघटनांनी हरकती घेतल्या होत्या. त्या सर्व हरकती दूर केल्या आहेत. पदोन्नतीची यादी अंतिम झाली आहे. सीईओ कुलदीप जंगम यांनी तारीख ठरविल्यानंतर पदोन्नती प्रक्रिया सूरू होईल.

**- कादर शेख, शिक्षणाधिकारी, प्राथमिक**

# विजापूर रोडवरील अवैध दारू धंदे बंद करा

### राज्य उत्पादन शुल्क कार्यालयावर उबाठाची निदर्शने




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ एप्रिल -**

सैफुल ते सोरेगाव सर्व्हिस रोडवर बेकायदेशीर दारू धंद्यांचा ऊत आला आहे. आयटीआय पोलीस चौकी जवळ असलेल्या चहा कॅन्टीन, चायनीज गाड्या, अंडा आम्लेट गाड्या व पान टपरींवर बिनधास्त दारूची विक्री चालू आहे. या व्यवसायांना राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांचा वरदस्त आहे. हप्ते घेऊन हे सदरचे व्यवसाय चालवले जात असल्याने उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांचे नेतृत्वाखाली सोम वार दि. १ एप्रिल रोजी निदर्शने करण्यात आली.

या रस्त्यावर दररोज दुपारी रात्री उशिरापर्यंत या भागात दारुड्यांचा बाजार भरतो. या भागातील नागरिकांना चालणे चालत जाणे मुश्किल झाले आहे. या भागात शिक्षण देणारी आयटीआय सारखी शिक्षण संकुल आहे.इथे येणाऱ्या विद्यार्थ्यांना या अवैध धंद्यांचा मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे. जवळच असलेल्या मंदिरासाठी चालत जाणाऱ्या महिलांना दारुड्यांच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे, वेळप्रसंगी छेडछाडीचे प्रकार घडत आहेत अनुचित प्रकार घडण्याची शक्यता आहे.

उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेच्या वतीने यापूर्वी निवेदन देऊन इशारा दिला होता, तरी देखील राज्य उत्पादन शुल्कच्या अधिकाऱ्यांना जाग आली नाही. त्यामुळे आंदोलन करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. राज्य उत्पादन शुल्क विभागाचा अधिकार असो, हप्ते घ्या अवैद्य धंदे चालू ठेवा, पाच हजार रुपये द्या ओपन परमिट रूम चालवा, सात हजार रुपये द्या ओपन दारू धंदा चालवा, शिवसेना बाळासाहेब ठाकरे गटाचा विजय असो अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला होता.

या आंदोलनात शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष पाटील, उपजिल्हाप्रमुख खंडू सलगरकर, उपशहर प्रमुख शिवा माळी, परम




सोलापूर : न्यू पाच्छा पेठ, पाथरुट चौक येथे स्व.महेश कोठे यांच्या जयंतीनिमित्त पाणपोईचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ बंदपट्टे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रशीद शेख, ऋषीकेश अलकुंटे, राहुल मुदगल, शुभम मोरे, अनिल गायकवाड उपस्थित होते.

# आजपासून टोल दरवाढ; जड वाहनांसाठी विजापूर रोड झाला महाग

**● सहा नाक्यांवर वर्षात ३९० कोटींची वसुली तर सुमारे २१५ कोटी टोल सावळेश्वर व वरवडे या नाक्यांवर केला जातो वसूल**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ एप्रिल**

राज्यात आजपासून राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने टोलच्या दरात ५ रुपयांची वाढ होणार असून, चारचाकी वाहनाला कमीत कमी ६५ रुपये तर जास्तीत जास्त ८५ रुपये टोल आकारला आणार आहे.

चारचाकी वाहनाला विजयपूर महामार्गावर सर्वाधिक म्हणजे ८५ रुपये टोल आकारणी होणार आहे. पुणे महामार्गावर धावणाऱ्या ट्रक तसेच बसेसना २६० रुपये टोल लागणार आहे. तर, विजयपूर हायवेवर २८० रुपये टोल लागणार आहे. दरम्यान, राष्ट्रीय प्राधिकरणाने राजमार्ग १ एप्रिलपासून नवीन टोल दर जाहीर केले आहे. नवीन दरानुसार टोल आकारणी करावी, असे आदेश प्राधिकरणाने दिले आहेत. अक्कलकोट हायवेवर यापूर्वी ६० रुपये टोल लागायचा. आता मंगळवार,( दि.१) एप्रिलपासून ६५ रुपये टोल लागणार आहे. २४ तासांकरिता ११५ रुपये लागणार आहे. पुणे हायवेवर चारचाकी वाहनांना पूर्वी ७० रुपये होता. मंगळवारपासून यात ५ रुपयांची वाढ होणार आहे. तुळजापूर महामार्गावर चारचाकी वाहनांना यापूर्वी ७० रुपये टोल लागायचा. आता ७५ रुपये लागणार आहे.

| महामार्ग | धावणाऱ्या वाहनांची संख्या |
|---|---|
| पुण | ४६ हजार |
| हैदराबाद | २१ हजार |
| अक्कलकोट | २२ हजार |
| सांगली | १४ हजार ५०० |
| विजयपूर | २६ हजार |
| तुळजापूर | २३ हजार |

**सोलापूर जिल्ह्यात एकूण सहा टोलनाके**

सोलापूर जिल्ह्यातील ६ टोलनाक्यांवर वर्षाकाठी ३१० कोटी १२ लाखांची टोलवसुली केली जाते. रोज सरासरी दीड लाखाहून अधिक वाहने या टोलनाक्यांवरून धावतात. पुणे हायवेवरील सावळेश्वर तसेच वरवडे या दोन टोलनाक्यावर वर्षाकाठी २१५ कोटींची टोल आकारणी केली जाते. सर्वांत कमी टोल सोलापूर-सांगली महामार्गावरील इंचगाव टोलनाक्यावर वार्षिक ३० कोटी रुपये टोल जमा होतो. अक्कलकोट हायवेवरील वळसंग ३१.२ कोटी रुपये, सोलापूर सांगली महामार्गावरीन अनकढाळ वार्षिक ३७ कोटी ८ लाख रुपये टोल जमा होतो.

# प्रायोगिक नाटकांचे आयुष्य वाढले पाहिजे : प्रा.अमोल देशमुख

### जागतिक रंगभूमी दिनानिमित्त व्याख्यान




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १ एप्रिल -**

राज्य नाट्य स्पर्धेतील प्रायोगिक नाटकांचे जास्तीत जास्त प्रयोग होणे गरजेचे आहे. आपण नवीन मतप्रवाह स्वीकारले पाहिजेत. त्याच त्या साचेबंद नाटकांच्या विषयांच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत. आपल्याला आवडतं ते नाटक करण्यापेक्षा जगाला काय आवडतं याचा विचार करून नाटके निर्माण केली पाहिजेत. यासाठी प्रायोगिक नाटकांचे आयुष्य वाढले पाहिजे असे मत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे नाट्यशास्त्र विभागाचे प्रा.अमोल देशमुख यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूरच्या वतीने जागतिक रंगभूमी दिनानिमित्त ''रंगभूमीवरील बदलते मतप्रवाह'' या विषयावर प्रा. देशमुख बोलत होते. प्रारंभी जागतिक रंगभूमी दिनाचे औचित्य साधून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी मान्यवरांच्या हस्ते नटराजाच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. जागतिक रंगभूमीचे महत्व सांगतान प्रा. देशमुख यांनी लेखक, दिग्दर्शक, कलावंतांनी नाटकाकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. असे सांगून जागतिक रंगभूमीचा इतिहास थोडक्यात सांगितला. आय.टी.आय. या संस्थेने १९६२ साली जागतिक रंगभूमी दिन संपन्न केला. यामागे कलावंतांना प्रोत्साहन देणे नाट्यकले विषयी आवड निर्माण करणे. आदि हेतूंनी हा दिन साजरा करण्यात आला. अशी माहिती दिली. पु.ल.देशपांडे यांच्या साहित्यातील अघळपघळ या कथासंग्रहातील भाषाविषयक धोरण या लेखाचे वाचन ज्येष्ठ रंगकर्मी, आणि नाट्य परिषद शाखेचे उपाध्यक्ष अशोक किल्लेदार, सुहास मार्डीकर, सारिका अग्निहोत्री यांनी केले. नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. त्याचे औचित्य साधून प्रस्तुत नाट्य वाचन सादर करण्यात आले. पु.ल.देशपांडे यांनी मराठी भाषेविषयी केलेला सविस्तर व विस्तृत विचार आपल्या नर्म विनोदी शैलीमध्ये मांडला, त्याचे भावपूर्ण वाचन वरील कलावंतांनी करून उपस्थित नाट्य रसिकांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक प्रा.जोतिबा काटे यांनी केले तर आभार ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी यांनी मानले. याप्रसंगी नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह प्रा.जोतिबा काटे, ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य आनंद खरबस, पद्माकर कुलकर्णी, व्यंकटेश रंगम,ज्येष्ठ संगीत संयोजक व कार्यकारणी सदस्य प्रशांत देशपांडे, सल्लागार मंडळ सदस्य मल्लिकार्जुन कावळे, गिरीश दुनाखे, रामकृष्ण अघोर, अमोल धाबळे, अद्वैत कुलकर्णी यांच्यासह नाट्य रसिक उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**
**सोलापुर मंडळ**

**सोलापूर विभागात ए.बी आणि डी. ई.एफ श्रेणीतील स्टेशन्सवर केटरिंग स्टॉल्स (टी स्टॉल्स) आणि डब्ल्यूव्हीएम च्या कामकाजासाठी वार्षिक आणि पाच वर्षांच्या कालावधीसाठी कराराच्या वाटपासाठी ई लिलाव.**

(1) लिलाव कॅटलॉग क्रमांक: SUR-CATG-16. लिलाव सुरू, बंद, तारीख आणि वेळ: प्रारंभ-11.00 सकाळी 15/04/2025 बंद-11.30 सकाळी 15/04/2025. स्थानकांचे नाव: स्थानकांवर चहाच्या स्टॉल्सच्या ई-ऑपरेशनसाठी 60 चौरस फूट क्षेत्रफळ वाटप केले जाईल. 1) मोहोळ, 2) दुधनी, 3) माढा 4) भिगवन 5) कुर्डुवाडी 6) मोडलिंब 7) लातूर 8) बार्शीन टाउन 9) उस्मानाबाद 10) आराग. पद्धत: आयरेप्स-ई लिलावाद्वारे ई-लिलाव (लीज मॉड्यूल). निविदेचा कालावधी: वार्षिक परवाना शुल्क आणि चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी 10% वाढीसह 5 वर्षे. (2) लिलाव कॅटलॉग क्रमांक: SUR-WVM-11. लिलाव सुरू, बंद, तारीख आणि वेळ: सुरुवात- दुपारी 12.00 16.04.2025 बंद- दुपारी 12.30 16/04/2025. स्टेशनचे नाव: पाणी विक्रेता यंत्रे-क्लस्टर आधारावर 1) वाडी 2) कुर्डुवाडी. पद्धत: आयरेप्स-ई लिलावाद्वारे ई-लिलाव (लीज मॉड्यूल). निविदा कालावधी: वार्षिक परवाना शुल्क आणि चौथ्या आणि पाचव्या वर्षासाठी 10% वाढीसह 5 वर्षे. वेबसाइट पत्ता:- सर्व ई-लिलाव तपशील, संबंधित माहिती आणि कागदपत्रे मध्य रेल्वे/भारतीय रेल्वे पोर्टल http://www.ireps.gov.in/ वर उपलब्ध आहेत. सहभागींनी अर्ज करण्यापूर्वी वेबसाइटला भेट देण्याची विनंती केली आहे.
**1.** निविदा सूचना क्रमांक **SUR-CTG-16 2.** निविदा सूचना क्रमांक **SUR-WVM-11**
**ACM/TC/SUR**
Sai/SUR/42
**अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे**

Classifieds

**पाहिजेत**

**जुनी मील कंपाऊंड परिसरात बंगल्यात सकाळी काम करण्यासाठी २५ ते ३० वयोगटातील मुलगा पाहिजे.**
**संपर्क: ९४२३५९००३६/ ९४२०८८५६०७**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि, श्रीपूर ता. माळशिरस जि. सोलापूर**
फोन नं. ०२१८५/२५५२३३,३४४ फैक्स नं. ०२१८५-२५५४३५
E-mail : spssk_sugar@yahoo.com spssk_sale@yahoo.com

**खुली साखर विक्री टेंडर**

आमचे कारखान्याकडे हंगाम २०२४-२५ मध्ये उत्पादीत झालेल्या साखर पोत्यापैकी, माहे एप्रिल २०२५ ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत खुल्या बाजारात साखर विक्रीसाठी ५० किलो एम-३०, एस १-३० व एस २-३० या ग्रेडची सिलबंद टेंडर्स प्रत्येक आठवडयातील सोमवार व गुरूवार या दिवशी स्वतंत्ररित्या मागविणेत येत आहेत. सदरच्या दिवशी सुट्टी असल्यास त्याचे दुसऱ्या दिवशी टेंडर मागविण्यात येईल. त्यानुसार प्रत्येक टेंडरमध्ये विक्री करावयाची साखर पोती डिलीव्हरीची मुदत टेंडरची वेळ त्या त्या टेंडरचे दिवशी कळविली जाईल. सदर दिवशी कारखाना साईटवर ई मेल व फॅक्सद्वारे टेंडर स्विकारली जातील. टेंडर मंजूर झालेनंतर ज्या त्या टेंडरमध्ये खरेदी केलेल्या साखरेची संपूर्ण किंमत ४८ तासाचे आत आर.टी.जी.एस.ने किंवा डी.डी./ चेक ट्रान्सफरद्वारे कारखान्याच्या बँक खातेत जमा करावयाची आहे. दिलेल्या मुदतीत साखर उचलणे बंधनकारक राहील.

टेंडरबाबतचे सर्व अधिकार व्यवस्थापनाने राखुन ठेवले आहेत. तरी टेंडरधारकांनी आपली टेंडर्स वेळेत पाठवावीत.

**डॉ. यशवंत कुलकर्णी** कार्यकारी संचालक | **श्री. कैलास खुळे** व्हा. चेअरमन | **मा.आ.श्री. प्रशांतराव परिचारक** चेअरमन

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**नगर अभियंता सो.म.पा.**
**निविदेसाठी सुचना**

सोलापूर पर्यटन विकास योजनातंर्गत मनपा हद्दीमध्ये टि.पी. ४ फायनल प्लॉट नं. २१ पैकी ०.६५ आर हेक्टर आरक्षण क्र. २१/२२ सोलापूर शहरातील रुपाभवानी मंदिरात दर्शनासाठी येणा-या भाविकांसाठी यात्री निवास बांधणे नगर अभियंता सोलापूर महानगरपालिका नामांकित व अनुभवी कंपन्याकडून/कंत्राटदरांकडून स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी सोलापूर पर्यटन विकास योजनातंर्गत मनपा हद्दीमध्ये टि.पी. ४ फायनल प्लॉट नं. २१ पैकी ०.६५ आर हेक्टर आरक्षण क्र.२१/२२ सोलापूर शहरातील रुपाभवानी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी यात्री निवास बांधणे करीता प्रस्ताव मागवित आहे. तपशिलवार निविदा दस्तऐवजसाठी इच्छुक निविदाकारांनी महाराष्ट्र शासन http//:www. Mahatenders.gov.in या संकेत स्थळावर भेट देऊन माहिती घ्यावी. निविदा ऑनलाईन सादर करावी व सादर करण्याची अंतिम दि.२८/०४/२०२५ (वेळ दुपारी १.०० वाजता पर्यंत आहे.)
**Tendar ID :- 2025_SMC_1166686_1**

**जाहीर नोटीस** M.A.C. PN0. 73/2024

**इस्लामपूर येथील मे. मो.अॅ.क्ले. ट्रॅ. सो यांचे कोर्टात**
**रविंद्र सुखदेव ठोकळे, वगैरे - अर्जदार**
विरूध्द
**कल्पना अमोल दिक्षित, वगैरे - जाबदार**
प्रति,
जाबदार नं. ३
**अमोल सुरेश दिक्षित**
वय-४०, धंदा-वाहन चालक
रा.३८१, दक्षिण कसबाजवळ,
सलाई मारुती मंदिर, दक्षिण सोलापूर ४१३००७

ज्याअर्थी सदर अर्जदार यांनी जाबदार नं ३ यांचे विरुध्द या मे. कोर्टात नुकसान भरपाईचा दावा दाखल केलेला आहे. सदर कामी जाबदार नं. १ यांचे मालकीची मो. सायकल वाहन नं. एमएच.२०-एफएल.-९७२२ जाबदार नं. ३ चालवत असताना त्याचा दि.२७/०८/२०२४ रोजी १२.१५ वाजता हडपसर सासवड रोड शिवशक्ती चौक, फुरसुंगी पुणे रोडवर झालेल्या अपघातात गुंतलेले असून हे आपणांस वेळोवेळी नोटीस पाठविली असता ती न बजावता परत आलेली आहे. व तुमचा सध्याचा पत्ता प्रयत्न करुनही मिळुन येत नाही.

त्याअर्थी सदर जाहीर नोटीसीने तुम्हांस कळविण्यात येते की सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ता. ०८/०५/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकीलांमार्फत मे. कोर्टाकडे लेखी कळवावे अन्यथा मुदतीनंतर कोणाची काहीही हरकत अगर तक्रार नाही असे समजून अर्जदार यांना विनंतीप्रमाणे अगर कायद्यानुसार योग्य तो आदेश पारीत करणेत येईल. नंतर कोणचीही हरकत, तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. म्हणून ही दिली जाहीर नोटीस आज रोजी आमचे सहिनिशी व शिक्क्यानिशी असे. दि. ०१/०४/२०२५

**सही/-** **कनिष्ठ लिपिक** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/-** **एस.ए. गोंजारे** **अधिक्षक** **मे.मो.अॅ.क्ले. ट्रॅ.सो इस्लामपूर**

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### स्वप्नवत् आयपीएल पदार्पणाचे श्रेय हार्दिकला : अश्वनी कुमार

**मुंबई :** मुंबई इंडियन्सकडून पदार्पण करणाऱ्या अश्वनी कुमारने आपल्या यशस्वी पदार्पणाचे श्रेय कर्णधार हार्दिक पंड्याला दिले. मंगळवारी अश्वनीने सांगितले की, कर्णधार हार्दिक पंड्याने इंडियन प्रीमियर लीगमध्ये पदार्पणापूर्वी पंजाबी निर्भय असतात आणि त्याला फक्त तिथे जाऊन प्रतिस्पर्ध्यांमध्ये दहशत निर्माण करण्याची गरज आहे याची आठवण करून देऊन त्याची चिंता कमी केली. पंजाबमधील झांजेरी येथील अश्वनीने केकेआरविरुद्धच्या आपल्या संघाच्या सहज विजयात २४ धावांत चार बळी घेत महत्त्वाची भूमिका बजावली. त्याला सामनावीराचा पुरस्कार मिळाला. चिंताग्रस्त अश्विनीने सामन्यापूर्वी दुपारचे जेवण केले नाही आणि फक्त केळी खाऊन मैदानात उतरला. अश्वनी म्हणाला, ही एक उत्तम भावना आहे. मी कधीच विचार केला नव्हता की मी इतकी चांगली कामगिरी करू शकेन. हार्दिक मला म्हणाला, तू पंजाबचा आहेस आणि पंजाबी निर्भय असतात. गेल्या १० वर्षात आयपीएलमध्ये पहिल्याच चेंडूवर फलंदाज बाद करणारा तो पहिला भारतीय गोलंदाज ठरला.

### उत्तेजक औषधांच्या अतिसेवनाने शेन वॉर्नचा मृत्यू?

**सिडनी :** ऑस्ट्रेलियाचा क्रिकेटपटू शेन वॉर्नच्या मृत्यू प्रकरणात तीन वर्षांनंतर मोठा खुलासा झाला आहे. त्याच्या मृत्यूच्या वेळी घटनास्थळावर 'कामाग्रा' नावाच्या औषधाची बाटली आढळल्याचे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. दुसरीकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याला ही बाब बाहेर सांगण्यास मनाई केल्याचेही त्याने म्हटले आहे. त्यामुळे या प्रकरणी आता विविध चर्चांना उधाण आले आहे. पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, ज्यावेळी आम्हाला या घटनेची माहिती मिळाली, तेव्हा आम्ही तत्काळ त्या ठिकाणी दाखल झालो. त्यावेळी मला तिथे 'कामाग्रा' औषधाची बाटली आढळून आली. मी ही माहिती माझ्या वरिष्ठांना दिली. मात्र, त्यांनी हे औषध घटनास्थळावरून हटवण्यास सांगितले आणि याची माहिती बाहेर सांगण्यास मनाई केली. याप्रकरणी सर्व आदेश वरून येत होते. यात वरिष्ठ पोलिस अधिकारी सहभागी असू शकतात, असा दावाही या पोलिस अधिकाऱ्याने केला.

### प्रशिक्षक रॉब वॉल्टर यांचा राजीनामा

**जोहान्सबर्ग :** दक्षिण आफ्रिकेचे व्हाईट-बॉल मुख्य प्रशिक्षक रॉब वॉल्टर वैयक्तिक कारणांमुळे या महिन्याच्या अखेरीस पदमुक्त होणार आहेत. वॉल्टरने वैयक्तिक कारणांमुळे राजीनामा दिला आहे. क्रिकेट दक्षिण आफ्रिकेने त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे. मार्च २०२३ पासून या पदावर राहणारे वॉल्टर यांनी जागतिक स्तरावर दक्षिण आफ्रिकेच्या अलिकडच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, दक्षिण आफ्रिकेने २०२४ मध्ये त्यांच्या पहिल्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक अंतिम फेरीत पोहोचून इतिहास रचला. मात्र या सामन्यात त्यांना बार्बाडोसमध्ये भारताकडून पराभव पत्करावा लागला आणि ते उपविजेते राहिले. त्यांच्या कार्यकाळात, ५० षटकांच्या संघाने भारतात झालेल्या आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषक २०२३ च्या उपांत्य फेरीतही प्रवेश केला होता.

### सप्तक, थंगराजा गोल्फ अजिंक्यपदमध्ये अव्वल

**ग्रेटर नोएडा :** श्रीलंकेचा एन. थंगराजा आणि स्थानिक खेळाडू सप्तक तलवार यांनी मंगळवारी येथे अदानी इन्व्हिटेशनल गोल्फ अजिंक्यपद स्पर्धेच्या पहिल्या फेरीनंतर संयुक्त आघाडी घेतली.१.५ कोटी रुपयांच्या बक्षीस रकमेच्या या स्पर्धेत, महूचा ओम प्रकाश चौहान, दिल्लीचा अर्जुन प्रसाद, गुरुग्रामचा सुनहित बिश्नोई आणि बांगलादेशचा मोहम्मद सोमरत सिकदर हे जेपी ग्रीन्स गोल्फ अँड स्पा रिसॉर्ट येथे चार अंडर ६८ च्या समान गुणांसह संयुक्त तिसऱ्या स्थानावर आहेत. चालू हंगामातील दोन्ही विजेते, युवराज संधू आणि शौर्य भट्टाचार्य ७० गुणांसह संयुक्तपणे १० व्या स्थानावर आहेत.

### कोलकाता थंडरब्लेड्सचा यूटीटीमध्ये सहभाग

**नवी दिल्ली :** पुणेरी पलटणच्या मालकांनी लीगमधून बाहेर पडल्यानंतर अल्टिमेट टेबल टेनिस (यूटीटी) ने पुढील महिन्यापासून सुरू होणाऱ्या हंगामासाठी कोलकाता थंडरब्लेड्स ही नवीन फ्रँचायझी जोडली आहे. पुनीत बालन ग्रुपच्या मालकीच्या बंगळुरू स्मॅशर्सने पुणेरी पलटणमधून बाहेर पडल्यानंतर त्यांचे नाव बदलून पुणे जग्वार्स केले आहे. कोलकाता फ्रँचायझीचा समावेश आणि पुणेरी पलटणच्या बाहेर पडण्यामुळे, स्पर्धेत आठ संघ शिल्लक राहतील. आगामी हंगामात बंगळुरूचे प्रतिनिधित्व करणारा कोणताही संघ नसेल. नवीन हंगाम २९ मे ते १५ जून दरम्यान अहमदाबादमध्ये आयोजित केला जाईल. कोलकाता फ्रँचायझी युनिकॉप्स समूह आणि एमविकास समूह यांच्या सह-मालकीची आहे. माजी खेळाडू अंशुल गर्ग नवीन फ्रँचायझीचे संघ व्यवस्थापक म्हणून काम पाहतील.

# विजयाच्या हॅट्ट्रिकसाठी खेळणार बंगळुरू

## गुजरात टायटन्सचाही लागणार कस



रजत पाटीदार



शुभमन गिल

◆ **बंगळुरू, १ एप्रिल**

आयपीएल हंगामातील रॉयल चॅलेंज बंगळुरू त्यांचा पहिला सामना बुधवारी गुजरात टायटन्सशी त्यांच्या घरच्या मैदानावर खेळणार आहे. त्यांच्या गोलंदाजांच्या उत्कृष्ट फॉर्ममुळे विजयांची हॅट्ट्रिक नोंदवण्याचे त्यांचे लक्ष्य असेल.

आरसीबीने ईडन गार्डन्सवर कोलकाता आणि चेपॉकवर चेन्नई सुपर किंग्जला हरवून चांगली सुरुवात केली आहे. तथापि, चिन्नास्वामी स्टेडियमची खेळपट्टी फलंदाजांना अनुकूल आहे आणि येथे तीनदा २६० पेक्षा जास्त धावा झाल्या आहेत. रॉयल चॅलेंजर्सचा विश्वास आहे की त्यांचे दोन गोलंदाज जोश हेझलवूड आणि भुवनेश्वर कुमार येथे फलंदाजांना रोखू शकतात.

या आयपीएलमध्ये हेझलवूडने सहापेक्षा कमी सरासरी रेटने धावा दिल्या आहेत, तर चेन्नईविरुद्धच्या सामन्यात भुवनेश्वरने प्रति षटक फक्त ६.६ च्या सरासरीने धावा दिल्या. गुजरात टायटन्सकडे खूप सक्षम फलंदाज आहेत. कर्णधार शुभमन गिल आणि बी साई सुदर्शन यांनी चांगली सलामीची जोडी आहे. बंगळुरू त्यांना चांगली सुरुवात होऊ न देण्याचा प्रयत्न करेल. नवीन चेंडू स्विंग करण्याच्या त्याच्या कौशल्याने भुवनेश्वर आणि अचूक गोलंदाजी करण्याच्या त्याच्या कौशल्याने हेझलवूड एकत्रितपणे त्यांच्यासाठी समस्या निर्माण करू शकतात. डावखुरा वेगवान गोलंदाज यश दयाल देखील उपयुक्त ठरला आहे.

फिरकी विभागात कृणाल पंड्या आणि सुयांश शर्मा कमकुवत दिसत आहेत तर गुजरातकडे रशीद खान आणि आर. साई किशोरसारखे धोकादायक फिरकीपटू आहेत. अशा परिस्थितीत विराट कोहली, फिल साल्ट, कर्णधार रजत पाटीदार आणि देवदत्त पडिक्कल यांची खरी परीक्षा फिरकीपटूंविरुद्ध असेल. गुजरातकडे कागिसो रबाडा आणि मोहम्मद सिराजसारखे वेगवान गोलंदाज आहेत. आरसीबीकडून खेळणाऱ्या सिराजला गुजरातने लिलावात खरेदी केले.

कोहली आणि सॉल्ट यांनी गेल्या दोन सामन्यांमध्ये ९५ आणि ४५ धावांची भागीदारी केली आहे. रबाडाने आतापर्यंत १४ डावांमध्ये कोहलीला चार वेळा बाद केले आहे. (वृत्तसंस्था)

### आजचा सामना

रॉयल चॅलेंज बंगळुरू
वि. गुजरात टायटन्स
**स्थळ :** चिन्नास्वामी स्टेडियम, बंगळुरू
**वेळ:** संध्याकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# पंजाबचा सलग दुसरा विजय; लखनऊला ८ गडी राखून हरवले



## प्रभसिमरन-श्रेयसची अर्धशतके, अर्शदीप सिंगचे तीन बळी

**लखनौ, दि. १ एप्रिल-**

पंजाब किंग्जने आयपीएल २०२५मध्ये सलग दुसरा विजय नोंदविला. मंगळवारी त्यांनी लखनऊ सुपर जायंट्सचा ८ गडी राखून पराभव केला.

लखनऊच्या एकाना स्टेडियमवर झालेल्या सामन्यात पंजाबने १७२ धावांचे लक्ष्य १६.२ षटकांत २ गडी गमावून पूर्ण केले. श्रेयस अय्यर ५२ आणि नेहल वढेरा ४३ धावांवर नाबाद राहिले. प्रभसिमरन सिंगने ३४ चेंडूत ६९ धावांची खेळी केली.

लखनऊकडून दिग्वेश राठीने २ गडी बाद केले. लखनऊकडून निकोलस पूरनने ४४ आणि आयुष बडोनीने ४१ धावा केल्या. एडेन मार्करमने २८ आणि अब्दुल समदने २७ धावा केल्या. अर्शदीप सिंगने ३ विकेट घेतल्या. लॉकी फर्ग्युसन, ग्लेन मॅक्सवेल, मार्को यान्सन आणि युजवेंद्र चहल यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# प्रत्येक सामन्यात माझ्यात सुधारणा करणार

## वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगचा विश्वास

**लखनौ, १ एप्रिल**

डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने त्याच्या यशाचे श्रेय त्याच्यावर होत असलेल्या टीकेला दिले आहे आणि तो प्रत्येक सामन्यात त्याची कामगिरी सुधारण्याचा प्रयत्न करत असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे. शेवटच्या षटकांचा तज्ज्ञ म्हणून वेगाने उदयास येणाऱ्या २६ वर्षीय अर्शदीप सिंगने इंडियन प्रीमियर लीगच्या चालू हंगामातील टायटन्सविरुद्धच्या गुजरात पहिल्या सामन्यात साई सुदर्शन आणि शेरफेन रदरफोर्ड हे महत्त्वाचे खेळाडू बाद करून आपल्या संघाच्या ११ धावांनी विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. गेल्या काही वर्षांत त्याच्या गोलंदाजीच्या कामिगरीबद्दल विचारले असता, अर्शदीपने सांगितले की, माझी कामगिरी चांगली असो वा वाईट, माझ्यासाठी महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रत्येक सामन्यात माझा खेळ एक ते दीड टक्क्यांनी सुधारणे हे आहे. श्रेयस अय्यर या हंगामात पंजाब किंग्जचे नेतृत्व करत आहे.

## डीटीएम हंगामात अर्जुन मैनीचा सहभाग

**मायपथ (जर्मनी) :** भारतीय रायडर अर्जुन मैनी जर्मन टूरिंग कार रेसिंग मालिकेत पाचव्या वर्षी एचआरटी फोर्ड परफॉर्मन्स टीमसाठी सहभागी होणार आहे. गेल्या वर्षी, मैनी ड्रायव्हर्सच्या क्रमवारीत सातव्या स्थानावर राहिला. जो त्याच्या डीटीएम (ड्यूश टॉरेनवॅगन मास्टर्स) कारकीर्दीतील सर्वोत्तम निकाल होता. गेल्या तीन हंगामात (२०२१ ते २०२३), बंगळुरूचा २७ वर्षीय मैनी अनुक्रमे १२ व्या, १९ व्या आणि २० व्या स्थानावर राहिला. नवीन डीटीएम हंगामासाठी अधिकृत चाचणीचा दिवस बुधवारी मोटरस्पोर्ट अरेना ऑशेरस्लेबेन येथे होईल.

# अश्वनीची गोलंदाजी चकित करणारी : रिकल्टन

**मुंबई, दि. १ एप्रिल-**

कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध पदार्पणातच २४ धावा देत ४ गडी बाद करणारा मुंबई इंडियन्सचा गोलंदाज अश्वनीकुमारवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. धडाकेबाज सलामीवीर रायन रिकल्टनने त्याचा सहकारी अश्वनी कुमारचे कौतुक केले आहे. रिकल्टन म्हणाला की, अश्वनी कुमारचा चेंडू भल्या भल्या फलंदाजांना आश्चर्यचकित करतो.

पंजाबच्या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाने सोमवारी कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध तीन षटकांत २४ धावा देत चार गडी टिपले. त्याच्या शानदार गोलंदाजीमुळे मुंबईने केकेआरला १६.२ षटकांत ११६ धावांत गुंडाळल्यानंतर आठ गड्यांनी सहज विजय मिळवला. हंगामातील पहिल्या विजयासह, मुंबई संघ गुणतालिकेत सहाव्या स्थानावर पोहोचला. अश्वनीची गोलंदाजी लोकांच्या विचारांपेक्षा खूपच वेगवान आहे, असे रिकल्टनने वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सामन्यानंतर माध्यमांना सांगितले. हा त्याचा मोठा गुण आहे. तो नवीन चेंडू स्विंग करण्यास सक्षम आहे. दक्षिण आफ्रिकेचा यष्टिरक्षक आणि फलंदाज असलेला रिकल्टन म्हणाला, तो तुम्हाला वाटतो त्यापेक्षा खूप वेगवान आहे आणि त्याचा चेंडूही थोडा खाली राहतो. तो निश्चितच या संघातील सर्वोत्तम खेळाडू आहे आणि येथील खेळपट्टी त्याला अनुकूल आहे. मला त्याला नवीन चेंडूने गोलंदाजी करताना पाहायचे आहे जेणेकरून तो त्याचे इतर कौशल्य दाखवू शकेल. केकेआरच्या रमणदीप सिंगनेही अश्वनीला प्रतिभावान क्रिकेटपटू म्हटले आहे. पंजाबमधील रमणदीप आणि अश्वनी एकाच अकादमीत प्रशिक्षण घेतात. अश्वनी हा एक अतिशय प्रतिभावान क्रिकेटपटू आहे, तो पंजाबचा आहे. आयपीएलची ओळख म्हणजे नवीन क्रिकेटपटूंना त्यांची प्रतिभा दाखवण्याची संधी देणे आणि तुम्हाला त्यांची प्रतिभा पाहता येईल.

## चंडकच्या विराज कदमला राष्ट्रीय तलारबाजी स्पर्धेत कांस्यपदक

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**



उडीसातील (कटक) येथील जवाहरलाल नेहरू स्टेडीयम येथे झालेल्या २६व्या सबजुनियर राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात एस.आर. चंडक स्कूलच्या विराज कदम याने महाराष्ट्राकडून प्रतिनिधित्व करताना कांस्य पदक पटकाविले. तसेच वैयक्तिक प्रकारामध्ये ९ वे स्थान प्राप्त केले. यापूर्वी त्याने सलग दोन वेळा राज्य स्पर्धेत पदक मिळवले होते. त्यास क्रीडा प्रशिक्षक अक्षय माने व शाळेचे क्रीडा शिक्षक धर्मराज कट्टीमनी यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे प्रशालेचे चेअरमन योगेश बियाणी, सचिव डॉ. अर्चना दरक, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अंजली चव्हाण, पर्यवेक्षिका मोनाली संगवे यांनी अभिनंदन केले.

# अंबर क्रिकेट क्लबची विजयी सलामी

## रेल्वेची स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा : प्रशांत सुरवसे सामनावीर

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिटयुटच्या ७८व्या स्कॉट मेमोरियल प्रसिजन क्रिकेट स्पर्धेत अंबर क्रिकेट क्लबने सिंधी इलेव्हन क्लबचा ५६ धावांनी पराभव करीत विजयी सलामी दिली. शानदार अर्धशतक झळकाविणारा प्रशांत सुरवसे सामन्याचा मानकरी ठरला.







**सोलापूर : स्पर्धेचे उद्घाटन करताना रेल्वेचे स्पोर्ट्स ऑफिसर आदित्य त्रिपाठी व मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात सामनावीर पुरस्कार स्वीकारताना प्रशांत सुरवसे.**

रेल्वेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात या स्पर्धेचे उदघाटन रेल्वेचे स्पोर्ट्स ऑफिसर आदित्य त्रिपाठी यांच्या हस्ते झाले. यावेळी रेल्वेचे अधिकारी सचिन गणेर, सीआरएमएसचे उल्हास बागेवाडी, एनआरएमयूचे एस.एल. कांबळे, सोलापूर डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु, वरिष्ठ क्रिकेटपटू के. टी. पवार, राजेंद्र गोटे, रेल्वे इन्स्टिटयूटचे सेक्रेटरी किशोर पिल्ले, खजिनदार विक्रांत पवार, सेक्रेटरी ऋषिकेश यरगल, रेल्वेचे वरिष्ठ क्रिकेटपटू वासुदेव दोरनाल, गौतम बनसोडे, अंबादास तोरा, लियाकत शेख, प्रवीण देशेट्टी, सुदेश मालप व अतुल बांदीवाडीकर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन राजा पटेल यांनी केले. सलामीच्या सामन्यासाठी अशोक डोंबाळे व किरण डिग्गे यांनी पंच तर सचिन गायकवाड यांनी गुणलेखक म्हणून काम पाहिले.

**संक्षिप्त धावफलक : अंबर क्लब :** २० षटकांत ५ बाद १९१ (प्रशांत सूरवसे ६७, जुबेर तांबोळी ३८, विनायक बेऊर १९, महेंद्र ढवान १८, सचिन वांगीकर १८, अमित गोगिया, राजीव आहुजा, सोनू केस्वानी व विजय कुकरेजा प्रत्येकी एक बळी) विजयी विरुद्ध **सिंधी इलेव्हन:** २० षटकांत ६ बाद १३५ (राहुल वाडिया ४४, राजीव आहुजा २७, दिनेश वाडिया १७, आनंद बबलेश्वर २ बळी, शुधांशू भालेराव, सचिन वांगीकर, तुषार म्हेत्रे व विनायक बेऊर प्रत्येकी एक बळी).

**आजचे सामने**

१)अभिसिद्ध क्लब विरुद्ध भंडारी स्पोर्टस क्लब
२) जयहिंद कुर्डुवाडी विरुद्ध चंद्रकांत किल्लेदार क्लब

# महाराष्ट्राच्या पुरुष व महिला संघाची विजयी सलामी

## वरिष्ठ गट ५७वी राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

**पुरी (ओडिसा) दि. १ एप्रिल-**

महाराष्ट्राच्या पुरुष व महिला संघाने ५७व्या वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेची विजयी सलामी दिली. पुरूष संघाने पहिल्या सामन्यात लडाखचा तर दुसऱ्या सामन्यात पंजाबचा पराभव करून गटात अव्वल कामगिरी केली. महिला संघाने तेलंगणाचा पराभव करीत विजयी सुरूवात केली. या राष्ट्रीय खो-खो स्पर्धा अल्टीमेट लिग स्पर्धेच्या धर्तीवर प्रथमच खेळविण्यात येत आहे. त्यामुळे या स्पर्धेत चुरस निर्माण झालेली आहे.

पुरी येथील जिल्हा क्रीडा संकुलात सुरू झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिलांनी तेलंगनावर २९-१२ असा एक डाव राखून १७ गुणांनी दणदणीत विजय मिळविला. महाराष्ट्राच्या प्रियांका इंगळे हिने आक्रमणात ८ गडी बाद केले. संध्या सुरवसे (३.३०मिनिटे) व दीपाली राठोड (२.१० मिनिटे) यांनी संरक्षणाची बाजू सांभाळली. दुसऱ्या डावात संपदा मोरे (२.०० मिनिटे व ४ गुण) व सुहानी धोत्रे (१.३० मिनिटे नाबाद व ४ गुण) यांनी अष्टपैलू खेळी केली. तेलंगणाकडून कात्रावती अनुषा हिने ४ गुण मिळविले. लावण्या (१ मि.) व नागेश्वरी (१ मि) यांची संरक्षणाची लढत अपुरी पडली.

पुरुष गटात महाराष्ट्राने लडाखचा ४६-२० असा एक डाव २६ गुणांनी धुव्वा उडविला. यात कर्णधार लक्ष्मण गवस याने आपल्या धारदार आक्रमणात तब्बल १२ गडी बाद करीत १.१० मिनिटे पळती करताना अष्टपैलू खेळ केला. रुद्र थोपटे (१.१० मिनिटे व ८ गुण), रविकिरण कचवे (१.४० मि. व २ गुण), मिलींद चवरेकर (१.२० मि. नाबाद व ६गुण) व नरेंद्र कातकडे (१.१० मि. व ६ गुण) यानीही अष्टपैलू कामगिरी करीत त्याला साथ दिली. लडाखकडून मोहम्मद आब्बास याने एकाकी लढत दिली.

दुसऱ्या सामन्यात महाराष्ट्र संघाने पंजाबचा (३८-१९) एक डाव २४ गुणांनी पराभव केला. यामध्ये अनितेच चेंदवणेकर (२.३० मि., ३.१० मि. संरक्षण व ४ गुण), विजय शिंदे (४ गुण), प्रतिक वाईकर (१.१० मि. नाबाद संरक्षण व ८ गुण), ऋषिकेश मुर्चावडे (१.१०, १.१० मि. संरक्षण) यांनी महाराष्ट्राच्या विजयात मोलाची कामगिरी केली. पंजाबकडून जीवन सिंग (१.१० मि. संरक्षण), रेहान खान (४ गुण) यांनी चांगला खेळ करण्याचा प्रयत्न केला.





### विदर्भ, कोल्हापूर व महाराष्ट्र पोलिसांचे विजय

विदर्भ, कोल्हापूर व महाराष्ट्र पोलिसांच्या पुरुष व महिला संघानेही सलामीच्या सामन्यात प्रतिस्पर्धी संघावर दणदणीत विजय मिळविले.

**आज झालेले अन्य निकाल - पुरुष :** कर्नाटका वि. वि. गुजरात ३६-१५, ओडिशा वि. वि. मध्य भारत २२-१६, रेल्वे वि. वि. मणिपूर ३०-१६, महाराष्ट्र पोलिस वि.वि. मध्य प्रदेश ४०-२२, कोल्हापूर वि.वि. हरियाना ४४-१९, विदर्भ वि. वि. झारखंड ४५-१०.

**महिला :** कोल्हापूर वि. वि. मध्यप्रदेश ४४-१०, विदर्भ वि वि. बिहार ४८-४, कर्नाटका वि. वि. हिमाचल ३८-१०, केरळ वि. वि. आसाम ३२-१०, महाराष्ट्र पोलिस वि. वि. आसाम १९-९.

# नाशिक प्रबोधिनीच्या पाच खेळाडूंची वरिष्ठ गट राष्ट्रीय खो खो स्पर्धेसाठी निवड

**नाशिक, दि. १ एप्रिल-**

नाशिक जिल्हा खो खो असो. संचलित स्व. सौ सुरेखा ताई भोसले निवासी खो-खो प्रबोधिनीच्या पाच खेळाडूंची पुरुष आणि महिला गटाच्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी विविध तीन संघात निवड झाली आहे.











ही स्पर्धा ३१ मार्च ते ४ एप्रिल दरम्यान जगन्नाथ पुरी ओडिशा येथे आयोजित करण्यात आल्या आहेत. सदर स्पर्धेसाठी दिलिप खांडवी, मनिषा पडेर, वृषाली भोये, निशा वैजल, कौसल्या पवार या पाच खेळाडूंची वरिष्ठ गट राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. नाशिक जिल्हा खो खो असो. च्या ५० वर्षाच्या इतिहासात प्रथमच एकाच वेळी पाच खेळाडूंची निवड राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी झाली आहे. विशेष म्हणजे हे पाच खेळाडू या स्पर्धेत तीन वेगळ्या संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

दिलिप खांडवी हा भारतीय रेल्वे संघाचे, मनिषा पडेर महाराष्ट्राचे तर वृषाली भोये, निशा वैजल, कौसल्या पवार भारतीय विमानतळ प्राधिकरण, स्पोर्ट्स कंट्रोल बोर्ड यांचे प्रतिनिधित्व करणार आहे. दिलिप खांडवी, वृषाली भोये, कौसल्या पवार यांची ही सलग तिसरी वरिष्ठ गट राष्ट्रीय स्पर्धा आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## संक्षिप्त वृत्त



### सांगोला विद्यामंदिरची संस्कृती लोंढे वक्तृत्व स्पर्धेत राज्यात प्रथम

**सांगोला, दि. १ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळ, मुंबई यांच्यावतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये सांगोला विद्यामंदिर प्रशालेची इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी संस्कृती संतोष लोंढे हिने प्रथम क्रमांक पटकाविला व शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या यशाबद्दल संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांच्या हस्ते संस्कृती लोंढे व आई अर्चना लोंढे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य अमोल गायकवाड, पर्यवेक्षक सुरेश मस्तुद, प्रदीप धुकटे, मच्छिंद्र इंगोले उपस्थित होते. स्पर्धेमध्ये संस्कृती लोंढे हिने सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करत 'निसर्गाप्रती माझे कर्तव्य' या विषयावर आपली अभ्यासपूर्ण मांडणी केली. तिला वाङ्मय मंडळ प्रमुख उन्मेष आटपाडीकर, प्रशांत रायचुरे, शैलजा झपके, उमेश नष्टे, अनिता घोंगडे, दत्तात्रय पाटील, संध्या तेली, श्रीकृष्ण वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल सां.ता.शि.प्र.मंडळाचे सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, खजिनदार शंकरराव सावंत, सदस्य विश्वेश झपके, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे यांनी अभिनंदन केले.



### डोळसपणे जीवनाचा आनंद घेऊ या : ॲड. फताटे

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

श्री क्षेत्र तीर्थ दि.३१ (ता.द.सोलापूर) सध्याचे जीवन फारच धावपळीचे झाले आहे. साधने वाढली ,पण मन कशातच रमत नाही यासाठी नामस्मरणात मनाला गुंतून ठेवणे आवश्यक आहे. जीवनाकडे या जगात अंतिम सत्य काय आहे याचा विचार करून डोळसपणे विचार केल्यास जगणे सुंदर होईल, असे विचार ॲड. विक्रांत फताटे यांनी राम लिंगेश्वर सार्वजनिक वाचनालय आयोजित रामनवमी व्याख्यानमालेत मांडले. प्रारंभी श्री रामलिंगेश्वर प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी केले. याप्रसंगी वेदमूर्ती मल्लय्या स्वामी, श्रीशैल चितले, प्रा.सचिन गुरव यांनी व्याख्यानमालेचा आस्वाद घेण्यासाठी आवाहन केले. अध्यक्षीय समारोप वेदमूर्ती बसवराज शास्त्री यांनी केला. सूत्रसंचालन व आभार शिवराज बिराजदार यांनी केले. कार्यक्रमास काशिनाथ बिराजदार, संगप्पा उदंडे, सिध्दाराम कुर्ले, बसवराज कुर्ले, विश्वनाथ पावले, प्रभुलिंग शेळगे, सध्दारुढ स्वामी उपस्थित होते.

### स्व.आप्पासाहेब चव्हाण प्रतिष्ठानतर्फे पुरस्कारांसाठी आवाहन

**पंढरपूर, दि. १ एप्रिल-**

येथील प्रसिद्ध वृत्तपत्रलेखक, कथाकथनकार, साहित्यिक, नाट्यकर्मी, खेळाडू व आदर्श शिक्षक अशा अनेक भूमिकातून पंढरपूरच्या सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात ज्यांनी उल्लेखनीय कार्य केले अशा स्व.आप्पासाहेब चव्हाण यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त सामाजिक, शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना जिल्हास्तरीय पुरस्कार-२०२५ देण्यात येणार आहेत. रोख रक्कम, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, शाल, हार व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप असून या पुरस्कारासाठी जिल्हा स्तरावरावरून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. साहित्यिक क्षेत्रातील पुरस्कारासाठी मागील (२०२२ / २०२३ / २०२४) या तीन वर्षांत प्रकाशित झालेल्या दोन साहित्यकृतीबरोबर साहित्यिकाने छायाचित्रासह आपले परिचय पत्र पाठविणे आवश्यक आहे. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील पुरस्कारासाठी परिचय पत्र व कार्याचा आढावा पाठविणे आवश्यक आहे. स्व.श्री.आप्पासाहेब चव्हाण सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्यावतीने ०४ मे, २०२५ रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे होणाऱ्या कार्यक्रमात मान्यवरांच्या शुभहस्ते सदर पुरस्कार दिले जाणार आहेत. तरी सोलापूर जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रातील व्यक्तींनी आपले प्रस्ताव अमरसिंह आप्पासाहेब चव्हाण (९८२२३६९२९२ / ९८३४७२६७४७) 'वैष्णव' सदन, लक्ष्मी नगर, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय चौकाजवळ, पंढरपूर :-४१३३०४ या पत्त्यावर २० एप्रिल पूर्वी पोहोचतील असे पाठवावेत. अधिक माहितीसाठी कवी रवि वसंत सोनार - ९९२२५१४३००, डॉ. सचिन लादे - ७५८८२१६५२६ व मंदार केसकर - ९४२२३८०१४६ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन अमरसिंह चव्हाण, अमोल चव्हाण व प्रताप चव्हाण यांनी केले आहे.




## निधन वार्ता

### नागबाई भिसे



**तडवळ, दि. १ एप्रिल-**

नागबाई भिसे (वय ७५ वर्ष) यांचे वार्धक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुली, एक मुलगा नातवंडे असा परिवार आहे. त्या सुलेरजवळगे येथील मुख्याध्यापक वसंत भिसे यांच्या मातोश्री होत.

### बापू जाधव



**पिलीव, दि. १ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील बापू निवृत्ती जाधव यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ५६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, चार भाऊ, तीन बहीणी, सुन, नात असा परिवार आहे.

# बायपासवर एकेरी मार्गाची अक्कलकोटच्या व्यापाऱ्यांची मागणी

### मुख्याधिकारी डाके यांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १ एप्रिल-**

शहरातील ए-वन चौक ते मंगरूळे बायपास रस्ता सध्या तेथील कामामुळे बंद आहे. नागरिकांच्या सोयीसाठी येथे एकेरी वाहतूक सुरू करण्याची मागणी व्यापारी महासंघाच्या शिष्टमंडळाने मुख्याधिकारी रमाकांत डाके यांच्याकडे केली आहे.

शनिवारी व्यापारी महासंघ आणि प्रशासनात झालेल्या चर्चेमध्ये यावर तोडगा निघाला असून एकेरी वाहतूक सुरू करण्यावर प्रशासनही सकारात्मक झाले आहे. परंतु यासाठी वेगवेगळ्या विभागांशी चर्चा करावी लागेल. यासाठी देखील तीन ते चार दिवसांचा कालावधी लागणार असल्याचे मुख्याधिकारी डाके यांनी सांगितले. या रस्त्याचे काम गेल्या दोन महिन्यांपासून सुरू आहे. आठ दिवसांपूर्वी एकेरी वाहतूक सुरू होती. परंतु रस्त्याच्या वाढत्या कामामुळे मागच्या गुरुवारपासून एकेरी वाहतूक सुद्धा बंद करण्यात आली आहे. याला पर्याय म्हणून प्रशासनाने बायपास मार्गे ग्रामीण रुग्णालयाजवळून प्रियदर्शनी मंगल कार्यालयाच्या समोरून पर्यायी रस्ता दिला आहे. रस्ता होईपर्यंत या मार्गाचा अवलंब करावा,असे आवाहन नगरपरिषदेने केले आहे. परंतु ए-वन चौक ते मंगरूळे बायपास चौक दरम्यान असलेल्या व्यावसायिकांना याचा फटका बसला आहे. त्यामुळे याठिकाणी व्यापाऱ्यांनी एकेरी वाहतूक सुरू करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. याच पार्श्वभूमीवर मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन याबाबत व्यापारी बांधवांनी चर्चा केली. यावेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष मल्लिनाथ साखरे, शिवसेनेचे तालुका अध्यक्ष संजय देशमुख, मुस्लिम समाजाचे नेते एजाज मुतवल्ली, व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष प्रसन्न हत्ते, प्रशांत केसकर, समर्थ मसुती, विजयकुमार कुलकर्णी, गुरुलिंग येळमेली, रवी मुलगे, अण्णा गुरव, राहुल खमितकर, रवी शानबाग, विनोद मदने, राजेंद्र कारिमुंगी, देवा मालगोंडा, शेखर वाले आदिंसह अन्य व्यापारी उपस्थित होते.



अक्कलकोट शहरात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पुढाकारातून व मुख्याधिकाऱ्यांच्या प्रयत्नातून अनेक विकासकामे सुरू आहेत. ही बाब चांगली आहे. परंतू यात व्यापारी बांधवांचे आर्थिक नुकसान होऊ नये याची काळजी नगरपरिषदेने घ्यावी.
**- मल्लिनाथ साखरे, अध्यक्ष, व्यापारी महासंघ, अक्कलकोट.**

रस्ता खोदून ठेवल्यापासून या भागातील सर्व व्यापारी बांधवांचे प्रशासनाला सहकार्य लाभले आहे. परंतु ऐन उत्सवाच्या काळामध्ये हा रस्ता बंद झाल्याने अडचणी निर्माण झाल्या आहेत. नगरपरिषदेने एका बाजूला रस्ता खुला करून देऊन दुसऱ्या बाजूचा रस्ता करावा.
**- एजाज मुतवल्ली, मुस्लिम समाजाचे नेते**

शहरातील हद्दवाढ आणि मार्केट यार्डच्या भागाला जोडणारा हा रस्ता आहे. या निर्णयामुळे त्यांची गैरसोय होऊ लागली आहे. विकास कामांना आमचा पाठिंबा आहे पण नागरिकांची गैरसोय होऊ नये याची खबरदारी मुख्याधिकाऱ्यांनी घ्यावी.
**- संजय देशमुख, तालुका अध्यक्ष,शिवसेना.**

रोड वाईडिंग, पाणीपुरवठा, विद्युत पुरवठा अशा सर्वच पद्धतीची कामे सध्या या रोडवर सुरू आहेत. तत्काळ तरी शक्य नाही परंतु ही कामे आटोपल्यानंतर या विभागाशी चर्चा करून दोन दिवसात यावर काहीतरी तोडगा काढू.
**- रमाकांत डाके, मुख्याधिकारी, अक्कलकोट नगरपरिषद.**




## शोभायात्रेत मुस्लिम बांधवांकडून पुष्पगुच्छ व पाण्याची बॉटल

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १ एप्रिल-**

गुढीपाडवा नमित्त भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती, हि शोभायात्रा अक्कलकोट शहरातील कारंजा चौक येथे आल्यावर अक्कलकोट मुस्लिम समाजातर्फे शोभायात्रेतील प्रमुख मंडळींना माजी नगरसेवक सद्दाम शेरीकर, अशपाक बरोळगी, नुर शेरिकर, तडमुड फुफा, इरफान दावणा यांनी पुष्पगुच्छ व पाणी बॉटल देऊन स्वागत केले व सामाजिक सलोख्याचा आदर्श घालून दिला. यावेळी अशपाक भाई बळोरगी,नुर शेरिकर, सद्दाम शेरीकर, तडमुड फूफा,इरफान दावणा,शूकुर शेख, रफिक पठाण, मुर्तुज बाजे, वलीअहमद कुरेशी, सोहेल फरास(सामाजिक कार्यकर्ता), हुसेन बळोरगी उपस्थित होते.



## कडबा चोरी प्रकरणी चौघांवर गुन्हा

### ४३ हजार ७०० रुपये किंमतीचा कडबा चोरताना पकडले

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.१ एप्रिल**

मंगळवेढा शिवारातून ४३ हजार ७०० रुपये किंमतीचा ज्वारीचा वाळलेला कडबा २ हजार ३०० पेंढया चोरुन नेल्या प्रकरणी पोलीसांनी ट्रॅक्टरसह ८ लाख ४३ हजार ७०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन गणपती मच्छिंद्र केरकळ (रा.भाळवणी) व अज्ञात तीन इसम यांच्या विरुध्द चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी संजय हरी घाटूळ (रा.मुरडे गल्ली,मंगळवेढा) यांचे सोलापूर रोडला मंगळवेढा शिवारात शेत असून यामध्ये ज्वारीचे पीक घेतले होते. ज्वारीच्या काढणीनंतर शेतात वाळलेला ज्वारीचा कडबा ठेवला होता. दि.३१ मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता वरील आरोपींनी सोनालिका कंपनीच्या बिगर नंबरचा ट्रॅक्टर मध्ये ४३ हजार ७०० रुपये किंमतीचा २ हजार ३०० पेंढ्या फिर्यादीच्या संमत्तीवाचून लबाडीने स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी चोरुन घेवून जात असताना मिळून आले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास मंगळवेढा शहर बीट पोलीस करीत आहेत.




## लडकत यांचे काम प्रेरणादायी : वन परिक्षेत्र अधिकारी राजेंद्र आटोळे

**सदशिवनगर, दि. १ एप्रिल-**

संजय लडकत यांनी वनविभागात ३२ वर्षे केलेले काम इतरांना प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन माळशिरस वन परिक्षेत्र अधिकारी राजेंद्र आटोळे यांनी वन परिमंडळ अधिकारी संजय लडकत यांच्या सेवा निवृत्ती निमित्त आयोजित केलेल्या सत्कार समारंभात बोलताना केले. यावेळी संजय लडकत यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. यावेळी वन विभागातील डी.एन. सावंत, ई.एस.लोखंडे, बी.वी. तांबे, पी.बी. कोंबडे, टी.एस.दिघे, एस.वी.गिते, डी.एस.देवकर, डी.एस. चंदनशिवे, जे.एन.जगदाळे, डी.एस.देवकर, एन.एन.गुंड, सतीश घाडगे, विजय काळे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सन १९९४ मध्ये वन विभागात रुजू झालेल्या वडकत यांनी माळशिरस ,सोलापूर, सांगोला, पुणे याठिकाणी सेवा बजावली.

## अक्कलकोटमधील शाही ईदगाह मैदानावर सामुदायिक नमाज पठण

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ एप्रिल-**

अक्कलकोट शहरातील शाही ईदगाह मैदानावर अक्कलकोट शहर व ग्रामीण भागातील मुस्लिम बांधवांनी ईद -उल फित्र अर्थात रमजान ईदची सामुदायिक नमाज पठण करत मोठ्या उत्साहाने ईद साजरी केली.

नमाज पठणसाठी सकाळी ८ :३० ला तमाम मुस्लिम बांधव ईदगाह मैदानात हजेरी लावत, ईदगाह येथे सामुदायिक नमाज पठण केली. अक्कलकोट ईदगाह कमिटीकडून नमाज पठण करण्यासाठी आलेल्या मुस्लिम बांधवांना नमाज पटनासाठी उत्तम चटाया अंथरण्यात आले होते,

यावेळी मौलवी यांनी आपल्या भाषणात मध्ये सांगितले, मुस्लिम तरुणांनी जुगार, मावा,गुटखा, दारू तसेच सोशल मीडियावरील असे कोणतेही पोस्ट,स्टेटस, रिलस शेअर फॉरवर्ड करू नका ज्यामुळे ज्यामुळे दोन समाजामध्ये तेढ निर्माण होईल अश्या गोष्टी पासून दूर रहावे.व आपल्या आई वडिलांची सेवा करावे, व आपआपसात प्रेम आणि भाईचारा प्रस्थापित करा असे यावेळी सांगितले. एकमेकांनी प्रेमाने राहून या देशात शांतता व भाईचारा आबाधित ठेवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे असे आवाहन केले. आणि शेवटी मौलवी साहेब यांनी ईदच्या या पवित्र दिवशी आपल्या देशातील सामाजिक सलोखा, बंधुभाव, एकमेकांच्या धर्माबद्दल प्रेम, अधिकाधिक वृद्धिंगत वाहवा आपल्या देशामध्ये भाईचारा व विश्वशांतीसाठी अशी अल्लाकडे खास दुआ प्रार्थना करण्यात आली.

यावेळी माझी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, अशपाक बळोरगी, रईस टिनवाला, महेश हिंडोळे, दिलिप सिद्धे, शिवकुमार स्वामी यांनी सर्व मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच अक्कलकोट पोलिस प्रशासनाकडून शाही ईदगाह मैदानावर ईद-उल फित्र अर्थात रमजान ईदची नमाज पठण झाल्यावर सर्व मुस्लिम बांधवांचे व लहान मुलांना उपविभागीय पोलिस अधिकारी विलास यामावार, पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांनी गुलाब देऊन रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.

## पिलीव येथे रमजान ईद उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १ एप्रिल-**

इस्लाम धर्मामध्ये अत्यंत पवित्र व अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त असलेल्या पवित्र रमजानच्या उपवासाची (रोजाची) सांगता रमजान ईद दिवशी सकाळी ईदगाह मैदानावर पिलीव व झिंजेवस्तीच्या मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज अदा करून करण्यात आली.

यावेळी मौलाना नावेद अख्तर यांनी रमजानच्या पवित्र महिन्याची व उपवासाचे महत्त्व कथन केले यावेळी पवित्र रमजानच्या उपवासाचे महत्त्व सांगताना शरीराचे शुद्धीकरण होऊन देवाजवळ पोहोचण्याचा उपवास हा एक सुलभ व साधा मार्ग असून वर्षभरात आपल्याकडून कोणाशी भांडण झाले असेल कोणाचे मन दुखावले असेल कोणाशी वैरभाव निर्माण झाला असेल तर त्याच्याशी प्रेमाची भावना ठेवून प्रेमाचा हात पुढे देऊन क्षमा याचना केली जाते सर्वसामान्यांशी आपुलकीची व सहानुभूतीची भावना ठेवून प्रेमाने वागण्याची शिकवण दिली जाते वर्षभरात मिळवलेल्या कमाईतून किंवा उत्पन्नातून गोरगरिबांना गरजूंना दान करणे यास जकात म्हटले जाते. सामाजिक एकतेचे प्रतीक सद्भावनेने सदभावनेचे करूणाचे व शांततेचे प्रतीक मानून एकमेकाविषयीचा वैरभाव विसरून आपुलकीने राहण्याचा संदेश देणारा हा रमजानचा पवित्र म्हणून हा उपवास केला जात असल्याचे त्यावेळी सांगितले रमजान ईदनिमित्त एकमेकांना हातात हात देऊन गळाभेट घेऊन शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. त्याचप्रमाणे हिंदू-मुस्लिम समाजातील राजकीय पुढारी नेते यांनी शुभेच्छा देऊन एकमेकांच्या घरी शिरखुर्माचा गुलगुल्यांचा प्रसाद म्हणून देवाण-घेवाण करून एकमेकाविषयी आपुलकीची भावना व्यक्त केली जात होती. यावेळी गावातील ही राजकीय सामाजिक नेत्यांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या सामूहिक नमाजीची घोषणा जामा मशीदच्या वतीने करण्यात आली होती. यामध्ये जामा मशीद, बस स्टँडवरील मदरसा मशीद, सारवान गल्लीतील मशीदीच्या वतीनेही सामूहिक नमाजीमध्ये सहभाग नोंदविला. त्याचप्रमाणे पठाणवस्ती व चांदापुरीच्या वतीने पठाणवस्ती येथे सामूहिक नमाज पठण व कथन करण्यात आले यावेळी एकमेकांना भेटून शिरखुर्मा, गुलगुले या प्रसादाचे वाटप करून आपुलकीची भावना जपत रमजानच्या पवित्र महिन्याची सांगता करण्यात आली. यावेळी जमा मशिदीचे अध्यक्ष मेहबूब मुलाणी, सचिव नजीर मुलाणी, सदस्य सलीम मुलाणी शुक्रुरुद्दीन मुलाणी, अब्दुलरहीम सय्यद, अजिज मुलाणी, अल्ताफ मुलाणी, आरिफखान पठाण, मुजमिल तांबोळी, अमिनखान पठाण, बाबा सय्यद सलीम मुलाणी अमीर मुलांणी जामा मशीद, आंधळकर चौक, मदरसा मशिद बसस्थानक व सारवान गल्ली मशीद यांच्या संयुक्त विद्यमाने रमजान ईदनिमित्त ईदगाह मैदानावर आयोजित सामूहिक नमाज पठण व नमाज आदाचा कार्यक्रम पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

## ग्रीन फिंगर्स कॉलेजला झील २०२५ चे सर्वसाधारण विजेतेपद

**तभा वृत्तसेवा**
**अकलूज,दि.१ एप्रिल-**

येथील शिवरत्न शिक्षण संस्था व श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्टद्वारे वार्षिक स्नेहसंमेलन झील २०२५ अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धामध्ये ग्रीन फिंगर्स कॉलेजला सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त झाले.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी खासदार धैर्यशील मोहिते पाटील व शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शीतलदेवी मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा घेतल्या जातात. या स्पर्धांमध्ये रांगोळी, मेहंदी, कॉलेज स्पॉटलाईट प्रेझेंटेशन, मुला-मुलींसाठी क्रिकेट स्पर्धा, विविध सांस्कृतिक व विविध शैक्षणिक स्पर्धा त्यामध्ये केस स्टडी प्रेझेंटेशन, रिसर्च पेपर प्रेझेंटेशन यांचा समावेश आहे. या सर्व स्पर्धांचे नियोजन शिवरत्न हॉर्स रायडिंग अकॅडमीच्या चेअरमन इशिता धैर्यशील मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या स्पर्धांमध्ये ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कम्प्युटर अँड टेक्नॉलॉजी, विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग अँड मेडिकल रिसर्च , शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, शिवरत्न पॅटर्न अकलूज तसेच शंकरराव मोहिते महाविद्यालय व फार्मसी कॉलेज यासह विविध महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील व इशिता मोहिते पाटील, शिवरत्न शिक्षण संस्थेचे सर्व संचालक, पत्रकार, प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील यांनी विजेते संघ व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिवरत्न शिक्षण संस्थेचे सचिव धर्मराज दगडे व संचालक नितीन बनकर, श्रीकांत राऊत, डॉ. विश्वनाथ आवड, अनिल जाधव, प्रशासकीय अधिकारी अश्रफ शेख, प्राचार्य भारत साठे, डॉ. सुभाष शिंदे उपस्थित होते.

झील स्पर्धेचा निकाल असा : रांगोळी डॉटेड - प्रथम क्रमांक ग्रीन फिंगर्स कॉलेज (प्रथम), विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग (द्वितीय), शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (तृतीय), रांगोळी फ्री हॅन्ड -ग्रीन फिंगर्स कॉलेज (प्रथम), विजयसिंह मोहिते पाटील नर्सिंग कॉलेज(द्वितीय), फार्मसी कॉलेज (तृतीय). मेहंदी स्पर्धा- विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज (प्रथम), ग्रीन फिंगर्स कॉलेज(द्वितीय), ग्रीन फिंगर्स कॉलेज(तृतीय). स्पॉटलाईट - शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (प्रथम) ग्रीन फिंगर्स कॉलेज (द्वितीय), विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज गर्ल्स क्रिकेट (तृतीय). क्रिकेट बॉईज-फार्मसी कॉलेज (प्रथम), विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज (द्वितीय), ग्रीन फिंगर्स कॉलेज (तृतीय). कथाकथन- विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज(तृतीय), फार्मसी कॉलेज (द्वितीय), शंकरराव मोहिते पाटील कॉलेज (प्रथम).काव्यवाचन-शंकरराव मोहिते महाविद्यालय (प्रथम), विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज (द्वितीय), शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज (तृतीय). केस स्टडी प्रेसेंटेशन- शंकराव मोहिते महाविद्यालय (प्रथम), विजयसिंह मोहिते-पाटील (द्वितीय), ग्रीन फिंगर्स कॉलेज (तृतीय). रिसर्च पेपर प्रेझेंटेशन - ग्रीन फिंगर कॉलेज(प्रथम), शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज(द्वितीय),विजयसिंहमोहिते पाटील कॉलेज(तृतीय).बॉलीवूड डान्स- ग्रीन फिंगर्स कॉलेज(प्रथम) , शिवरत्न इन्स्टिट्यूट(द्वितीय) विजयसिंह मोहिते पाटील कॉलेज(तृतीय)अशा पद्धतीने सर्वसाधारण विजेतेपद हे ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कम्प्युटर अँड टेक्नॉलॉजी या महाविद्यालयाला मिळाले आहे. सर्वात जास्त गुण मिळवून त्यांनी हे विजेतेपद मिळवले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/





# मी भाजप म्हणूनच लढणार, लेचा-पेचा नाही!

- निवडणूक ताकतीनेच लढतो, तडजोड करत नाही!
- बाजार समिती निवडणुकीसंदर्भात आ. सुभाष देशमुख यांनी स्पष्ट केली भूमिका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

मी भाजपचा कार्यकर्ता आहे. पक्षाच्या कार्यकर्त्याला उमेदवारी मिळावी असा आपला प्रयत्न आहे. बाजार समिती निवडणुकीत मी भाजप म्हणूनच लढणार आहे. मी लेचापेचा नाही. कोणाशीही तडजोड करणार नाही, जे येतील त्यांना सोबत घेऊ, जे येणार नाही त्यांच्या विरोधात लढू, अशी ठाम भूमिका भाजपचे आ. सुभाष देशमुख यांनी पत्रकारांशी बोलताना मांडली.

महापालिकेत आढावा बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सोलापूर बाजार समिती निवडणुकी संदर्भात विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात आ. सुभाष देशमुख पुढे म्हणाले, कोणत्या निवडणुकीचे नेतृत्व कोणी करायचे हा विषय भाजपमध्ये गौण असतो. भाजपाचे कार्यकर्ते जर बाजार समिती निवडणूक लढले तर पक्षाचे काहीही म्हणणे नाही. मी निवडणूक ताकतीने लढतो. गेली निवडणूकही आपण एकट्याने आणि भाजपकडूनच लढली होती. गतवेळी पक्षातील लोक विरोधात होतेच.

मात्र आपण त्याचा विचार न करता स्वतंत्र निवडणूक लढली. यापूर्वी मी जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणूकही एकट्या लढलो, मला माझे मत मिळावे म्हणून लढलो. मी भाजप म्हणूनच लढणार आहे, कोणाशीही तडजोड करणार नाही, जे येतील त्यांना सोबत घेऊ जे येणार नाही त्यांच्या विरोधात लढू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# तीन दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचा आराखडा करा

- आ. सुभाष देशमुख यांची आयुक्तांना सूचना
- दक्षिणमधील विविध २० विषयांवर घेतली आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

दक्षिण मतदारसंघातील काही भागात पाणीपुरवठा पाच ते सहा दिवसाआड होत आहे. तो तीन दिवसाआड करता येईल का याबाबत आराखडा तयार करा. जुन्या पाईल लाईन काढून नवीन टाकाव्यात. पाण्याची साठपण क्षमता वाढवण्यासाठी झोपडपट्टी भागात अंगणवाडी सुरू करा. प्रलंबित ड्रेनेजची कामे सुरू करा यासह विविध सूचना आयुक्तांसमवेतच्या बैठकीत केल्या आहेत, अशी माहिती भाजपचे आ. सुभाष देशमुख यांनी दिली.

आ. सुभाष देशमुख यांनी दक्षिण मधील शहरी भागात येणाऱ्या विविध कामांबाबत आज महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या समवेत आढावा बैठक घेतली. यावेळी सुमारे २० विषयांवर प्रदिर्घ चर्चा करण्यात आली. या बैठकीत अतिरिक्त आयुक्त रवी पवार, संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, गिरीश पंडित, मनीषा मगर, नगररचना उपसंचालक मनीष भिष्णूरकर, विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता राजेश परदेशी, आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, उपअभियंता नीलकंठ मठपती, तपन डंके आदींसह अधिकारी उपस्थित होते.मतदारसंघातील अनेक भागात कचरा साठला आहे, त्याची स्वच्छता करावी. छत्रपती नगर, डोणगांव रोड, हिमगिरी नगर, विश्वकिरण पार्क, शिवरत्न नगर, ममता नगर, जयम हालक्ष्मी नगर, रेणुका नगर, साईधन नगर, एस.टी. कॉलनी आदी भागातील ड्रेनेजची उर्वरीत भागात कामे करावीत. याशिवाय रस्त्यांची कामे अर्धवट आहेत तीही पूर्ण करावीत. सुंदरम नगर येथील जलतरण तलावाचा क्रीडा विभाग आणि महापालिकेचा वाद मिटवून ते नागरिकांसाठी खुले करावे.

सोसायटी चेअरमनसोबत महापालिकेने बैठक घेऊन ज्या मोकळ्या जागा आहेत, त्या लोकसहभागातून विकसीत कराव्यात. बंद असलेले हातपंप सुरू करावेत, उद्याने विकसीत करुन नागरिकांसाठी खुले करावीत, छत्रपती संभाजी महाराज तलाव विकसित करावा. एसआरपीएफ च्या बाजूला काही सोसायटी आहेत तेथे राहणाऱ्या नागरिकांसाठी वहिवाटीचा रस्ता करून द्यावा, डी मार्ट परिसरात नवीन भाजी मंडई तयार करावी, चैतन्य भाजी मार्केट सध्या बंद अवस्थेत आहे ते विकसित करून चालू करावी आदी सूचना आ. सुभाष देशमुख यांनी केल्या. आ. देशमुख म्हणाले की, आयुक्त आणि त्यांच्या टीमने सर्व मागण्या ऐकून घेतल्या आहेत.तीन महिन्यात या पूर्ण करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. शिवाय एका महिन्यात पुन्हा एकदा आयुक्तांनी आढावा बैठक घेण्याचे सूचित केले आहे.



**जुळे सोलापुरात नाट्यगृहासाठी नवीन जागा द्यावी**

जुळे सोलापुरात नाट्यगृहासाठी नवीन जागा द्यावी, पूर्वीची जागा वन विभागाची असल्याने तेथे नाट्यगृह बांधता येणार नाही.त्याच्या शेजारची जागा द्यावी. आसरा ते विजापूर रोड रस्ता मंजूर आहे तो सुरू करावा. त्वरित तेथे खडीकरण करावे आदी सूचना आ. सुभाष देशमुख यांनी केल्या.

**निलमनगर येथे १०० बेडच्या महिला प्रसुतीगृहासाठी शासनास प्रस्ताव द्यावा**

निलम नगर (श्रमजिवी नगर) येथे १०० बेडचे महिला प्रसुती गृह सुरु करण्याबाबत राज्य शासनास प्रस्ताव द्यावा. हददवाढ भागातील निलम नगर, स्वागत नगर, जुळे सोलापूर, सलगरवस्ती परिसर, इंदिरानगर येथे संख्या वाढली आहे. या वाढत्या लोकसंख्येचा विचार करून येथे अंगणवाडी नव्याने सुरू कराव्यात, असेही आ. सुभाष देशमुख यांनी सुचित केले.

## बालनाट्य अभिनय कार्यशाळेला सुरुवात

**सोलापूर दि. १ एप्रिल-**

बालरंगभूमी परिषद शाखा सोलापूरच्या वतीने दि. १ ते ५ एप्रिल या कालावधीमध्ये होणारे बालनाट्य अभिनय कार्यशाळा व संस्कार शिबिर चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशालेच्या सभागृहात आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यशाळेचे उद्घाटन प्रसिध्द नाट्य कलावंत राजू रंगम यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला बालरंगभूमी अध्यक्षा सीमाताई यलगुलवार यांनी घेण्यात येणारे विविध उपक्रमा संबंधी म्हणजे सांघिकता, कल्पकता, सभाधीटपणा, संभाषणकला, आत्मविश्वास यावर मार्गदर्शन केले. या प्रसंगी मार्गदर्शक प्रा. किरण लोंढे यांनी मुलांना वेगवेगळे गट करून अभिनयाचे प्रशिक्षण दिले.याप्रसंगी तेजश्री श्रिरेखम, गिराम शोभा तसेच उपाध्यक्षा प्रा.अर्चना आयाचित, नीता देशपांडे उपस्थित होते.

# जलशुद्धीकरण केंद्राकडील कंत्राटी कामगारांना कायम करा

### महापालिका कामगार संघटना कृती समितीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ एप्रिल-**

महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रांकडील कंत्राटी कामगारांना आकृतीबंधाप्रमाणे कायम करावे, अशी मागणी महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या वतीने कामगार नेते अशोक जानराव यांनी आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गेली १० वर्षापासुन हे कामगार काम करीत आहेत. त्यांची संख्या ७२ आहे. नव्याने म.न.पा. चा आकृतीबंध शासनाने मंजुर केला आहे. त्यामध्ये ७२ मजुर पदाच्या जागा आहेत. त्या मंजुर आकृतिबंधानुसार मजुर सेवकांना सेवेत कायम करुन जागा भराव्यात अन्यथा अत्यावश्यक सेवेतील या कामगारांना भविष्यात तीव्र आंदोलन करावे लागेल, असा इशारा त्यांनी दिला आहे. सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाच्या अधिपत्याखाली सोरेगांव, टाकळी, उजनी, पाकणी, भवानी पेठ वॉटर वर्क्स आणि औज बंधारा आदी जलशुध्दीकरण केंद्राकडील सर्व कंत्राटी मजूर सेवकांचे कंत्राटदार आर्थिक शोषण करीत आहेत. काम गारांना कधीच महिनेच्या महिन्याला पगार देत नाहीत. महापालिकेबरोबर केलेल्या कराराप्रमाणे किमान वेतन दिले जात नाही. कामगारांच्या



बँक खात्यावर किमान वेतन दराप्रमाणे रक्कम जमा करतात पण दरमहा ३ हजार ५०० रुपये कत्राटदाराचे नेमलेले सुपरवाईजर काम गारांकडून वसुल करतात. कंत्राटी कामगारांना काढून टाकण्याची सतत दमदाटी व भिती दाखविली जाते. कामगारांनी कामगार संघटनेकडे जावू नये त्यांना संघटना करु नये असे सुध्दा कंत्राटी काम गारांना धमकावतात असा आरोप निवेदनाद्वारे केला आहे. त्यामुळे कामगार तोंड दाबून मुक्याचा मार सहन करीत आहेत. तेव्हा एकही कामगारांला कामावरुन कमी करु नये अशी समज द्यावी. पद केलेली रक्कम भविष्य निर्वाह कार्यालयात जमा केली जात नाही. कंत्राटी कामगारांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण होत आहे, असाही आरोप केला आहे.

## कथामालेच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी प्रा. म्हमाणे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

अ.भा. साने गुरुजी कथामालचे ५७ वे राष्ट्रीय अधिवेशन कोल्हापूर येथे नुकतेच संपन्न झाले. या अधिवेशनात २०२५ ते २०२८ या तीन वर्षांसाठी उमाबाई श्राविका कनिष्ठ महाविद्यालयातील निवृत्त प्राध्यापक अशोक म्हमाणे



यांची राष्ट्रीय उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आल्याची घोषणा, निवडणूक अधिकारी तथा राज्य ग्रंथालय संघटनेचे, अध्यक्ष गजानन कोटेवार यांनी केली.

याप्रसंगी कथामालेचे राष्ट्रीय अध्यक्ष शामराव कराळे, कार्याध्यक्ष लालासाहेब पाटील, राष्ट्रीय कार्यवाह सुनील पुजारी, सोलापूर शाखेचे अध्यक्ष अशोक खानापुरे, अरुणकुमार धुमाळ उपस्थित होते. सलग तीन वर्षांसाठी त्यांची दुसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. राष्ट्रीय संयुक्त कार्यवाह प्रा.गणेश लेंगरे,यांनी सोलापूर कथामालेच्या वतीने म्हमाणे यांचे अभिनंदन केले.

# प्रभाग २२ येथे नगरोत्थान अभियानांतर्गत रस्ता कॉंक्रिटीकरण कामांचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ एप्रिल-**



उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे यांच्या सहकार्याने तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव आणि माजी नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या प्रयत्नातून सोलापूर महानगरपालिकेच्या अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत १० लाख ९७ हजार १५६ रुपये खर्चित प्रभाग २२ येथील मातंग समाज स्मशानभूमी ते सोनी नगर रस्ता मोदी हुडको येथील कॉंक्रिटकरण कामाचे उद्घाटन फित कापून करण्यात आले.

यावेळी श्री. जाधव म्हणाले की, प्रभाग २२ च्या सर्वांगीण विकासासाठी पाठपुरावा केला होता. राष्ट्रवादी पक्ष हा महायुती मध्ये घटक पक्ष आहे महायुतीतील घटक पक्षांना पालकमंत्री जयकुमार गोरे आमदार देवेंद्र कोठे यांनी आम्हाला सहकार्याचे भूमिका दाखविले. यामुळे प्रभागातील नागरिकांना या निमित्ताने मोठा दिलासा मिळणार आहे. प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी यापुढील काळात महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून आणखीन भरघोस निधी आणून प्रभागाचा चौफेर विकास होणार आसल्याचे सांगितले. याप्रसंगी राष्ट्रवादी ज्योती बाबुराव संगेपाग, शकुंतला कोटमाळे, चंद्रमा ओलेकर, सविता ताई बंगले, महालक्ष्मी म्हेत्रे, मुक्ता वागळे, तनुजा पवार, सिद्धम चलवादी, हरीश तेलुगु, राजू पवार, आर्यन साळुंखे, नागेश म्हेत्रे, जगदीश सोनेरीकर, सचिन किसन गायकवाड,वसंत पवार, नागेश ढेंगळे, नारायण धुमाळ, मोहन पवार आदीं उपस्थित होते.

# मनोरमा को-ऑफ बँकेचा सलग ७ व्या वर्षी झिरो एनपीए

**चेअरमन श्रीकांत मोरे यांची माहिती; ग्राहकांच्या विश्वासार्हतेवरच बँकेचा चढता आलेख!**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

येथील मनोरमा बँकेने अत्यल्प कालावधीत गरूडझेप घेतली आहे. त्यांच्याकडील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या पारदर्शक व्यवहारामुळेच ठेवींची संख्याही वाढली असून, कर्जदारही वेळेत परतफेड करीत असल्याने मनोरमा परिवारातील या १० बँकांचा सलग ७ व्या वर्षी झिरो एनपीए आला असल्याची माहिती मनोरमा बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे यांनी आज (दि. १) दिली.





दरम्यान, या बँकेची आर्थिक स्थिती आता मजबूत होत असून, ग्राहकांच्या विश्वासार्हतेमुळेच बँकेचा आलेख चढता असल्याचा आनंद त्यांनी द्विगुणीत केला. मनोरमा बँकेच्या १० शाखा कार्यरत असून, या बँकेची मार्च २०२५ अखेरची आर्थिक स्थिती अशी आहे. मनोरमा बँक सोलापूर ३१.०३.२०२५ अखेर एकूण ठेवी रुपये ६५३०५.९१ लाख, एकूण कर्ज ४०६०८.३५ लाख, एकूण व्यवसाय १०५९१४.२६ लाख, एकूण निव्वळ नफा ३१७.८६ लाख, ईन्कम टॅक्स १२८.७२ लाख, बीडीडीआर प्रोव्हिजन रुपये ४०.०० लाख, एकूण ग्रॉ प्रॉफीट ४८६.५८ लाख, एकूण ग्रॉस एनपीए रुपये २४७.९१ लाख ०.६१% नेट एनपीए -०.३८%, सीडी रेटिओ ६२.१८%, शेअर कॅपिटल १५८०.७९, रिझर्व्ह फंड व बिल्डिंग फंड रुपये ८७४.६२ लाख



बँकेचा आलेख उंचावण्यासाठी मनोरमा को-ऑप बँक लि. सोलापूरच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीही यासाठी खूप काम केले आहे. यामुळेच आमची बँक ४.८६ कोटी निव्वळ नफ्यात आली आहे. तर ६५३.०५ कोटीच्या ठेवी आहेत, ४०६.०८ कोटीची कर्जे आहेत तर एकूण व्यवसाय १०५९ कोटीचा झाल्याचेही मोरे यांनी सांगितले. याचबरोबर आता मनोरमा परिवाराच्या ७० च्या पुढे मल्टिस्टेट, ६ पतसंस्थाही सुरू झाल्या असून, याचे काम चेअरमन शोभा मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली चांगल्या पध्दतीने सुरु असल्याचीही माहिती चेअरमन श्रीकांत मोरे यांनी दिली.



# सिंहगडमध्ये राष्ट्रीयस्तरावरील तांत्रिक परिसंवाद उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल**

केगाव येथील एन बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात शुक्रवारी (दि. २८) डिस्टा २k२५ या राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक परिसंवादाचे आयोजन केले होते. यात शहर जिल्ह्यासह धाराशिव जिल्ह्यातून विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

देशभरातील तरुणांमध्ये नवोन्मेष, तांत्रिक उत्कृष्टता आणि ज्ञानाची देवाणघेवाण वाढवणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. डिप्लोमा आणि इंजिनिअरिंग विद्यार्थ्यांसाठी या राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक परिसंवादात सोलापूर तसेच धाराशिव, तुळजापूर या सर्व ठिकाणाच्या इंजिनियरिंग, डिप्लोमा मिळून ९५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविल्याचे कार्यक्रम समन्वयक प्रा. सुमेध पाठक यांनी सांगितले. या महोत्सवात दहा टेक्निकल आणि पाच नॉन टेक्निकल अशा १५ स्पर्धा घेण्यात आल्या. यशस्वी विद्यार्थ्यांना रोख रक्कम, ट्रॉफी आणि सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले. हा कार्यक्रम सोलापूर सिंहगडचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले तसेच उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. रविंद्र व्यवहारे व कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. सुमेध पाठक यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. डिस्टा 2K२५ मध्ये तांत्रिक स्पर्धा, हॅकेथॉन, पेपर प्रेझेंटेशन, कोडिंग आव्हाने, रोबोटिक्स स्पर्धा आणि प्रत्यक्ष कार्यशाळांचा समावेश होता. यात तज्ञ चर्चा आणि उद्योग नेते आणि शिक्षणतज्ज्ञांसह पॅनेल चर्चा झाली. यातून विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकीमधील नवीनतम प्रगतीची झलक पाहण्यासाठी मदत झाली. महोत्सव यशस्वी होण्यासाठी टेक्निकल सेक्रेटरी सृष्टी नवले तसेच इतर विद्यार्थी प्रतिनिधी कार्तिक नरवडे, संजना तालकोकुळ, ओंकार तानडे,जानवी बारस्कर, आदित्य बोदू, साक्षांत धोत्रे, तेजस मेंते, अयानखान पठाण, वैभवी बेलमकर, श्रावणी नवले, अभिषेक शेरीकर यांनी परिश्रम घेतले. सर्व सहभागी स्पर्धकांनी आपल्या अंगभूत गुणांचे प्रदर्शन विविध स्पर्धांच्या माध्यमातून येथे केले व सिंहगड सोलापूरच्या नेटक्या नियोजनाबाबत समाधानही व्यक्त केले.

# सोलापूर शहर मध्यवर्ती बस स्थानकातील प्रवाशांचे हाल थांबणार; दुर्गंधीचा प्रश्न सुटणार?

**बसस्थानकात होतेय नव्या स्वच्छतागृहाची निर्मिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ एप्रिल-**

येथील मध्यवर्ती बस स्थानकात स्वच्छतागृहाअभावी प्रवाशांचे हाल होत होते. लवकरच या ठिकाणी नवे स्वच्छतागृह सुरू होत आहे. यामुळे या परिसरातील दुर्गंधीचा प्रश्न सुटणार आहे.

सोलापूर मध्यवर्ती बस स्थानक परिसरात प्रवाशांची मोठी वर्दळ असते. या वर्दळीच्या ठिकाणी सोयीचे असे एकच स्वच्छतागृह होते. ते नेमके प्रवेशद्वाराजवळ असल्याने गर्दी होत होती. दुसरे स्वच्छतागृह अत्यंत दूर असल्याने इतक्या दूरवर न जाता बस स्थानकाच्या संरक्षक भिंतीजवळच



अनेक प्रवासी लघूशंका करत होते. यामुळे बस स्थानक परिसरात कायम दुर्गंधी पसरत होती. दरम्यान, सदरचा प्रश्न मिटविण्यासाठी एसटी प्रशासनाने याच ठिकाणी स्वच्छतागृह बांधण्याचा निर्णय घेतला.

काही दिवसांपूर्वी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे सोलापूर दौऱ्यावर आले असता, त्यांनी प्रवाशांच्या समस्या जाणून घेतल्या होत्या. त्यांनी स्वतः स्वच्छतागृहाची पाहणी केली होती. दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर स्वच्छतागृहाची स्थिती चांगली असली तरी इतर वेळी येथील अवस्था अत्यंत वाईट होती.

दुर्गंधीमुळे अनेकजण बाहेरच लघुशंका उरकत होते. आता या ठिकाणी आठ मुताऱ्या व दोन बेसिन असलेल्या स्वच्छतागृहाचे बांधकाम केले आहे. यासाठी स्वतंत्र तीन हजार लिटरच्या पाण्याची टाकी बसविण्यात आली आहे. यामुळे या परिसरातील दुर्गंधीचा प्रश्न सुटेल. असा आशावाद व्यक्त केला जात.

**पाण्याच्या टाकीला नसते पाणी**

“ बस स्थानक परिसरातील मुख्य बस स्थानक व मराठवाडा विभागासाठीच्या बस स्थानकाजवळ दोन ठिकाणी पाण्याची व्यवस्था आहे. मात्र या दोन्ही टाक्यांच्या तोट्या तुटलेल्या असतात. तोट्या नसल्यामुळे पाण्याची टाकीतील । पाणी वाया जाते. बस स्थानक परिसरात सर्वत्र हे सांडपाणी पसरते व टाकी रिकामी होण्यामुळे लवकरच टाकी कोरडी पडते. या तोट्याची दुरुस्ती केल्यास जास्तीत जास्त प्रवाशांना पाणी मिळू शकेल. साध्या पिण्यासाठी बाटलीबंद पाण वापरले जात असले, तरी प्रवाशां चुल तोंड धुणे, जेवणाचे डबे धुणे यासा यांसाठी पाण्याची आवश्यकता असते. यामुळे या टाक्यांच्या तोट्या आधी दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

**- अनिरुद्ध पाटील, प्रवासी**

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर: धनराज ऊर्फ बालाजी भिमाशंकर जमादार यांची मुस्ती (ता. दक्षिण सोलापूर) यांची सरपंचपदी तसेच गौतम शेकूंबर चौधरी यांची तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना दैनिक तरुण भारतचे मुख्य समूह संपादक दिलीप पेठे. यावेळी मुख्य संपादक प्रशांत माने, व्यवस्थापक विनायक पुला, प्रकाश जाधव.



## ▶▶ क्राईम वृत्त...

### रिक्षातून पडल्याने चार वर्षाची बालिका जखमी

**सोलापूर, दि.१ एप्रिल-**

थांबलेल्या रिक्षातून तोल जाऊन पडल्याने चार वर्षाचा बालिका जखमी झाली. हा प्रकार नरसिंग गिरजी मिल चाळ सोलापूर येथे ३१ मार्च रोजी दुपारी ३.३६ वाजता घडला. यशश्री चंद्रकांत मलकापल्ली (वय ४, रा. नरसिंग गिरजी मिल, सोलापूर) असे बालिकेचे नाव आहे. सोमवार ३१ मार्च रोजी यशश्रीच्या घरासमोर रिक्षा थांबली होती. त्या रिक्षात यशश्री खेळत असताना अचानक ति तोल जाऊन पडल्याने तिच्या डोक्याला जखम झाली. त्यानंतर काका सुरेश यांनी तिला ४.३० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### विवाहितेने खाल्ल्या घरगुती वादातून औषधी गोळ्या

**सोलापूर, दि.१ एप्रिल-**

घरगुती वादातून विवाहितेने औषधी १२ गोळ्या खाल्याचा प्रकार विजापूर नाका परिसरातील झोपडपट्टी नंबर एकमध्ये ३१ मार्च रोजी रात्री १० च्या सुमारास घडला. सारीका प्रमोद वाघमोडे (वय २९) असे विवाहितेचे नाव आहे. सोमवारी रात्री सारिका यांच्या घरात घरगुती कारणातून वाद झाला. या वादानंतर संतापलेल्या सारीका यांनी कोणत्यारी १२ गोळ्या खाल्याने त्यांना त्रास होऊ लागला. दीर आकाश वाघमोडे याने रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### ब्रेकफेल झालेली दुचाकी रिक्षाला धडकल्याने दोघे जखमी

**सोलापूर, दि.१ एप्रिल-**

चेतन हॉटेलपासून निलमनगरकडे जाताना आकाशवाणी केंद्रासमोरील रस्त्यावर ब्रेक फेल झालेली दुचाकी रिक्षाला धडकल्याने दुचाकीवरील दोघे जखमी झाले. हा अपघात सोमवारी रात्री ११ वाजता घडला.



व्यंकटेश भास्कर दुस्सा (वय २६, रा. निलम नगर) व निखिल अंबादास शवंतूल (रा. सुनील नगर) अशी जखमींची नावे आहेत. व्यंकटेश आणि निखिल असे दोघे दुचाकीवरून सोमवारी रात्री ११ च्या सुमारास दुचाकीवरून डबलसीट जात होते. ते जात असलेल्या दुचाकीचे अचानक ब्रेक फेल झाले. यामुळे रिक्षाला दुचाकीची धडक बसल्याने खाली पडून व्यंकटेश यास मुकामार तर निखिल यास चेह-याला जखम झाल्याने रात्री ११.४५ वाजता मित्र राहुलने रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### हॉटेल चालवण्याच्या कारणावरून बेदम मारहाण

**सोलापूर, दि.१ एप्रिल-**

हॉटेल चालवण्याच्या कारणावरून सोमवारी रात्री ८.३० वाजता एकास बेदम मारहाण करण्यात आली. हा प्रकार विकास हॉटेल येथे घडला. युवराज आप्पाशा पाटील (वय ३८, रा. नवीन विडी घरकुल, कुंभारी) असे मारहाण झालेल्याचे नाव आहे.



सोमवारी रात्री ८.३० वाजता विकास हॉटेल येथे असताना अण्णाराव पाटील व युवराज पाटील यांच्यात हॉटेल चालविण्याच्या कारणातून शाब्दिक वाद झाला. या वादातून अण्णाराव पाटील याने दगडाने व लाथाबुक्यांनी युवराज यास बेदम मारहाण केली. यात त्याला डोक्याला जखम झाली तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री ९ वाजता मित्र सिद्राम गायकवाड याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पुळूजवाडीत आईला मुलाने केली लाथाबुक्यानी मारहाण

**सोलापूर, दि.१ एप्रिल-**

पंढरपूर तालुक्यातील पुळूजवाडी येथे आईला मुलाने लाथाबुक्यांनी मारहाण केल्याची घटना घडली. हा प्रकार सोमवारी रात्री आठच्या सुमारास घडला. शारदा श्रीमंत मदने (वय ५५, रा. पुळूजवाडी ता. पंढरपूर) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. सोमवारी रात्री शारदा यांना त्याचा मुलगा दादा मदने याने विनाकारण लाकूड तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यात डोक्याला जखम झाली तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने मंगळवारी सकाळी ९.१० वाजता पती श्रीमंत मदने यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# भाजी मार्केट ओस; विक्रेत्यांचे रस्त्यांवर अतिक्रमण









सोलापूर : जुळे सोलापुरातील जनाबाई मार्केट विक्रेत्यांविना ओस पडले आहे. दुसऱ्या छायाचित्रात विजापूर महामार्गावरील भाजी विक्रेते. तिसऱ्या छायाचित्रात अशोक चौकातील ओस पडलेले चिप्पा मार्केट. चौथ्या छायाचित्रात अशोक चौक येथील सत्तर फूट रोडवरील रस्त्यावर विक्री करीत असलेले भाजीविक्रेते. (छायाचित्र : केवल तिवारी)

- कारवाईच्या दुसऱ्या दिवशी जैसे थे अशी कायमची स्थिती
- महापालिकेच्या मंडई विभागाचे संबंधित अधिकाऱ्यांचे होतेय दुर्लक्ष
- राणी लक्ष्मीबाई तसेच चिप्पा मार्केट येथे नूतनीकरणासाठी झाला लाखोंचा खर्च

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१ एप्रिल-**

महापालिकेच्या मंडई विभागाच्या वतीने विविध झोन कार्यालयामार्फत भाजी व्यवसाय करण्यासाठी ठराविक जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तेथे भाजी विक्री करण्यासाठी ओटे बांधून देण्यात आले आहेत. परंतु, तेथे भाजी विक्री न करता विक्रेते रस्त्यांवर भाजी मार्केट भरवत आहेत. यामुळे रस्त्यावर अतिक्रमण वाढून वाहतुकीला अडथळा निर्माण करत आहेत. याकडे महापालिकेच्या मंडई विभागाचे तसेच झोन कार्यालयाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

शहरातील जुळे सोलापूर येथील जनाबाई (चैतन्य) भाजी मार्केट, सत्तर फूट येथील भाजी मार्केट, चीप्पा मार्केट, कस्तुरबा मंडई, सुपर मार्केट, स्टेशन मार्केट आणि राणी लक्ष्मीबाई मार्केट यांसारख्या विविध भागात भाजी विक्रीचा व्यवसाय करण्यासाठी जागा उपलब्ध करण्यात आली आहे. तेथे महापालिकेच्या वतीने ओटे बांधण्यात आले आहेत. संबंधित भाजी विक्रेत्यांना ओटे देखील सुपूर्द करण्यात आले आहेत. त्याची पावती देखील महापालिकेकडे आहे. परंतु येथे भाजी विक्रीचा व्यवसाय न करता विक्रेते प्रमुख रस्त्यांवर आपले बस्थान बांधून भाजी विक्रीचा व्यवसाय करत आहेत.

सत्तर फूट येथे रस्त्यावर भाजी विक्रीने वारंवार वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन कोंडी निर्माण होते. वास्तविक या विक्रेत्यांसाठी चीप्पा मार्केट येथे जागा उपलब्ध करून दिली आहे. त्यासाठी महापालिकेच्या वतीने लाखोंचा निधी खर्च केला आहे. ओट्यांची निर्मिती केली आहे, तरीही भाजी विक्रेते व्यवसाय करण्यास तयार नाहीत. त्यामुळे ही ठिकाणे दारूचे अड्डे बनत आहेत. दिवसाढवळ्या येथे तळीरामांचा अड्डा भरत आहे. विजापूर रोड आणि जुळे सोलापूर येथेही तीच अवस्था आहे. भाजी व्यवसायासाठी जनाबाई (चैतन्य) मार्केट आहे. परंतु विजापूर रस्ता व भारती विद्यापीठ परिसरात रस्त्यावर भाजी विक्री करतात. मंडई विभाग आणि झोन अधिकारी जाणून बुजून दुर्लक्ष होत असल्याचे दिसत आहे. महापालिकेकडून या विक्रेत्यांकडून पावती केली जाते. याच पद्धतीने रस्त्यावर भाजी विक्री करताना देखील त्यांच्याकडून पैसे घेतले जातात असा प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांचे विक्रेत्यांना अभय प्राप्त होते. जेव्हा महापालिकेच्या अतिक्रमण विभागाची कारवाई होणार असते. तेव्हा तात्पुरत्या स्वरूपात अतिक्रमण काढले जाते. त्यानंतर 'पहिले पाढे पंचावन्न' याप्रमाणे विक्रेत्यांचे अतिक्रमण सुरू राहते. याला कुठेतरी आळा बसावा, अशी मागणी आता केली जात आहे.

### व्यवसाय होत नसल्याचे कारण

“लिलावाद्वारे ओटे विक्रेत्यांना दिले. व्यवसाय होत नसल्याचे कारण देत विक्रेते रस्त्यावर करतात व्यवसाय शहरातील विविध भाजी मार्केट मधील ओटे लिलावाद्वारे भाजी विक्रेत्यांना सुपूर्द करण्यात आले. जागा देखील देण्यात आली. राणी लक्ष्मीबाई मार्केट, चिप्पा मार्केट यांचे नूतनीकरण करण्यात आले. परंतु ग्राहक भाजी घेण्यासाठी मार्केटच्या आतमध्ये येतं नाहीत. रोडवरच भाजी खरेदी करता. त्यामुळे मार्केट मधील विक्रेत्यांचा व्यवसाय होत नाही. असे कारण पुढे करून रस्त्यावरच भाजी विक्री केली जात आहे. महापालिकेच्या मंडई विभागामार्फत वारंवार कारवाई करून देखील विक्रेते ऐकत नाहीत.

**- गणेश पुजारी,**
**माजी सभापती मंडई व उद्यान विभाग सोलापूर महापालिका.**

### अधिकृत मार्केटमध्ये विक्री असावी

“सोलापूर शहरात अतिक्रमण दिवसेंदिवस वाढत आहे. मोकळ्या जागा दिसल्यानंतर त्या ठिकाणी तात्काळ एखाद्या व्यवसाय उभारला जातो. अनधिकृतपणे भाजी विक्री व फळ विक्री रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात केली जाते. अशावेळी वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. वाहतूक कोंडी होऊन गंभीर स्वरूपाचे अपघात घडतात. निष्पाप नागरिकांचा बळी जातो. त्यासाठी अधिकृत भाजी मार्केटमध्ये भाजी विक्रीचा व्यवसाय करायला हवा.

**- शितल बडबडे,**
**ज्येष्ठ नागरिक**

### कारवाई होणे अपेक्षित

“अतिक्रमण करणाऱ्या फेरीवाले तसेच भाजीविक्रेत्यांवर महापालिकेची कारवाई होणे गरजेचे आहे. रस्त्यावर वाढणारे अतिक्रमण तसेच अस्वच्छता यासाठी जबाबदार असणारे भाजी विक्रेत्यांवर दंडात्मक कारवाई व्हावी. त्याच पद्धतीने साहित्य जप्त केल्यानंतरच, अशा विक्रेत्यांना चाप बसणार आहे. लाखो रुपये खर्चून तयार करण्यात आलेले भाजी मार्केट ओस पडल्याने तेथे अनाधिकृत आणि अवैध व्यवसाय सुरू होत आहेत याकडे देखील लक्ष देणे गरजेचे आहे.

**- विजय छंचुरे, सामाजिक कार्यकर्ते**



प्रशांत माने | महादेव कोगनुरे | राखी देशमाने | राहुल बनसोडे | उमाकांत गायकवाड



रवी बापटले | नानासाहेब गव्हाणे | दिगंबर भगरे | विनोद माने

# भीम प्रतिष्ठानचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

- दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांचा समावेश; येत्या शनिवारी पुरस्कार वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१ एप्रिल-**

येथील भीम प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. शनिवार दि. ५ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांना सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थापक बाबा बाबरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भीम प्रतिष्ठान या संस्थेचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. प्रतिष्ठानच्या वतीने गेली २५ वर्षात विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबविले आहे. विद्यार्थी दत्तक योजनेतून अनेक विद्यार्थी घडले आहेत. दरवर्षी भीम प्रतिष्ठानच्या वतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात येते. यंदाचा पुरस्कार वितरण समारंभ राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष एड. धर्मपाल मेश्राम यांच्या हस्ते आणि महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपायुक्त विजय कबाडे, पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे, विवेक विचार मंचचे संयोजक सागर शिंदे, जिल्हा परिषदेचे पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी , शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी उद्योजक पदमचंद राका , राजेंद्र शहा - कासवा, डॉ. शिवाजीराव पवार, डॉ. उदय वैद्य, सुजीत कदम, प्रा. विक्रम कांबळे, दत्ता गायकवाड, देवेंद्र मोरे, धर्मेंद्र माने आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाहीर दीपक कांबळे यांचा भीम गीतांचा कार्यक्रम होणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस अकबर शेख, सिद्धांत बाबरे, विशाल मस्के, स्वाती मस्के, उषा चव्हाण आदी उपस्थित होते.

### हे आहेत पुरस्काराचे मानकरी

यंदाच्या वर्षी दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने (पत्रकारिता पुरस्कार), उद्योजक महादेव कोगनुरे (सामाजिक पुरस्कार), रवी बापटले (विशेष गौरव पुरस्कार), प्रा. नानासाहेब गव्हाणे (गौरव पुरस्कार), राखी देशमाने (शैक्षणिक), राहुल बनसोडे (कामगार पुरस्कार), उमाकांत गायकवाड ( क्रीडा पुरस्कार), दिगंबर भगरे (सन्मानपत्र), विनोद माने (सन्मानपत्र) आदी मान्यवरांना सन्मानित करण्यात येणार आहे. सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

### भीमा नगरमध्ये अंधाराचे साम्राज्य; दहा दिवसांपासून स्ट्रीट लाईट बंद

सोलापूर : जुळे सोलापूर भागातील ज्ञानेश्वर नगरजवळील भीमा नगरमध्ये गेल्या १० दिवसांपासून अंधाराचे साम्राज्य आहे. रस्त्यावरील दिवे बंद असल्याने नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागत आहे.



# उळे येथील 'त्या' अरुंद पुलावर पुन्हा अपघात!

## सोलापूर ते धुळे राष्ट्रीय राजमार्ग

## 'त्या' अरुंद पुलाकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

सोलापूर ते धुळे राष्ट्रीय राजमार्ग क्र. ५२ वरती उळे, ता. दक्षिण सोलापूर येथील 'त्या' अरुंद पुलावर पुन्हा अपघात घडला असून, राष्ट्रीय राजमार्ग बनवल्यापासून म हिना दोन महिन्याला अपघाताची मालिका सुरूच आहे. त्या अरुंद पुलाकडे संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असून, याचा त्रास मात्र वाहनचालकांना सहन करावा लागत आहे. पुलाचे रूंदीकरण होणार की? असेच घडणारे अपघात संबंधित अधिकारी बघतच राहणार? असा संतप्त सवाल वाहनचालक व स्थानिक नागरिकांमधुन उपस्थित केला जात आहे.

सोलापूर ते धुळे हा चार पदरी राष्ट्रीय राजमार्ग क्रं. ५२ बनवत असताना दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळे येथील तो जुना अरुंद पुल न पाडताच त्यालाच डागडुजी केली. परंतु राष्ट्रीय राजमार्ग तयार झाल्यापासुन याच अरुंद पुलावर



अनेक अपघात झाले आहेत. काहींना यामुळे आपले प्राण गमवावे लागले असुन, अनेकजण जखमी झाले आहेत. तसेच वाहनांचे अतोनात नुकसान होऊन अनेकांना रस्त्यावर यावे लागले असल्याचे तेथील नागरीकांनी सांगितले. याला जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित केला जातोय. या जुन्या व अरुंद पुलामुळे दि. ३१ मार्च रोजी साधारणतः दीड ते दोन वाजणेच्या सुमारास तुळजापूरच्या दिशेने जाणारा टेम्पो (टेम्पो क्रं एम एच १३ सी यु ८२३० ) अंदाज न आल्याने त्या अरुंद पुलाच्या कठड्याला जोरदार धडकला व अपघात घडला. या धडकेत पुलाचा कठडा तुटला व सदरील टेम्पो चेंडुसारखा धडकुन रस्त्यावर आडवा झाल्याचे दिसून येत आहे. या अपघातात सुदैवाने वाहनचालकास काही झाले नाही मात्र टेम्पोचे मोठ्या प्रम ाणात नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. टेम्पो पुलावरील रस्त्यावरच उलटल्याने तब्बल एक तास वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. राष्ट्रीय महामार्गावर वाहनांची लांबच लांब रांग लागली होती. बऱ्याच कालावधीनंतर राष्ट्रीय महामार्गाच्या क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त टेम्पो बाजूला करुन वाहनांसाठी रस्ता मोकळा करुन देण्यात आला.

### अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष

दै. तरुण भारतने या पुलाबाबत जानेवारी २०२५ च्या सुरूवातीलाच मोठा अपघात होवून ट्रक पेटल्यावर एक वृत्तमालिका लावून महामार्ग अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले होते. त्यावेळी या पुलाबाबत महिनाभरात याची निविदा निघेल आणि वर्षभरात काम पूर्ण होईल अशी माहिती देण्यात आली होती. मात्र ३ महिन्यांपासून या पुलाकडे संबंधित यंत्रणेचे अजिबात लक्ष नाही. यामुळेच अजून नव्याने आज (दि.३१) अपघात घडला आहे. एकंदरीत, या ठिकाणी जवळपास १ किलोमीटरपर्यंत बॅरेकेटिंग करूनही याचा फायदा काहीही झाला नसल्याचे यावरून निदर्शनास येत आहे. आता डागडुजी नको तर पुल नव्याने उभारावे, अशी मागणी वाहनधारक आणि स्थानिक नागरिकांतून होत आहे.

### लवकरच होणार 'त्या' पुलाचे काम!

सोलापूर ते धुळे राष्ट्रीय राजमार्ग क्रं ५२ वर उळे येथील तो जुना अरुंद व अपघातग्रस्त पुल नव्याने उभारणीचा प्रस्ताव आम्ही तयार करून गेल्या काही महिन्यापूर्वी दिल्लीच्या मुख्य कार्यालयाकडे पाठविला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदेश येताच या पुलाचे काम गतीने करून घेणार आहोत.

**- राकेश जावडे,**
**महामार्ग प्रकल्प संचालक**

### स्थानिक नागरिक आंदोलन छेडणार

'त्या' अपघातग्रस्त पुलाचे रूंदीकरण होत नाही तोपर्यंत अपघाताची मालिका ही अशीच सुरू राहणार असून, या ठिकाणी अपघात घडला की नागरीक व वाहनचालकांना आश्वासने मिळतात व पुन्हा जैसे थे परिस्थिती राहते. यासाठी राष्ट्रीय राजमार्गाच्या संबंधित वरीष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देऊन सदरील या जुन्या अरुंद पुलाचे रूंदीकरण करुन भविष्यात होणारे अपघात टाळावेत अशी म ागणी नागरिकांमधुन केली जात आहे. अन्यथा उळे, कासेगाव येथील नागरिकांतून तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.


# ज्ञानामृत आनंदलहरी १०७४

**चांगया फावलें फावोनी घेतलें ।**
**निवृत्तीनें दिधलें आमुच्या करीं ।।**

सर्वज्ञ कोणीही नसतो. ईश्वराला सोडले तर प्रत्येकाकडे कोणत्यातरी ज्ञानाचा अभाव असतोच. सर्व प्रकारचे ज्ञान मी स्वतःच मिळवेन किंवा मला सर्वच जमते, असे कोणालाही म्हणता येत नाही. काही प्रमाणात का होईना ज्ञान हे इतरांकडून घ्यावेच लागते. म्हणूनच पुर्वीपासून गुरुपरंपरा चालत आली आहे. आपण कोणाकडून तरी घ्यायचे आणि नंतर कोणाला तरी दयायचे. यामुळे ज्ञानाचा दिवा आजही प्रकाशम ान आहे. मुक्ताई व माऊलींचे गुरु बंधू श्रीनिवृत्तीनाथांनी त्यांचे गुरु श्रीगहिनीनाथ यांचेकडून ज्ञान मिळवले आणि त्यांनी ते ज्ञान आपल्या भावंडांना दिले. आपणास आपल्या भावाकडून जे ज्ञान मिळाले ते ज्ञान आपण आपले शिष्य चांगदेवांना दिले. चांगदेव या ज्ञानासाठी पात्र झाले होते व हे ज्ञान मिळवण्याची त्यांची प्रबळ ईच्छाही झाली होती. हे सांगतांना संत मुक्ताई,

**चांगया फावलें फावोनी घेतलें ।**
**निवृत्तीनें दिधलें आमुच्या करीं ।।**

असे म्हटले आहे. आपणासही ज्ञानाची प्राप्ती ही आपल्या गुरुबंधू श्री निवृत्तीनाथांकडून झाली असे श्री ज्ञानेश्वर माऊलीं, 'ज्ञानगूढगम्य ज्ञानदेवा लाधलें । निवृत्तीनें दिधलें माझ्या हाती ।।' या शब्दांत म्हणतात. मुक्ताई, सोपान, ज्ञानदेवांना त्यांच्या गुरुबंधूकडून ज्ञान मिळाले. ज्ञानदेवांनी मुक्ताई, सोपानांना ज्ञान दिले. याप्रमाणे आपणही आपल्या भावंडांना आपल्या कडील ज्ञान दयायला हवे. या भावंडाप्रमाणे आपल्या भावंडावर प्रेम करायला हवे. असे झाले तर कोर्ट, कचे-यातील, पोलीस स्टेशनमधील बरीच प्रकरणे आपोआप संपुष्टात



येतील. अनेक सख्या भाऊ बहिणींमध्ये, बहिणी बहिणीं किंवा भावा भावांमध्ये विविध कारणास्तव वादविवाद चालू असतात. एकमेकांचे तोंड न पहाणे, एकमेकांवर सूड उगवणे इथपर्यंत घटना घडत असतात. सर्व इथले इथेच टाकून जायचे आहे, असे प्रत्येकजण म्हणत असतात. मात्र तसे वागत नाहीत. जसे मोबाईलवर चांगले संदेश फक्त पाठवत असतात, प्रत्यक्षात पाठवणारेही बरेच लोक त्या संदेशाप्रमाणे वागत नाहीत. तसे इथले इथेच टाकून जाण्याची भाषा केवळ उच्चारली जाते. याचा अवलंब मात्र करीत नाहीत. त्यामुळे अनेक समस्या व्यक्तीगत जीवनात आणि समाजात निर्माण होत असतात. कोरोना सारख्या महामारीने जगाला रिकाम्या हाताने अचानकपणे जाण्याची बाब चांगल्याप्रमाणे शिकवली आहे. किमान अशा महामारीकडे बघून तरी सर्वांशी चांगले वागण्याचा प्रयत्न करायला हवा. भावाभावातील वाद ही आईवडिलांसाठी फार दुःखाची बाब असते. त्यांना दुःख देण्यासारखे वागणे म्हणजे आपल्या कर्तव्यात मोठा कसूर करणे होय. समोरचा कसा वागतो आहे, त्यापेक्षा आपण कसे वागतो आहोत, हे जास्त महत्वाचे असते. त्यामुळे आपण चांगले वागावे. कधी ना कधी तरी समोरच्यातही बदल होईलच. असो, त्याचा बदल तो बघून घेईल, आपल्यातली सकारात्मका आपण वाढवू या.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# सुप्रभात

## आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २ एप्रिल २०२५ | श्री पंचमी लक्ष्मी पंचमी |
| विक्रम संवत् २०८२ | जगदंबादेवी यात्रा, आष्टा |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - चैत्र | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. पंचमी (२३.५०) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - कृत्तिका (०८.४९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - आयुष्यमान (२६.४९) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (१३.०७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

## राशीभविष्य

**मेष :** कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे.

**वृषभ :** आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. व्यापारात प्रगती राहील.

**मिथुन :** सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क :** व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, माान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह :** प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील. कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ :** आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक :** कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु :** सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणचाही राग करू नका. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर :** दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ :** व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन :** श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.मुलांच्या कामामुळे दुःखी रहाल.



# बोधिसत्व डॉ. आंबेडकर जयंती उत्सव महामंडळाच्या अध्यक्षपदी विकी शेंडगे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमि त्त झालेल्या बैठकीत बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळ उत्सव समितीच्या अध्यक्षपदी विकी शेंडगे यांची तर सचिवपदी अविनाश भडकुंबे यांची निवड करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील नार्थकोट मैदान, एक एकर जमीन येथे बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळ सोलापूर नूतन पदाधिकारी निवडीची बैठक पार पडली. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.औदुंबर मस्के यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. प्रारंभी तथागत गौतम बुद्ध व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीस महामंडळाचे विश्वस्त अध्यक्ष बाळासाहेब वाघमारे व विश्वस्त आनंद चंदनशिवे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली. यावेळी माजी पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

**अन्य पदाधिकारी असे :** उपाध्यक्ष - दिना मेंबर, दीपक गवळी, संदेश कांबळे ,गंगाधर गावडे, कार्याध्यक्ष - उमेश रणदिवे ,खजिनदार - दत्ता शिंदे आदींची निवड करण्यात आली.

# पहिली ते नववीच्या परीक्षा लवकर घेण्याची शिक्षकांची मागणी

## परीक्षा संपल्यानंतर पाच दिवसात निकाल लावताना अडचणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

इयत्ता दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा यंदा लवकर पार पडल्या. त्यानंतर इयत्ता पहिली ते नववीच्या परीक्षेपूर्वी सर्व शिक्षकांची प्रशिक्षण सुरू झाल्याने या विद्यार्थ्यांचे अध्ययन, अध्यापन आणि परीक्षेसंदर्भात शाळा स्तरावरील सर्व नियोजन कोलमडले. त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाचे काय होणार? याची चिंता पालक, शिक्षक, मुख्याध्यापकांना लागली आहे. मात्र, ऊन्हाची तीव्रता वाढत असताना पहिली ते नववीच्या २५ एप्रिलपर्यंत परीक्षा घेण्याचे शिक्षण विभागाचे नियोजन चुकीचे असल्याचे शिक्षकांमधून सांगण्यात येत आहे.

पहिली ते आठवीसाठी २० ऑगस्ट २०१०च्या निर्णयानुसार सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धती वापरली जाते. त्यानुसार आता द्वितीय सत्रासाठी आकारिक व संकलित मूल्यमापन सुरू आहे. आकारिक मूल्यमापनात प्रकल्प, नोंद वह्या, तर संकलित मूल्यमापनात लेखी परीक्षा अंतर्भूत असते. शिक्षकांची प्रशिक्षणे सुरू झाली. त्यामुळे इतर इयत्तांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष होत असल्याचे मुख्याध्यापक व शिक्षक सांगत आहेत. ऊन्हाचा पारा दिवसेंदिवस वाढत असताना उकाडयाने विद्यार्थी व शिक्षक हैराण होत असताना २५ एप्रिलपर्यंत परीक्षा घेण्याचे निर्णय बदलण्याची मागणी शिक्षकांमधून होत आहे.

### नववीपर्यंत परीक्षा एप्रिलअखेरपर्यंत घेण्याच्या सूचना

पूर्वी ५ एप्रिलपर्यंत नववीच्या परीक्षा संपत होत्या, मात्र यंदा ८ ते २५ एप्रिल असे नववीच्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. २५ एप्रिलला परीक्षा संपल्यानंतर पेपर तपासणी कधी करायची? अवघ्या पाच दिवसात निकाल कसा लावायचा, हा प्रश्न आता शिक्षकांसमोर पडला आहे.

**-भालचंद्र शिंदे शिक्षक, मंद्रुप**

---

परीक्षांबाबत शाळा स्तरांवर निर्णय होण्याऐवजी सरकारने निर्णय घेतला आहे. २५ एप्रिलपर्यंत परीक्षा असून पेपर तपासणी करून पाच दिवसात निकाल लावताना अडचणी येणार आहेत. ऊन्हामुळेही विद्यार्थ्यांना परीक्षा दरम्यान त्रास होणार आहे. त्यामुळे सरकारच्या चुकीच्या निर्णयामुळे विद्यार्थी व शिक्षकांवर परीणाम होणार आहे. पाच दिवसात पेपर तपासून निकाल लावणे मुश्कील आहे.

**-भोजराज कवचाळे शिक्षक, शंकरनगर**

### दहावीचा अभ्यासक्रम कधी सुरू करणार?

नववीसाठी ८ ऑगस्ट २०१९च्या शासन निर्णयानुसार प्रश्नपत्रिका काढल्या जातात. परंतु, हे सर्व काम शासनाच्या निर्णयानुसार सुरू असतांना यंदा दहावी आणि बारावी परीक्षा वेळेआधी घेण्यात आली. ऐनवेळी घेतलेल्या निर्णयामुळे परीक्षा उशिरा होत आहेत. आता दहावीचा अभ्यासक्रम कधी सुरू करणार याकडे विद्यार्थी, पालकांचे डोळे लागले आहेत.

# ११ दिव्यांगांनी घेतला विवाह प्रोत्साहन योजनेचा लाभ

## प्रति लाभार्थी पन्नास हजार अनुदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

महाराष्ट्र राज्य, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या दिव्यांग विवाह प्रोत्साहन योजनेअंतर्गत २०२४-२५ या वर्षात ११ दिव्यांग लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे, अशी माहिती जिल्हा परिषद सम ाजकल्याण विभागाच्या समाजकल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे यांनी दिले .

या योजनेसाठी यंदा सन २०२४-२५ या वर्षी शासनाकडून १७ लाखांचा निधी उपलब्ध झाला आहे. त्यातून जिल्ह्यातून दाखल झालेल्या ११ अर्जदार लाभार्थ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपये प्रम ाणे पाच लाख ५० हजार रुपये अनुदानाचे वाटप नुकतेच करण्यात आले आहे. सम ाजकल्याण विभागाकडे सद्या अद्यापही १२ लाख ५० हजार रुपये अनुदान हे शिल्लक असून जिल्ह्यातून आणखी अर्ज दाखल झाल्यास त्यांना अनुदान देण्यात येईल असेही सोनवणे यांनी सांगितले. राज्यात ही योजना सन १७ जुन २०१४ पासून राबवण्यात येते. दिव्यांग अव्यंग व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून अपंगाना आर्थिक सहाय्य म्हणून ही योजना राबविण्यात येते. योजनेसाठी शासनाकडून प्रतिवर्षी निधी उपलब्ध केला जातो.

याच योजनेतून गेल्या वर्षी सन २०२३-२४ मध्ये फक्त ५ लाभार्थ्यांनी लाभ घेतला होता. या त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या सम ाजकल्याण अधिकारी या कार्यालयाकडे अर्ज सादर करावा. असे आवाहन सोनवणे यांनी केले आहे.

### ४० टक्केपेक्षा जास्त अपंग असणे आवश्यक

योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थी हा वधू किंवा वर यापैकी एक ४० टक्केपेक्षा जास्त अपंग असणे आवश्यक आहे. त्याबाबत प्रमाणपत्र असावे, विवाह हा कायदेशिररित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा, तसेच या योजनेसाठी एक दिव्यांग व्यक्ती व सदृढ व्यक्तीने विवाह करणे गरजेचे आहे. विवाह झाल्यानंतर किमान एक वर्षाच्या आत त्यांनी कार्यालयाकडे अर्ज दाखल करावा.




# व्हिडीओ निर्मिती स्पर्धेत रेवणसिद्ध कट्टे यांचा दुसरा क्रमांक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

सेवासदन प्रशालेतील सहशिक्षक रेवणसिद्ध कट्टे यांनी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वेळापूर व शिक्षण विभाग जिल्हा परिषद सोलापूर यांच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय व्हिडीओ निर्मिती स्पर्धेत व्दितीय क्रमांक प्राप्त केला. त्यांना दोन हजार रुपये रोख, प्रशस्तीपत्रक व मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य जितेंद्र साळुंखे अधिव्याख्याते शशिकांत शिंदे उपस्थित होते. सेवासदन संस्था अध्यक्षा शीला मि स्त्री, सचिव वीणा पतकी, शालेय समिती अध्यक्ष विदया लिमये, कार्यकारिणी सदस्य पद्माकर कुलकर्णी, प्रशालेच्या मुख्याध्यापिका राजेश्री रणपिसे , उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई , पर्यवेक्षिका स्वाती पोतदार यांनी अभिनंदन केले.

# पद्मशाली समाज संयुक्त समन्वय समिती निवडीचे काय झाले?

**सर्वसामान्य समाजबांधव विचारताहेत सवाल**

**तभा वृत्तसेवा-**
**सोलापूर, दि. १ एप्रिल**


पद्मशाली समाजाशी निगडित सोलापूर महापालिका, महाराष्ट्र शासन, केंद्र शासन स्तरावरील विविध कामे, प्रश्न, समस्यासंदर्भात पाठपुरावा करुन त्या-त्या प्रश्नाचे निवारण करण्याच्या अनुषंगाने पद्मशाली समाज संयुक्त समन्वय समिती निवड करण्याचे सन २००७ मध्ये ठरले होते. परंतु आजतागायत सदर निवडीचा विषय भिजत घोंगडे पडले आहे. त्यामुळे पद्मशाली समाज संयुक्त समन्वय समिती निवडीचे काय झाले? असा संतापजनक सवाल पद्मशाली समाजातील सर्वसाम ान्य लोक विचारत आहेत.

एकेकाळी सामाजिक, सहकार, राजकीय आदी क्षेत्रात पद्मशाली समाजाचा दरारा होता. मॉर्शल लॉ चळवळीतही तेलुगु लोक अधिक संख्येने सामील झाले होते. पूर्वविभाग बोले, सोलापूर हाले अशी परिस्थिती होती. परंतु राजकीय पक्ष व इतर काही समाजाकडून पद्मशाली समाजाचा वापर करण्यात आला. बँका, मिल चालू असताना तर शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी स्वतःचे खिसे भरुन घेतले. आणि पद्मशाली समाजातील लाक रिबेट लाटतात असे सांगत बदनामी केली, याकडेही लक्ष वेधले जात आहे.

या समन्वय समितीत ज्येष्ठ सम ाजधुरिण, त्या-त्या क्षेत्रातील अभ्यासू समाजबांधव, लोकप्रतिनिधी आदींचा समावेश असावा तभा वृत्तसेवा. विडी, यंत्रमाग उद्योगाला भेडसावणारे प्रश्न, विशेष मागास प्रवर्गातंर्गत मिळणाऱ्या सोयी-सवलती, बेरोजगारांच्या हाताला काम, पूर्वभागाला पुर्नवैभव मिळवून देणे, श्री मार्कंडेय मंदिर परिसरातील अतिक्रमण हटविणे, शांतीधामचा सर्वांगीण विकास, समाजाची होत असलेली बदनामी थांबविणे यांसह त्या-त्या स्तरावरील प्रश्नांविषयी एकदिलाने आवाज उठविण्याचेही एकमताने ठरले होते. सहकार व राजकीय क्षेत्रात तर पद्मशाली समाजाची पुर्णतः पिछेहाट झालेली आहे. अक्कलकोट रोड एम आयडीसी येथील बहुसंख्य कारखाने ह्या पद्मशाली समाजातील व्यक्तीकडे होते. परंतु आता ती परिस्थिती राहिलेली नाही. गरीबातील गरीब पद्मशाली सम ाजबांधव काबाडकष्ट करुन आपल्या पाल्यांना पदवी, पदव्युत्तर पर्यतचे शिक्षण दिले आहे. परंतु सोलापुरात नोकऱ्यांचा अभाव असल्याने युवा व तरुण पिढी पुणे, मबई, हैद्राबाद, बेंगळुरु यांसारख्या शहरांकडे धाव घेत आहे.

# संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती,
मो. ९९६००५३५२१

### अलकः- (९५) पॉवर हाऊस

संघ ही एक स्वाभाविक संघटित बलशाली समाज उभा करण्याची एक प्रक्रिया आहे. संघ करणार काहीही नाही, पण संघाला अपेक्षित ते सर्व काही घडेल, ही भूमिका सर्वसाधारणपणे सम जायला सोपी नाही. संघाची शाखा सगळा समाज संस्कारीत करण्याचा प्रयत्न करते. श्री बाळासाहेब देवरस नेहमी एक उदाहरण द्यायचे हे उदाहरण डॉक्टरजी, गुरुजी पण द्यायचे. संघ हे एक पॉवर हाऊस आहे. पावर हाऊस मध्ये वीज निर्माण होते. मग त्या विजेवर बल्बही लागतो, पंखाही फिरतो आणि अजून आपण हवे ते करतो. पण पावर हाऊस म्हणजे बल्ब नव्हे, पंखा नव्हे, तर हे एक वीज निर्मितीचे केंद्र आहे. संघ हे असे समाजातील व्यक्ती व्यक्तीला संस्कारीत करणारे ऊर्जा केंद्र आहे. अशा संस्कारीत व्यक्ती मग समाजातील सर्व क्षेत्रात अनुकूल प्रभाव निर्माण करतील. व संघाला अपेक्षित ते घडवतील. हा विश्वास सार्थ ठरला आहे. कारण संघाच्या विचारांच्या अनेक शाखा आहेत. ज्याला Umbrella organisationम्हणतात. त्यांची आपण थोडक्यात ओळख करून घेऊ.

**क्रमशः**

## संक्षिप्त वृत्त



### रसिका व सानिकांच्या गीत रामायण सादरीकरणाने भाविक मंत्रमुग्ध

**सोलापूर, दि. १ एप्रिल-**

श्रीक्षेत्र तीर्थ (ता.द.सोलापूर) येथे रसिका व सानिका कुलकर्णी यांनी गीत रामायणातील कुश लव रामायण गाती, पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा, सेतु बांधारे सागर असे अनेक गीत रामायणातील पदे सादर करुन भाविकांची मने जिंकली. याप्रसंगी देवयानी जोशी, सुक्रुता कुलकर्णी, अतुल कुलकर्णी यांनी रामायणातील पदे सादर केली. तबल्यावर साथ अक्षय भडंगे व वैभव कुलकर्णी यांनी दिली. आरती इंगळे यांनी उत्कृष्ट निवेदन केले. श्री रामलिंगेश्वर प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक रामलिंगेश्वर सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. डॉ. भीमाशंकर बिराजदार यांनी केले. आजची प्रसाद सेवा माजी सरपंच शिवशरण सुतार यांनी केली सूत्रसंचालन व आभार अजित पट्टणशेट्टी यांनी केले. कार्यक्रमास जितीन कुलकर्णी, मनिषा पाटील, आरती इंगळे, संगप्पा उदंडे, बसवराज कुर्ले, श्रीशैल चितले, विश्वनाथ पावले, प्रभुलिंग शेळगे सोमनाथ पाटील, अजित पट्टणशेट्टी उपस्थित होते.

### परमेश्वर यात्रा महोत्सवानिमित्त उद्या विविध धार्मिक कार्यक्रम

**अक्कलकोट दि.१ एप्रिल**

तालुक्यातील गौडगांव (खुर्द) येथील जागृत श्री परमेश्वर यात्रा महोत्सवानिमित्त ३ एप्रिल रोजी श्री.म.नि.प्र. प्रभुशांतलिंग महास्वामीजी



विरक्त मठ, हत्तीकणबस आणि श्री.ष.ब्र. शांतवीर शिवाचार्य महास्वामीजी, संस्थानमठ, चलगेरी यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहेत. गौडगांव (खुर्द) ता. अक्कलकोट येथे गुरुवार ३ एप्रिल २५ रोजी सकाळी नऊ वाजता धर्मसभा कार्यक्रम होणार असून या प्रसंगी मुख्य अतिथी म्हणून आमदार सचिन कल्याणशेट्टी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट, कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले,श्री स्वामी समर्थ देवस्थान अध्यक्ष महेश इंगळे यांची प्रमुख उपस्थितीत लाभणार आहे. तसेच याच दिवशी पहाटे श्री परमेश्वर लिंगास सामुहिक रुद्राभिषेक सहस्त्र बिलवार्चन व महाआरती होणार आहे. श्री वे. मु. चिदानंद स्वामी, श्री थे.मु. संतोष स्वामी, श्री वे.मु. इरण्णा नंदिकोल, वे.मु. रविराज मठपती, वे.मु. गंगाधर कळ्ळीमठ, श्री वे. मु. सिध्दलिंगच्या स्वामी सर्व पुज्य महास्वामीजी हस्ते सकाळी ठिक ९.०० वा. सुवासनिंचा ओठी भरणे कार्यक्रम होणार आहे. सायं. ४.०० वा. श्री वे. मु. नागय्या व. स्वामी यांच्या घरांपासून श्री परमेश्वर मंदिरापर्यंत श्री रिध्दी - सिध्दी नंदीध्वज धारक, सुभाष गल्ली, अक्कलकोट यांच्या सम्मुखातून मिरवणूक संपन्न होईल.



### अक्कलकोटमध्ये शेतकरी क्रांती सेना संघटनेची स्थापना

**अक्कलकोट, दि. १ एप्रिल-**

शेतकऱ्यांवर वारंवार होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी राजकीय पक्ष विरहित शेतकरी क्रांती सेना संघटनेची गुढीपाडव्यादिवशी स्थापना करण्यात आल्याची माहिती शेतकरी सेनेचे प्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. पीक विमा, हमीभाव, शेतीसाठी पाणी, खत व्यवस्थापन, ऊसदर, तलाव जोडोसह शेतकऱ्यांच्या प्रत्येक कामासाठी संघर्ष करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणे, शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे जीवन उंचावणे, उत्पादनासाठी शेतकऱ्यांना ट्रेनिंग देणे, गट शेती करून शेतकऱ्यांचा खर्च कमी करणे, शेतकऱ्यांच्या पीक निर्यातीसह सर्व शेती संबंधित निगडित विषयासाठी व्यापक काम करण्यासाठी शेतकरी क्रांती सेनेची स्थापना करण्यात आली आहे. अक्कलकोट तालुक्यातील व सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी शेतकरी क्रांती सेनेशी संपर्क साधावा, प्रत्येक कामात शेतकरी क्रांती सेना आपल्याला मदत करण्यासाठी धाऊन येणार असल्याचा विश्वास बुक्कानुरे यांनी यावेळी दिला. याप्रसंगी शेतकरी सेनेचे पदाधिकारी शरण सुरवसे, बसवराज बिराजदार, महांतेश हत्तुरे, मल्लिनाथ अरवतकल, राम जाधव, मोहम्मद पठाण, श्रीशैल स्वामी, गुरुनीगप्पा आप्पा पाटील, शांतिवीर कळसगोंडा, स्वामीनाथ प्रचंडे, बसवराज पुजारी, जितू अनंतपुरे, संतोष पाटील, चंद्रकांत कुंभार, सिद्धाराम बिराजदार, मल्लू कल्याण, उमेश साळुंखे, मृगेंद्र मुदेनकेरी, अफसर मकानदार, श्रीशैल दानशेट्टी, हनुमंत नागोरे, रफिक मुजावर, बिरू माळगे, कृष्ण राजपूत, भीमा भासगी, आदित्य हिबारे, संजय अरवतकल, सुनील धर्मसाले, नागू शिंदे आदी उपस्थित होते.

### वळसंगमध्ये गुडी पाडवा उत्साहात



**वळसंग, दि. १ एप्रिल-**

वळसंग तालुका दक्षिण सोलापूर येथे गुढीपाडवा हिंदू नववर्ष अति उत्साहात सादर करण्यात आले. देवाची पूजा व घरावराती गुडी उभा करून अनेकांनी विधिवत पूजा केले. घरात विधिवत पूजा करून पोळा, आंब्याची चटणी, आमटी त्यात विशेष म्हणजे लिंबाची फुल, पान, गूळ आणि विविध मसाले घालून भेवू असे पाढवाचे खास खाणारा पदार्थ करण्यात येतो. भेवूं म्हणजे लिंबाची फुल आणि गूळ मिश्रित पदार्थ या प्रमाणे आमच्या जीवनात सुख दु:ख दोन्ही सारखे व गोडवा जास्त असावा असे देवाकडे प्रार्थना केली जाते. गुडी उभारून गणेश सदाशिव कराडकर व त्यांचे धर्मपत्नी यांच्याकडून पूजा करण्यात आले.

---

### वेताळ शेळके 'महाराष्ट्र केसरी'चा मानकरी

# बेंबळे गावात गुढीपाडव्यादिवशी दिवाळी

## पृथ्वीराज पाटीलला धूळ चारत पटकावली मानाची गदा



**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १ एप्रिल-**

अहिल्यानगर येथे महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने झालेल्या ६६ व्या महाराष्ट्र केसरी किताब व मानाची गदा बेंबळे (ता.माढा) येथील वेताळ शेळके या मल्लाने जिंकली. त्याच्या या यशामुळे बेंबळे गावामध्ये गुढीपाडव्यादिवशी दिवाळी साजरी करण्यात आली. गावातील नागरिकांनी एकच जल्लोष केल्याचं दिसून आले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत जामखेड येथे झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्तीस्पर्धेत वेताळ उर्फ दादा शेळकेने पृथ्वीराज पाटील यास सात गुणांनी चीतपट करून महाराष्ट्र केसरी किताब पटकावला. पृथ्वीराज पाटील यास अवघा एक गुण मिळाला. शेतकरी कुटुंबातील पैलवान वेताळ उर्फ दादा शेळके हा बेंबळे येथील एका साध्या शेतकरी कुटुंबातील मुलगा असून त्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गावातच झाले आहे. त्याला पहिल्यापासूनच कुस्तीचा नाद होता. नंतरच्या काळात तो वरचेवर कुस्त्या जिंकत गेला आणि आज त्याने पृथ्वीराज पाटील याचा पराभव करत महाराष्ट्र केसरीची गदा पटकावली. सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील मुलाने मानाची गदा पटकावल्याने बेंबळे गावामधील सरपंच, ग्रामस्थांनी आतषबाजी करत वेताळ शेळके यांच्या कुटुंबावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

#### कोण आहे वेताळ शेळके?

सध्याचे गाव बेंबळे ता. माढा जि. सोलापूर. मूळ गाव बादलेवाडी (ता. माढा) माती विभागातून महाराष्ट्र केसरी किताबाच्या कुस्तीसाठी पात्र. प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पैलवान. मॅटवर सीनियर राष्ट्रीय कुस्तीस्पर्धेत पदककमाई. जागतिक आणि आशियाई कुस्ती स्पर्धेत सहभाग. मातीवरच्या कुस्तीतही तरबेज. प्रशिक्षण आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुल पुणे. प्रशिक्षक काका पवार.

#### वेताळ शेळकेची खिलाडूवृत्ती

खेळात खिलाडूवृत्ती ही महत्त्वाची असते. कर्जतमध्ये झालेल्या ६६व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत या खिलाडूवृत्तीचे दर्शन घडले.अत्यंत अटीतटीने आणि आक्रमकपणे झालेल्या अंतिम लढतीत सोलापूरच्या वेताळ शेळके याने गुणांच्या आधारावर मुंबईच्या पृथ्वीराज पाटील याच्यावर विजय मिळवत महाराष्ट्र केसरीची मानाची गदा पटकावल्यानंतर विजेता वेताळ शेळके याने उपविजेता पृथ्वीराज पाटील यास खांदयावर घेऊन मैदानाला फेरी मारत उपस्थितांची मने जिंकली.

#### मातेच्या डोळ्यातील अश्रू थांबेनात

वेताळ शेळकेने बक्षीसरूपात महाराष्ट्र केसरीची गदा मिळाल्याचे समजल्यानंतर त्याची आई केशरबाई यांना आनंदाने अश्रू अनावर झाले. अतिशय कष्टाने वाढविलेल्या आपल्या मुलावर बाळूमामा व पंढरीच्या विठुरायाचे आशीर्वाद व कृपादृष्टी असल्यानेच माझ्या लेकराला हे एवढे मोठे यश प्राप्त झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

---



# शनिवारपासून रंगणार श्रीराम संगीत महोत्सव

### प्रियांका क्षीरसागर, सुशील कुलकर्णी प्रस्तुत मैफिल सप्तसुरांचीने वाढणार रंगत

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १ एप्रिल-**

प्रतिवर्षाप्रमाणे श्रीरामनवमी निमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या १४ व्या श्रीराम संगीत महोत्सवाचे आयोजन शुक्रवार, शनिवार दि. ४ व ५ एप्रिल रोजी करण्यात येणार असल्याची माहिती नादब्रह्म कला फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर दुधाणे यांनी दिली.

करकंब येथे अनेक वर्षांपासून रामनवमी निमित्त सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी नादब्रह्म कला फाऊंडेशन करकंब व श्रीराम प्रतिष्ठान प्रयत्न करत आहे. त्यानिमित्त श्री चैतन्य श्रीराम मंदिरासमोर रात्री ७:३० वा.दोन दिवस श्रीराम संगीत महोत्सव संपन्न होत असून या महोत्सवामध्ये प्रथम दिन शुक्रवार दि. ४ एप्रिल रोजी उदयोन्मुख गायिका प्रियांका क्षीरसागर यांची अभंग गवळणीचा सुरेल अविष्कार संपन्न होणार असून त्यांना तबलासाथ धनंजय रोंगे, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, हार्मोनियम सुदर्शन कुंभार,टाळ माऊली पिसे करणार आहेत. शनिवार दि.५ एप्रिल रोजी सुशिल कुलकर्णी प्रस्तुत मैफिल सप्तसुरांची मराठी अभंग,भावगीते,मराठी चित्रपट गीतांचा सहकलाकारांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न होणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नादब्रह्म कला फाऊंडेशन अधिक परिश्रम घेत आहेत. अधिक माहितीसाठी ९७६७७७६८५८ याक्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन फाऊंडेशनच्यावतीने करण्यात आले.

---

# डॉ. राहुल पालके यांच्या कवितेमधून एकतेचे दर्शन

**बार्शी, दि. १ एप्रिल-**

गुढी पाडवा व रमजान निमित्त येथील कवी डॉ. राहुल पालके यांनी सामाजिकता वृद्धिंगत करणाऱ्या गुढी पाडवा व मी भारतीय या कवितांचे लेखन व सादरीकरण केले.

भारत हा विविधतेने नटलेला संपन्न देश आहे. सण, उत्सव, परंपरांना भारतात विशेष स्थान आहे. हाच धागा पकडून विशेष या कवितांमध्ये हिंदू - मुस्लिम एकतेचे दर्शन घडते. मी भारतीय या कवितेद्वारे ते म्हणतात, धर्म, जात, भाषा ...इथे भिन्न आहे ...अभिन्न भारतात ...एकतेचे रूप आहे. गुढी पाडवा या कवितेत ते मांडतात, गुढी पाडव्याचा क्षण आहे ...कटु सल्ला असला तरी ...लिंबाचा पाला गुणकारी आहे ...बोल जरी तिखट असले तरी साखरेचा हारात गोडवा आहे. याद्वारे त्यांनी एकतेचा संदेश दिला आहे.त्यांच्या या कवितांमधून भारतीय होण्याचा मार्ग मांडला आहे. असे असले तरी त्यांनी भारतातील विविध प्रदेशांमध्ये निमाण झालेल्या प्रश्नांकडे लक्ष वेधले आहे. धर्मनिरपेक्षतेचा साज आहे ...महासंवादाचा पूल बांधताना ...मात्र धर्मा-धर्मामध्ये वितुष्ट का येत आहे? असा प्रश्नही कवितांमधून विचारतात. त्याचबरोबर सामाजिक शांतता भंग झाल्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर ते बोट ठेवतात.मातेची आर्त आरोळी ...लहान मुलांची भयावह किंचाळी ...तरुणाईच्या जीवनाची रखरखती होळी ...जगण्याचीच ही राखरांगोळी ... या सर्वांवर मात करण्यासाठी ते म्हणतात. आकाश, नदी व तरुला दातृत्वाचे वरदान आहे ...हे माणसा, तुझ्यातल्या माणूस ... कधी जिवंत होणार आहे?

---

# शेलगाव क येथे 'सन्मान गावाचा... सत्कार शिलेदारांचा' कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि. १ एप्रिल-**

मराठी नववर्ष अर्थातच गुढीपाडवा निमित्त ग्रामपंचायत शेलगाव क च्या पुढाकारातून ३० मार्च रोजी सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्या शेलगाव क कृषी क्रांती गटाचा सत्कार तसेच वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय यश प्राप्त केलेल्या नागरिकांचा सत्कार समारंभ सन्मान गावाचा सत्कार शिलेदारांचा या कार्यक्रमाच्या निमित्ताने करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून गणेश करे-पाटील (अध्यक्ष यशकल्याणी सेवाभावी संस्था), सरपंच यमुना वीर, उपसरपंच लखन ढावरे, माजी सरपंच अशोक काटुळे, माजी सरपंच आत्माराम वीर, माजी उपसरपंच सचिन पाटील, सत्कारमूर्ती प्रा. प्रकाश काटुळे, ग्रामसेवक महेश काळे आदी उपस्थित होते.



यावेळी तलवारबाजी खेळाच्या माध्यमातून ठसा उमटविणारे प्रा. प्रकाश काटुळे, शेलगाव क गावामध्ये ग्रामस्वच्छता, जलसंधारण व वृक्ष संवर्धनाची चळवळ रुजविणारे ग्रामसेवक महेश काळे व फार्मर कप स्पर्धेमध्ये उल्लेखनीय यश मिळवल्याबद्दल शेलगाव क कृषी क्रांती गटाचा विशेष सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून एसटीआय, कृषी अधिकारी पद मिळविणारे तसेच वकील, प्राध्यापक, शिक्षक, हवालदार, केंद्रीय सुरक्षा बल, भारतीय रेल्वे इत्यादी विभागांमध्ये सेवा करणारे तसेच इंजीनियरिंग, डॉक्टर यासाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी, शिष्यवृत्ती तसेच क्रीडा स्पर्धेमध्ये उल्लेखनीय काम केलेले विद्यार्थी यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी रोहिणी वीर, गंगा काटुळे, अशोक काटुळे, प्रकाश काटुळे, महेश काळे, पोपट शिंदे, सायली पायघन यांनी मनोगते व्यक्त केली. प्रास्ताविक डॉ. विकास वीर यांनी केले. अध्यक्षीय मार्गदर्शन गणेश करे-पाटील यांनी केले. सूत्रसंचालन उदयसिंह काटुळे यांनी केले तर आभार ग्रामसेवक खाडे यांनी मानले.

#### यांचा झाला सन्मान

सायली पायघन, स्वप्नील वीर, समृद्धी वीर, डॉ. नागनाथ माने, शुभम वीर, ॲड. राहुल बनसोडे, ॲड. विशाल वीर, प्रविण वीर, राहुल वीर, विशाल वीर, अभय काटुळे, सुजित काटुळे, सचिन जगताप, विक्रांत वीर, उमेश वीर, महेश वीर, समाधान घाडगे, पांडुरंग घाडगे, उदयसिंह वीर, महेश वीर, तन्मय काटुळे, कौस्तुभ काटुळे, पूजा काटुळे, तेजस काटुळे, मयूर शिंदे, श्रेयस काटुळे, केदार पाटील, संग्रामसिंह पायघन, रोहित वीर, प्रथमेश वीर, गौरव वीर, निखिल काटुळे, वैष्णवी शिंदे, ऋतुजा शिंदे, प्रणव वीर, अक्षय वीर, सार्थक वीर, व्यंकटेश काटुळे, ओम काटुळे, नवता वीर, राजकन्या पाटील, मृणाली शिंदे, ज्ञानेश्वरी चोपडे, संस्कार शिंदे, सारंगी पाटील यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

---

# सांगोल्यातील फॅबटेक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला युजीसीकडून स्वायत्तता दर्जा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १ एप्रिल-**

सांगोल्यातील फॅबटेक कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड रिसर्चला देशातील शैक्षणिक क्षेत्रातील महत्वपूर्ण असलेला 'स्वायत्त' अर्थात 'ऑटोनॉमस दर्जा' शैक्षणिक वर्षे २०२५ ते ३५ दहा वर्षांसाठी प्राप्त झाला आहे. संस्थेच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय कामकाजाच्या उत्कृष्टतेची दखल घेत युजीसीने हा निर्णय घेतला आहे अशी माहिती प्राचार्य डॉ. रविद्र शेंडगे यांनी दिली.

या स्वायत्ततेमुळे फॅब्रटेक कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड रिसर्चच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या विषयात अधिक सखोल ज्ञान मिळवण्याची संधी मिळेल आणि ते भविष्यात यशस्वी व्यावसायिक बनू शकतील असा विश्वास सचिव डॉ. अमित रुपनर यांनी व्यक्त केला. फॅबटेक एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्षा नीलवर्णा रूपनर, उपाध्यक्ष भाऊसाहेब रुपनर, संचालक दिनेश रूपनर, व्यवस्थापक प्रतिनिधी प्रा .प्राजक्ता रूपनर, उप प्राचार्य डॉ.विद्याराणी क्षीरसागर तसेच शिक्षकवृंद, विद्यार्थ्यांनी या निर्णयाचे स्वागत केले.

> या स्वायत्ततेमुळे फॅब्रटेक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्चच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि ते इंजिनिअरिंग स्तरावर स्पर्धा करण्यास सक्षम होतील
>
> **- डॉ. संजय अदाटे, कॅम्पस डायरेक्टर, फॅबटेक एज्युकेशन सोसायटी**

---

# अक्कलकोटमध्ये हिंदू नववर्षानिमित्त शोभायात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ एप्रिल-**

गुढीपाडव्याचे औचित्य साधून हिंदू नववर्षानिमित्त येथील हिंदु नववर्ष महोत्सव समितीच्या वतीने शोभायात्रा काढण्यात आली.

ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिरापासून शोभायात्रेची सुरूवात करण्यात आली. शहरातील विविध मार्गावरून निघालेल्या या शोभायात्रेत विविध पथक, पारंपारिक वाद्ये, पारंपारिक वेशभूषा परिधान केलेले विविध समाजातील नागरिक सहभागी झाले होते. याप्रसंगी भगवा ध्वज, बँड पथक, बँजो, हलगी, वारक-यांचे दिंडी पथक, हिंदु धमातील विविध समाजाचे दैवत, महापुरुषांचे, संत, समाजसुधारक यांचे प्रतिमांचे डिजिटल बॅनर कटआऊट रिक्षांवर लावून अबाल वृद्ध, महिला, पुरुष या यात्रेत सहभागी झाले होते. माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, समर्थ नगर ग्रामपंचायतचे प्रदीप पाटील, शोभायात्रा प्रमुख आनंद खजुरगीकर, सहप्रमुख ऋषीकेश लोणारी, रा.स्व.संघाचे संघचालक रवींद्र जोशी, तालुका कार्यवाह चेतन जाधव, सहकार्यवाह संतोष वगाले, जेष्ठ स्वयंसेवक गुंडु अण्णा येळमेली, समाजसेवक तम्मामामा शेळके, महेश हिंडोळे, आनंद तानवडे, वृषभराज तानवडे, शिवशरण जोजन, संजय भागानगरे, राजू एकबोटे, प्राचार्य डॉ. शिवराया अडवितोटे, प्रसाद हारकुड, महेश वागदरे, प्रितेश किलजे, प्रशांत शिंपी, सायबण्णा सोनकांबळे सहभागी झाले होते. यात्रेचा समारोप श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे करण्यात आला. अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेंजयराजे भोसले यांनी शोभायात्रेचे स्वागत केले व उपस्थित सर्वांना अन्नछत्र मंडळाकडून अल्पोपहार देण्यात आला.



---

# गौडगावच्या मारुती मंदिरात विविध कार्यक्रम

## ४८ जणांचे रक्तदान; शनि अमावस्या, गुढीपाडव्यानिमित्त भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ एप्रिल-**

शनि अमावास्या व गुढीपाडव्यानिमित्त तालुक्यातील गौडगाव येथील दक्षिणमुखी जागृत मारुतीच्या दर्शनासाठी यंदा भाविक भक्तांची प्रंचड गर्दी झाली असून अन्नछत्र मंडळात महाप्रसाद घेऊन भाविक तृप्त झाले. यावेळी ४८ जणांनी रक्तदान केले. भक्तिमय व मंगलमय वातावरणात धार्मिक विधिवत पूजा पार पडली.

तालुक्यातील गौडगाव येथे मारुती मंदिरात शनी अमावस्येनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यासह कर्नाटक,आंध्र प्रदेशातूनही मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी आले होते. दरम्यान, शनि अमावास्यानिमित्त गौडगावच्या जागृती मारुती मंदिरात शनिवारी पहाटे ५ वाजता मारुतीस महारुद्राभिषेक, होम हवन, शनिपूजा, गजलक्ष्मी पूजा होऊन महाआरती संपन्न झाली. दुपारच्या महाआरतीचा मान पंढरपूरचे साहेबराव



श्रीरंग नागणे यांना मिळाला. महात्मा बसवेश्वर ब्लड् बँक सोलापूर यांच्याकडून रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. मारूतीच्या दर्शनासाठी आलेल्या हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.नवग्रह पूजा, होमहवन, गजलक्ष्मी पूजा, पानपूजा, यज्ञ, रुद्राभिषेक इत्यादी धार्मिक कार्यक्रम झाले. शनि अमावस्येनिमित्त व गुढी पाडवा हा योग जुळून आल्याने भाविकांनी अलोट गर्दी केली होती. दर्शन रांग मंदिरापासून दोन किलोमीटर अंतरापर्यंत लागली होती. भक्तांच्या वाहनांची रांग स्टेशनपासून मंदिरापर्यंत लागली होती. या गर्दीमुळे गावात जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते

यावेळी मंदिर समितीचे सिद्राम वाघमोडे, प्रकाश मेंथे, फुलारी, चौडप्पा सोलापुरे, विराप्पा पुजारी, शांतया स्वामी, परमेश्वर सुतार, प्रकाश सनकळ, भारत ननावरे, श्रीशैल कुंभार, आमसिद्ध कोरे, श्रीमंत सवळतोट, श्रीमंत म्हेने मल्लिनाथ म्हेत्रे आदींची उपस्थित होती.

#### भक्त निवास हाऊसफुल्ल

भाविकांची गर्दी मोठी होती. कर्नाटक, आंध्र प्रदेशातूनही भाविक मोठ्या संख्येने आल्याने भक्त निवास हाऊसफुल्ल झाले होते. परगावी आणि परराज्यातून आलेल्या भक्ताला दर्शनासाठी १७ तास लागत होते. मध्यरात्रीपासून ते रात्री नऊ वाजेपर्यंत रांगा लागल्या होत्या.


---

# श्री स्वयंभू जागृत पंचमुखी मारुती देवस्थान यात्रेला उत्साहात प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १ एप्रिल-**

तालुक्यातील म्हैसलगे येथील श्री स्वयंभू जागृत पंचमुखी मारुती देवस्थान यात्रा मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. दरवर्षी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर या यात्रेला प्रारंभ झाला.

रविवारी रोजी सकाळी ८ वाजता पंचांग पठण झाले. पालखी उत्सव कार्यक्रम पार पडला. याशिवाय दि. ६ एप्रिल रोजी श्रीराम जन्मोत्सव कार्यक्रम दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आला आहे.८ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता दहीहंडी उत्सव व पालखी मिरवणूक व गंगशितळ व रात्री १० वाजता कन्नड सामाजिक नाटक सादर होणार आहे.९ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता जंगी कुस्ती व रात्री १० वाजता पुन्हा कन्नड नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे. १२ एप्रिल रोजी पहाटे ६ वाजता मुख्य हनुमान जन्मोत्सव कार्यक्रम व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.तरी या सर्व कार्यक्रमांचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थान पंचकमिटी व सर्व विश्वस्तांनी केले आहे.



# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## शिवसेना 'उबाठा'च्या वतीने नगरपालिकेस निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १ एप्रिल-**

मालमत्ता कर वसुलीस स्थगिती द्या, पाणीपुरवठा समान व सुरळीत करा, विकासकामे दर्जेदार करा, वाहनतळ करा, कचरा ठेका प्रकरणातील भ्रष्टाचाराची चौकशी करा यासह विविध मागण्यांचे निवेदन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्यावतीने अक्कलकोट नगरपालिकेस देण्यात आले. मागण्यांचा विचार न



केल्यास आंदोलनाचा इशारा माजी शहराध्यक्ष रविंद्र डोके यांनी दिला आहे. नगरपालिकेचे अधिकारी शशीकांत बिराजदार यांच्याकडे निवेदन दिले. यावेळी श्री. डोके, मनोज पवार, स्वामीराव मोरे, आयाज जमादार, श्रीशैल पाटील, गंगाराम धोत्रे, सोपान निकते उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### रमजानमुळे कुंभेजमध्ये दिसले सामाजिक ऐक्य : दिग्विजय बागल

**करमाळा दि. १ एप्रिल-**

कुंभेजच्या पठाण, शेख कुटुंबीयांकडून साजरी केली जाणारी ईद ही आगळी वेगळी आहे, यातून सामाजिक ऐक्याचा संदेश दिला जात आहे. हे कौतुकास्पद असून इतरांसाठी प्रेरणादायी आहे, असे मत दिग्विजय बागल यांनी व्यक्त केले. कुंभेज येथील ज्योतिर्लिंग मंदिरात आयोजित शिरखुर्मा मेजवानी प्रसंगी अनौपचारिक संवाद साधताना ते बोलत होते. पैगंबर पठाण, अमीन पठाण आणि आदम मकबूल शेख परिवार मागिल पाच वर्षांपासून ज्योतिर्लिंग मंदिरात सार्वजनिक स्वरूपात रमजान ईद आणि शिरखुर्म्याचा आनंद सर्वधर्मीयांसोबत एकत्र येऊन साजरा करत आहेत. याप्रसंगी पठाण कुटुंबियांकडून शिवसेना नेते दिग्विजय बागल यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी सरपंच गोकुळ शिंदे, बाबा शिंदे, सुरेश शिंदे, कल्याणराव साळुंके, महादेव शिंदे, राजेंद्र शिंदे. संतोष शिंदे, दिलीप पवळ,अशोक पवळ, बलभीम पवळ, शंकर वाघमारे, पैगंबर पठाण, अमीन पठाण, आदम शेख, ज्ञानेश्वर शिंदे, विशाल चौगुले, दादा जाधव, आश्रु तोरमल, किसन शिंदे, किशोर कदम, संतोष घोरपडे, सचिन शिंदे, तानाजी चांदणे, रविंद्र पवळ, सोमनाथ पवळ उपस्थित होते.

### शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेमध्ये परमेश्वर सुरवसे द्वितीय

**मोडनिंब, दि. १ एप्रिल-**

शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र शासनातर्फे शिक्षकांमध्ये निकोप स्पर्धा निर्माण होऊन दर्जेदार ई-साहित्य निर्माण व्हावे, यासाठी सर्व माध्यमाच्या सर्व शिक्षकांसाठी शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. पहिली ते बारावी पर्यंत सहा गटांमध्ये झालेल्या या स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोलंकरवाडी येथील उपशिक्षक परमेश्वर सुरवसे यांनी इयत्ता



पहिली ते दुसरीच्या गटात तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक तर त्याच गटात जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले. या यशासाठी त्यांचा सत्कार नुकताच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य जितेंद्र साळुंखे यांच्या हस्ते प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. जिल्हास्तरावरील द्वितीय क्रमांकाचे रुपये साडेआठ हजार व तालुकास्तरावरील द्वितीय क्रमांकाचे रुपये दोन हजार, प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. श्री शिवछत्रपती रंगभवन सोलापूर येथे मार्च रोजी हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमासाठी शशिकांत शिंदे, तुकाराम राजे, बापूराव जमादार उपस्थित होते. त्यांच्या या यशाबद्दल माढा तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी विकास यादव, विस्तार अधिकारी शिवराज ढाले, मुख्याध्यापक रामकृष्ण केदार, राजन सावंत, वामन यादव यांनी अभिनंदन केले.



### माने-बरकडेवस्ती शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**पिलीव, दि. १ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील बचेरी येथील जिल्हा परिषद माने-बरकडेवस्ती शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. बचेरी येथील ग्रामदैवत परशुराम महाराज यांच्या जयंतीनिमित्त ध्वजारोहण व गूळ वाटपाचा कार्यक्रम याच दिवसाचे औचित्य साधून याठिकाणी पहील्यांदाच स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुलांनी जुन्या व नव्या गाण्यांवर बहारदार नृत्य साजरे केले. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे आजी माजी पदाधिकारी, पालक, ग्रामस्थ, पिलीव केंद्रातील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातून तब्बल ९५ हजार रुपयांची बक्षीसे मिळाली. कार्यक्रमास मुख्याध्यापक जगदिश गोडसे, सहशिक्षक शितल कोल्हे यांनी परिश्रम घेतले.

### शहीद जवान भोजलिंग काळेल यांना पुण्यस्मरणानिमित्त अभिवादन

**सांगोला, दि. १ एप्रिल-**

शहीद जवान भोजलिंग काळेल यांच्या ८ व्या पुण्यस्मरणानिमित्त लक्ष्मीनगर, दंडाचीवाडी (ता. सांगोला) येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी सैनिक कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब साळुंखे यांचे हस्ते तिरंगा फडकवून सलामी देण्यात आली. हभप. हनुमंत महाराज आटपाटकर (विटलापूर) यांनी प्रवचनातून शहीद जवान भोजलिंग काळेल यांचे विषयी व देश प्रेमाविषयी विचार मांडले. कॅ.दत्ता केदार, वॉरंट ऑफिसर उत्तम चौगुले यांनी संरक्षण खात्यामध्ये जाऊन देशसेवा करण्याविषयी नव्या पिढीला प्रोत्साहनपर मनोगत व्यक्त केले. याावेळी शहीद भोजलिंग काळेल परिवारातर्फे उपस्थित असणाऱ्या सर्व माजी सैनिकांचा सन्मान करण्यात आला.

## ग्रिष्म ऋतू..कडक उन्हाळा..विठुरायास चंदनउटी

- उन्हाच्या तीव्रतेपासून विठुरायास शितलता
- पाडव्यापासून विठुरायास चंदनउटी पूजेस प्रारंभ
- दररोज दीड किलो चंदनाचा लेप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १ एप्रिल-**

दरवर्षी ग्रिष्म ऋतुमधील वाढत्या उन्हाच्या तीव्रते पासून विठुरायास शितलता मिळावी या भावनेतून पाडव्यापासून चंदनउटी पूजेस प्रारंभ करण्याची परंपरा आहे. त्यामुळे सोमवारी पाडव्यापासून दररोज दीड किलो चंदनाचा लेप विठ्ठलाला लावण्यात येणार असून ही पूजा मृग नक्षत्रापर्यंत चालणार आहे.

राजस सुकुमार मदनाचा पुतळा, रविशशिकळा लोपलिया कस्तुरी मळवट चंदनाची उटी, रूळे माळ कंठी वैजयंती संत तुकाराम महाराजांनी विठुरायाच्या चंदन उटी पूजेचे वर्णन केले आहे. गुढी पाडव्यापासून विठ्ठल रुक्मिणीची चंदन उटी पूजा सुरू झाली आहे. मृग नक्षत्रापर्यंत चंदन उटी पूजा केली जाते. पाडव्यापासून दररोज दुपारी चार वाजता मोठ्या भक्तीभावाने विठुरायाची चंदन उटी पूजा संपन्न होत असते. उन्हाळ्यातील असह्य करणाऱ्या उकाड्याबरोबरच तीव्र उष्णतेमुळे सर्वसामान्य माणसाच्या मनाची होणारी घालमेल आणि तगमग आपण नेहमीच अनुभवतो. उष्णतेचा मनुष्य आणि प्राणीमात्राला जसा त्रास होतो. तसाच देवांनाही होतो अशी धारणा भक्तांमध्ये असते. उन्हाळ्यातील उष्णतेपासून विठुरायाचे ही संरक्षण व्हावे व थंडावा मिळावा यासाठी दरवर्षी चंदन उटी पूजा केली जाते. ही परंपरा अनेक शतकापासून मंदिरात सुरू आहे. सध्या दररोज दीड किलो सुवासिक



चंदन उगाळून त्याचा विठ्ठल आणि रुक्मिणीमातेच्या सर्वांगाला लेप लावला जातो. चंदन उटी पूजेमुळे नेहमीपेक्षा देवाचे रूप अधिक खुलून दिसते. हेच सुंदर देवाचे रूप डोळ्यांत साठवून ठेवण्यासाठी भाविक आतूर असतात. चंदन उटी पूजेसाठी दरवर्षी भाविकांकडून आगाऊ नोंदणी केली जाते. याच काळात मंदिर समितीला चांगले उत्पन्न ही मिळते. दर वर्षी गुढी पाडवा ते मृग नक्षत्र पर्यंत दररोज दुपारी चार वाजता खास चंदन उटी पूजा केली जाते. चंदन हे अतिशय सुगंधी, शीतल असते. चंदनाच्या याच गुणामुळे दिवसभरातील हवेतील उष्णतेने शिणलेल्या विठुरायाला शीतलता वाटावी यासाठी रोज दुपारी सुगंधी अशा चंदनाचा लेप सर्वांगाला लावला जातो.

### अशी केली जाते चंदनउटी पूजा

पाडव्या पासून या चंदन उटी पुजेस प्रारंभ करण्याची परंपरा आहे. या पूजेच्या वेळी विठ्ठल आणि रुक्मिणीमातेच्या मुर्तीला चंदनाचा लेप लावण्यात येत असतो हे या पूजेचे खास वैशिष्ठ आहे. विठ्ठल मुर्तीचा चेहरा सोडून बाकी माने पासून ते कमरे पर्यंतच्या सर्वांगाला या पूजेच्या वेळी चंदनाचा लेप लावला जात असतो.

### ऋतुमानानुसार विठुरायाच्या खानपानात होतो बदल

चंदन उटीपूजे नंतर देवाला शिरा, पोहे, सुका मेवा कैरीच पन्हे आणि थंड लिंबू सरबत असा खास नैवद्य ही दाखवला जातो. चंदन उटी पूजेसाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने कर्नाटकामधील बंगळूर, म्हैसूर येथून उच्च प्रतीचे सुंगधी ४०० किलो चंदन खरेदी केले आहे. पूजेसाठी रोज दीड किलो चंदन उगाळून त्याचा लेप देवाला लावला जातो. चंदन उटी पूजेमुळे देवाचे रुप सुवर्णालंकारा पेक्षाही उठून दिसते म्हणूनच अनेक भाविक चंदन उटी पूजा करून समाधान मानतात.

## सांगोल्यात ५ व ६ एप्रिलला सिंचन परिषदेचे आयोजन

### जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांच्या हस्ते होणार उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१ एप्रिल-**

येथील सांगोला महाविद्यालयात दि.५ व ६ एप्रिल रोजी २१ व्या महाराष्ट्र सिंचन परिषदेचे आयोजन करण्यात आले असून त्याचे उदघाटन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी जलसंपदा सचिव डॉ.संजय बेलसरे, कार्यकारी संचालक अतुलजी कपोले, सरपंच पोपटराव पवार उपस्थित राहणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ.दि.मा. मोरे व स्वागताध्यक्ष बाबुरावभाऊ गायकवाड यांनी दिली.

या राज्यस्तरीय सिंचन परिषदेमध्ये शनिवारी दि.५ एप्रिल रोजी राजेंद्र पवार, तुषार जाधव, डॉ.राहुल तोडमल (बारामती), डॉ. अशोक कडलग, राजेंद्र कासार, डॉ.सुरेश कुलकर्णी, हनुमंत देशमुख, लक्ष्मीकांत वाघावकर, गोवर्धन कुलकर्णी, सीमा जाधव (पुणे), डॉ.बी.डी.जडे, सोमनाथ जाधव, संतोष डांगे (जळगाव), अनिल दडीच, ज्ञानदेव बोडके (माण), डॉ.विनोद पाटील (उदगीर), शेलेन्द्र गाताडे (मालगाव), सुनील काटकर (कोल्हापूर), वंदना दाभाडे, केशवराव मिसाळ (सांगली), गोवर्धन ढोबळे (वाशीम), डॉ.आ.गो.पुजारी (सांगोला), अरुणा शेळके, रावसाहेब पुजारी, बाळासाहेब मेटे, प्रा.डॉ.बी. डी. पाटील मार्गदर्शन करणार आहेत.

रविवारी दि.६ एप्रिल रोजी डॉ.विलास शिंदे (कोल्हापूर), प्रभाकर चांदणे, केशवनाना भोसेकर, अनिरुद्ध पुजारी, डॉ.मच्छिंद्र सोनलकर (सांगोला), वसंत घनवट (माळेगाव), सुधाकर चौधरी (सिंदखेडराजा), स्नेहल लोंढे (कवठेमहांकाळ), प्रताप चिपळूणकर (कोल्हापूर), डॉ. भगवानराव कापसे (जालना), रा.बा.घोटे, नारायण देशपांडे, रामलिंग मुंगळीकर, रमेश जवळगे (लातूर), रणजीत जोशी (सोलापूर) हे मार्गदर्शन करणार आहेत.

सिंचन परिषदेचा समारोप पद्मश्री पुरस्कारप्राप्त सरपंच पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या सिंचन परिषदेचा अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन सां. ता.उ.शि.मंडळाचे सचिव ॲड.उदयबापू घोंगडे, प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांनी केले आहे.



## संत विचारांची मौलिक तत्वे आत्मसात करा

### हभप चैतन्य महाराज वाडेकर; मंगळवेढा येथील कीर्तनात आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १ एप्रिल-**

मानवी जीवनाचे सार्थक होण्यासाठी स्वतःचे स्वतःला कौतुक वाटेल असे जीवन जगून संत विचारांची मौलिक तत्वे आत्मसात करा असे आवाहन युवा कीर्तनकार ह.भ.प.चैतन्य महाराज वाडेकर यांनी येथे केले.

येथील दिवंगत महादेव आवताडे यांच्या १९व्या पुण्यस्मरणानिमित्त कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी आ. समाधान आवताडे यांच्या हस्ते स्व. आवताडे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आपल्या तेजस्वी आणि ओजस्वी वक्तृत्वातून संत विचारांच्या अद्वितीय स्फूर्तीकुंदीत प्रगल्भतेच्या प्रेरणादायी गाथेची उत्तुंग मांडणी चैतन्य महाराजांनी केली. स्व.आण्णांची व्यक्तीभूमिका ही केवळ प्रेरणा नव्हे, तर यशस्वी भविष्याचा दीपस्तंभ आहे.

आवताडे परिवाराच्या उभारणीसाठी आणि सामाजिक प्रतिष्ठेसाठी त्यांनी केलेला त्याग, कुशल मनवता आणि लोककल्याणकारी समाजशीलता यांचा ठेवा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा हा वैचारिक कीर्तन व व्याख्यान उपक्रम निश्चितच सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. यावेळी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे मा.व्हाईस चेअरमन बबनराव आवताडे, श्री संत दामाजी मंदिर समितीचे अध्यक्ष विष्णूपंत आवताडे, जिल्ह्याचे मा. आमदार प्रशांत परिचारक, उद्योगपती संजय आवताडे, सिद्धेश्वर आवताडे, सोमनाथ आवताडे, सुशील आवताडे, उद्योजक स्वप्निल आवताडे, शैलेश आवताडे उपस्थित होते.

## 'स्वानंद'च्या ज्येष्ठांनी केले रामनवमी नृत्य

### ६० ते ८२ वयोगटातील महिला-पुरुष सहभागी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१ एप्रिल-**

स्वानंद कला मंच पंढरपूर यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही जेष्ठ नागरिक संघ पुणे फेस कॉम (वय वर्ष ६० ते ८२) च्या महिला-पुरुष कलाकारांनी संगीत रामनवमी नृत्य सोहळा आयोजित केला होता.

स्वानंद कलामंच ज्येष्ठ नागरिक संघ पंढरपूर संलग्न पुणे फेस कॉमची स्थापना अध्यक्ष दिलीप टोमके यांनी २०१३ मध्ये केली असून पंढरपूरसह परगावी असणारे ज्येष्ठ नागरिक याचे सभासद आहेत. यंदाचे या उपक्रमाचे तेरावे वर्ष आहे. यात ६० ते ८० वर्षे वयाच्या २२ महिला व पुरुष कलाकार असून यात प्रमोद अभ्यंकर, अरुण जवळे, बी जे. कुलकर्णी, अनिल उत्पात, दत्ता जगताप, प्रसाद कुलकर्णी, प्रमोदिनी कुलकर्णी, शरयू कुलकर्णी, सुधा कुलकर्णी, शर्मिली भिडे, उमा कवडे, भारती डोंगरे, स्नेहलता वाघुले, अंजली कोटींकर, राजश्री जवळे, नमिता कवडे, मीरा टोमके यांचा समावेश आहे. संगीत कृष्णजन्म नृत्य सोहळा ही या कलाकारांनी साजरा केला आहे. यामध्ये राम व सीता यांची भूमिका प्रकाश देशपांडे व रजनी देशपांडे यांनी



साकारली. यंदा राम नमवी नृत्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यात प्राजक्ता जोशी व छोटा कलाकार विराज जोशी यांच्यासह मंदार राजूरकर यांनीही भूमिका बजावली. कार्यक्रमाचे उद्घाटन शिवसेना शिंदे गटाचे नेते महेश साठे, डॉ. मंदार सोनवणे, विनय बडवे, दिलीप कोरके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना महेश साठे म्हणाले, ६० ते ८० वर्षाच्या वयात तरुणांना लाजवेल असा उत्साह कलेच्या माध्यमातून या या ज्येष्ठ नागरिकांनी दाखवला असून तो कौतुकास्पद आहे. आजच्या काळात युवकांना श्रीराम नवमीचा इतिहास कळवा आणि एक चांगली पिढी घडावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी शामराव कुलकर्णी, रामचंद्र बडके, प्रकाश कुलकर्णी, शोभा विशवासे उपस्थित होते.



## शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत डॉ. जितेंद्र जळकुटे यांचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १ एप्रिल-**

शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय, बार्शी येथील प्रा. डॉ. जितेंद्र बलभीम जळकुटे यांना अध्यापक विद्यालय गटातून राज्य व जिल्हास्तर इंग्रजी विषयातून उत्कृष्ट शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती केल्याबद्दल बक्षीस रक्कम ८ हजार रुपये तसेच ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन कादर शेख, शिक्षणाधिकारी सोलापूर, प्राचार्य जितेंद्र साळुंखे, डायट सोलापूर तसेच अधिव्याख्याता डॉ. शशिकांत शिंदे, उपशिक्षणाधिकारी भावसार, अधिव्याख्याता राजे या मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

द्वितीय क्रमांक मिळविल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आलेला होता. त्यांच्या या यशाचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी.टी.पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे व सहसचिव ए. पी. देबडवार यांनी केले. शालेय समितीचे चेअरमन डॉ. जी. एम. पाटील, प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी केले.

## पंढरपूरचा शेवगा निघाला दुबईला

### शिवस्वराज्य शेतकरी गटातील महिलांची सातासमुद्रापार उडी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१ एप्रिल-**

महिलांनी चूल व मूल एवढे मर्यादित काम न करता रिकाम्या वेळेत संसाराला हातभार लावण्यासाठी वेगवेगळी कामे केली तर निश्चितच त्याचा मोठा आधार कुटुंबाला मिळतो. हे तालुक्यातील शिवस्वराज्य शेतकरी महिला उत्पादक गटातील महिलांनी दाखवून दिले आहे. या शेतकरी महिला उत्पादक गटातील महिलांनी शेवग्याची लागवड केली आहे. उच्च किंवा चांगल्या दर्जाचा शेवगा असल्यामुळे



सुमारे दोन टन इतकी निर्यात दुबईला करण्यात आली आहे. शेवग्यास चांगला दर मिळाला असल्यामुळे बचत गटाचे उत्पन्न देखील वाढणार आहे

गेल्या काही वर्षापासून महिलांच्या उन्नतीसाठी बचत गटाची संकल्पना पुढे आली. यातूनच पुढे शेतकरी महिला उत्पादक गटाची देखील निर्मिती झाली. शासनाने महिला बचत गट व शेतकरी महिला उत्पादक गटास प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली आहे. या गटांना बँकेकडून कर्ज पुरवठा करण्यात येत आहे. यामुळे महिला बचत गट व शेतकरी महिला उत्पादक गट वेगवेगळ्या वस्तू व वेगवेगळी उत्पादने घेत आहेत. महिलाबचत गट आणि शेतकरी महिला उत्पादक गटाच्या मालाला चांगला दर मिळत आहे.

तालुक्यातील शिवस्वराज्य शेतकरी महिला उत्पादक गटाने शेवगा लागवड केली आहे चांगला दर्जेदार शेवगा असल्यामुळे यास परदेशातही मागणी आली आहे. यामुळे सुमारे दोन टन शेवगा नुकताच दुबईला रवाना करण्यात आला आहे.

परदेशात माल विक्रीसाठी जात असल्यामुळे बचत गटास चांगला फायदा होऊन उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे यापुढे दर्जेदार उत्पादने घेऊन त्यांची निर्यात करण्यावर भर देण्यात येणार आहे.

**- कौशल्य जाधव,**
अध्यक्षा, शिवस्वराज्य शेतकरी महिला उत्पादक गट

धाराशिव
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## बसवराज पाटील यांच्याकडून मुख्यमंत्र्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ एप्रिल -**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे तुळजापूर दौऱ्यावर आले असता त्यांचे हेलिपॅडवर आगमन होताच भारतीय जनता पक्षाचे नेते तथा माजी राज्यमंत्री बसवराज पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन मुख्यमंत्री महोदयांचे स्वागत केले.



यावेळी तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, औसाचे आमदार अभिमन्यू पवार, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष संताजीराजे चालुक्य पाटील, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, विशेष पोलीस महानिरीक्षक विरेश मिश्र, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलीस अधीक्षक संजय जाधव तसेच जिल्ह्यातील महायुती घटक पक्षातील पदाधिकारी उपस्थित होते.

# सत्ताधारी भाजप सरपंचाच्या तक्रारीकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

### बावी तेरखेडा नवीन रस्ता भूसंपादन केलेल्या क्षेत्रात होत नसल्याची दिली होती तक्रार...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१ एप्रिल -**

तालुक्यातील बावी तेरखेडा रस्त्याचा बावी गावानजदीक अनेक वर्षांपासून सुरू असलेला तिढा आणि नागरिकांचा संघर्ष अखेर काही महिन्यांपूर्वी संपला. शासनाने शेतकऱ्याला जमिनीचा म ोबदला आणि जमीन भूसंपादन केली. त्यानंतर रस्त्याचे टेंडर काढले अनू काम ही सुरू झाले.

परंतु ते काम रस्त्यासाठी भूसंपादन केलेल्या जमिनीत होत नसून नदीपात्रात होत असल्याची तक्रार गावचे सरपंच संजय शिंदे यांनी महसूलमंत्री बावनकुळे व जिल्हाधिकारी यांच्याकडे दिली आहे.

कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग धाराशिव, उपविभागीय अभियंता बांधकाम विभाग वाशी, भूअभिलेख या कार्यालयाने व ठेकेदाराने यांनी संगणमत करून भूसंपादन केलेल्या जमिनीत रस्ता करण्याऐवजी तो पूर्वीच्या नदीपात्रात च केला जात असल्याची तक्रार सत्ताधारी भाजपचे सरपंच शिंदे यांनी पत्र देऊन केली आहे.

मात्र आठवडला उलटून गेला पण अद्याप सरपंच शिंदे यांनी दिलेल्या तक्रारींवर संबंधित विभागाकडून ठोस कारवाई केली जात नाही. जर सत्ताधारी भाजपच्या सरपंचाच्या तक्रारीची दखेल घेतली जात नसेल तर सामान्य जनतेच्या समस्यांचे काय? तर यासंदर्भात बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता मुंडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी भूमिअभिलेख कार्यालय यांना आम्ही पत्र पाठवले आहे.

लवकर भूमिअभिलेख कार्यालय यांच्याकडून मोजणी करून सरपंच शिंदे यांच्या तक्रारींचे निवारण केले जाईल अशी माहिती मुंडे यांनी दिली.

> आमची मागणी नाला वजा जाता पंधरा मीटर शासनाने भूसंपादन केलेल्या जागेत रस्ता केला पाहिजे अशी आहे. संबंधित अधिकारी हे तक्रारीची बेदखल करत आहेत. तसेच भूमिअभिलेख चुकीच्या पद्धतीने मोजणी करून दिशाभूल करत आहेत. माझ्याकडे रस्त्याचे सर्व पुरावे आहेत. मी सर्व पुरावे जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.
>
> **- संजय शिंदे सरपंच बावी**

## उष्णतेच्या लाटेने नागरीक हैराण; मात्र उन्हाळी घरकामासाठी गृहिणींची लगबग

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.१ एप्रिल -**

गत चार दिवसापासुन सुर्यनारायण आग ओखत असल्याने कळंब तालुक्यात उष्णतेने नागरीक हैराण झाले आहेत.उष्णतेचा पारा चाळीस अंशच्या जवळ गेल्याने तापमाणात वाढ होताना दिसतं आहे.

चैत्र महिन्याची चाहूल लागताच उष्णतेत वाढ होत आहे. लहान लेकरं वृद्ध नागरीकांनी उन्हात न जाण्याच सल्ला आरोग्य विभाग देत आहे. काम असेल तर घराबाहेर पढा अशा सुचना आरोग्य विभाग करीत आहे. सकाळी दहा वाजल्यापासूनच तापमाणात वाढ होताना दिसतं आहे. मोठे राज्यमार्ग, र,स्ते उष्णतेमुळे ओस पडलेले दिसतं आहेत. रस्त्यावरील रसवंतीगृह मात्र गर्दीने भरलेले दिसतात. उसाचा ताजा रसाचा नागरीक आस्वाद घेताना दिसतं आहेत. वाढत्या तापमानाचा शेतातील कामावर परिणाम झालेला दिसतं आहे. उष्णताच हेवडी वाढ झाली असल्याने शेतात काम करायला मजूर धजना गेलेलं आहेत. शेतातील कामे पण वाढत्या तापमाणामुळे ठप्प आहेत. सदरील तापमान वाढीचा फटका दुभत्या जनावरांना जास्त बसल्याने दुध संकलनात घट झाल्याचे दिसतं आहे. जनवरांच्या चारा पाणी खाण्यावर परिणाम झाल्याने दुध कमी निघत असल्याचे शेतकरी बोलत आहेत.

घरोघरी थंड पाण्याच्या जारची मागणी वाढली आहे. शुद्ध पिण्याच पाणी वेळेवर ग्राहकांना पोहोचं करण्यासाठी जागेवरच पाणी गाडीची सुविधा जारप्लांटवाले देत आहेत. मात्र तालुक्यातील कांही ठिकाणी पिण्याच्या पाण्याची चव नसल्याने सदरील पाण्यावर साशंकता आहे. पाणी गार करून विक्री करणे असे प्रकार घडतं आहेत. याकडे नगरीकांनी जागरूक राहणे महत्वाचे आहे.

उन्हाळा म्हणलं की अंगाची लाही लाही होत असल्यामुळे नागरिक त्रासून जातात, मात्र घरातील उन्हाळी कामे करण्यासाठी गृहिणींना हे दिवस फायद्याचे ठरतायत.

वर्धाभरातील सण समारंभसाठी जेवणातील प्रमुख कुरवड्या -पापड्या करण्यासाठी महिला मात्र सरसवल्या आहेत. ज्वारीच्या पापड्या, गव्हाच्या चिकपासूनच्या कुरवड्या, बाजरीच्या खारवड्या, याबरोबरच उपवासच्या भगरीच्या पापड्या, शाबूच्या पापड्या, रताळ्याच्या पापड्या हे सर्व करण्यासाठी महिला शेजारील एकमेकींची मदत घेऊन अनेक घरच्या छतावर काम करताना दिसतं आहेत.

सद्यस्थितीत उन्हाळा खुप जाचक चालला असला तरी गृहणीसाठी खुशीचा मात्र अनेकांना निराशेचा हे विशेष..!

## राठोड दांपत्यानी उभारली पुस्तकांची गुडी

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१ एप्रिल -**

आजच्या धावपळीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात वाचन संस्कृती जतन करणे. ही काळाची गरज आहे. कारण वाचनाने ज्ञानवृद्धी होते. विचारसरणी विकसित होते आणि समाजाला प्रगतीकडे घेऊन जाण्यास मदत होते.

वाचनाने माणूस ज्ञानी होतो आणि त्याला पुस्तकाच्या रूपाने एक नवीन मित्र मिळतो. वाचन ही एक कला आहे. वाचन माणसाला माणूस बनविते. जीवनाला एक नवी दिशा देते. विचार करायला शिकविते.

अंतर्मुख करविते.त्याचप्रम ाणे जीवनात योग्य- अयोग्य काय याची जाणीव करून देते. आपल्या समाजात 'वाचाल तर वाचाल' अशी म्हण प्रचलित आहे.

गुढीपाडव्याचे अवचित साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जळकोटवाडी (नळ) येथे कार्यरत असणारे तुळजापूर तालुका आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त तथा तुळजापूर तालुका शिक्षक सोसायटीचे व्हा. चेअरमन अशोक राठोड व आयएसओ मानांकित जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मानमोडी (ता. तुळजापूर) शाळेच्या उपक्रमशील व आदर्श शिक्षिका सुचिता राठोड चव्हाण यांनी आधुनिक काळात गेल्या तीन वर्षांपासून समाजासमोर



पुस्तकाची गुढी उभारून वाचनाचा आदर्श ठेवत आहेत.

या जोडप्यांनी आपल्या राहत्या घरात एक ग्रंथालय तयार करून वाचनाचे महत्त्व समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत.

## कडक उन्हाळ्यात तहसीलात नागरिक तहानेने व्याकुल

### महसूल कार्यालयात नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची असुविधा... सामान्य नागरिकांची पाण्यासाठी भटकंती...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१ एप्रिल -**

तहसील कार्यालय मध्ये पिण्याच्या पाण्याची कसलीही व्यवस्था नसून कार्यालयामध्ये दर्शनी भागात फलक बोधचिन्ह अस्तित्वात नसलेल्या बाबतची तक्रार येथील समाजसेवक जयकुमार पांढरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन केली आहे

निवेदनात असे म्हटले आहे की, तालुक्याचे तहसील कार्यालय असून तहसील कार्यालयात दररोज विविध म हत्वाच्या कामासाठी येणारे हजार नागरिक येत असतात व तिथे नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कसली सोय नाही व पुढील तपशील असलेले बोर्ड दर्शनी भागात दिसून येत नाही असे बोर्ड जनतेच्या माहितीसाठी लावणे बंधनकारक आहे. बोर्ड नं.१ ट्राराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम कुठले कोर्स किती दिवसात होणार सूचनाफलक बोर्ड नंबर २ माहिती अधिकारी व प्रथम आपली अधिकारी यांचे संपूर्ण नाव पदनाम पत्ता व संपर्क क्रमांक बोर्ड नंबर ३ लाच लचपत प्रतिबंधक अधिकारी यांचे संपूर्ण नाव बदनाम व पत्ता संपर्क क्रमांक बोर्ड नंबर ४ सूचना का अधिकार बोधचिन्ह लोगो आपल्या कार्यालयात जिथे कार्यालयीन टपाल स्वीकारले जाते तिथे ठळकपणे दर्शनी भागास लावण्यात यावे महत्वाची बाब म्हणजे शासकीय निर्णय क्रमांक संकीर्ण ८२२१/प्र.क्रं./४५९/सां.का. ४ दि.२७ जुलै २०२३ नुसार छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिवराज्याभिषेक निमित्त शासकीय पत्रव्यवहारावर बोधचिन्ह लोगो



वापर करण्यात यावा व दर्शनी भागात सदर बोधचिन्ह चित्रित करण्यात यावे असा आदेश आहे.

कार्यालयीन कामकाजाचे वेळापत्रकाचे फलक दिसून येत नसून कार्यालयातील पिण्याचे पाण्याची व फलकाचे काम ताबडतोब करून घ्यावे जबाबदार अधिकारी म्हणून तहसीलदार बोळंगे यांनी याच्याकडे दुर्लक्ष केले आहे.

८ ते १५ दिवसात हे सर्व कामे करण्याचे आदेश देण्यात यावे हे सर्व कामे ८ ते१५ दिवसात नाही झाल्यास आम्ही लोक वर्गणी गोळा करून सर्व कामे करून देऊ याच्यासाठी जिल्हाधिकारी यांनी आम्हाला परवानगी द्यावी,अशी मागणी सदरील निवेदनात केली आहे.

## तुळजापूर तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा बेशिस्तपणा चव्हाट्यावर

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१ एप्रिल -**

तहसील कार्यालयातील कर्मचारी महाराष्ट्र शासनाच्या कुठल्याही नियमाप्रमाणे गळ्यामध्ये ओळखपत्र व टेबलवर नावाचा फलक वापरत नसल्याचा जाब विचारत तहसीलदार यांना जयकुम ार पांढरे यांनी निवेदन दिले आहे .

सदरील निवेदनात असे म्हटले आहे की, तुळजापूर तहसील कार्यालयामध्ये ग्रामीण भागातील शेतकरी व नागरीक कामानिमित्त येत असतात.

त्या शेतकऱ्यांना व नागरीकांना अधिकारी कोण आहेत हे ओळखण्यास अडचणी निर्माण होत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या निमयमाप्रमाणे अधिकाऱ्यांनी आपल्या टेबलवर नावाचे फलक लावणे व गळ्यामध्ये ओळखपत्र वापरणे बंधनकारक असताना कुठलेही अधिकारी, कर्मचारी गळ्यामध्ये ओळखपत्र घालत नाहीत. तसेच टेबलवर फलक लावत नाही.

आठ दिवसाच्या आत नावाचा फलक लावणे व ओळखपत्र गळ्यामध्ये वापरण्याची अधिकारी कर्मचाऱ्यांना बंधनकारक करण्यात यावे अन्यथा आठ दिवसा नंतर सर्व अधिकारी ओळखपत्र न घातल्यामुळे व टेबलवर नावाचा फलक न लावल्यामुळे फुलगुच्छ देऊन सत्कार करण्यात येईल, असा इशारा सदरील निवेदनातून करण्यात आला आहे.

## कुस्तीपटूचा शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले यांच्याकडून सत्कार

### चांदीचे कडे भेट देण्याचा संकल्प केला पुर्ण

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१ एप्रिल -**

उमरगा तालुक्यातील कसगी येथील पै.मुंतजीर सरनौबत या युवकाने यंदा धाराशिव, अहिल्यानगर व कर्जत जामखेड तिन्ही ठिकाणी झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत ८६ किलो वजनी गटातुन विजय संपादन करीत सुवर्णपदक मिळवले आहे.

यापुर्वी हरियाणा येथे झालेल्या कुस्ती स्पर्धेत युवा गटातुनही त्याने विजय मिळवला होता. त्यावेळी त्यांचा सत्कार करण्यासाठी उपस्थित असलेले उमरगा लोहारा तालुक्याचे माजी आमदार तथा शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले यांनी या पैलवानाला पुढील स्पर्धा जिंकल्यानंतर आपल्याकडुन चांदीचे कडे भेट देण्याचे जाहीर केले होते.

या अनुषंगाने मंगळवार दि.१ एप्रील रोजी



मा.आमदार ज्ञानराज चौगुले यांनी कसगी गावामध्ये जाऊन पै.मुंतजीर सरनौबत यांचा यथोचीत सत्कार करून त्यांना चांदीचे कडे भेट दिले.

यावेळी कसगी ग्रामस्थांच्या वतीनेही या कुस्तीपटुचा सत्कार करण्यात आला. आपल्या भागातील खेळाडुंनी राज्य पातळीवर विजय मिळवणे ही नक्कीच अभिमानाची गोष्ट आहे.

अशा खेळाडुंना प्रोत्साहन देणे हे आपले कर्तव्य असल्याचे मत यावेळी बोलताना मा.आ.चौगुले यांनी व्यक्त केले. युवा सेना विभागीय निरीक्षक किरण गायकवाड यांनीही यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख बळीराम सुरवसे, विधानसभा अध्यक्ष शरद पवार, सरपंच हणमंत गुरव, व्यंकट पाटील, शिवा म्हात्रे, दिलीप बदोले, गोविंद महाराज, शारदाबाई आलगुडे, दत्ता भोसले, संजय नंदर्गे, संदीप चौगुले, बलवीर राजपुत, नबीसाब मुल्ला, जमीर मुल्ला आदी ग्रामस्थ व कुस्तीप्रेमी नागरिक यावेळी उपस्थित होते.

## धार्मिक स्थळांना विशेष संरक्षण द्या

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ एप्रिल -**

महाराष्ट्रामध्ये धार्मिक स्थळांवर होणार्या हल्ल्यांच्या घटनामध्ये वाढ होत आहे. बीड जिल्ह्यातील अर्धमसला गावात मशिदीमध्ये जिलेटीनचा स्फोट घडवून आणल्याच्या घटनेचा निषेध करत महाराष्ट्रातील धार्मिक स्थळांना विशेष संरक्षण द्यावे अशी मागणी मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत मंगळवारी (दि.१) मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले.

निवेदनात म्हटले की, गेल्या अनेक महिन्यापासून महाराष्ट्रामध्ये अल्पसंख्यांक मुस्लिम समाजाला लक्ष्य करुन तसेच समाजाप्रति द्वेषाचे वक्तव्य करुन समाजात विष कालवण्याचा प्रयत्न सुरु आहे. महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांचा सुद्धा यामध्ये सहभाग आहे. ही बाब निंदणीय असून त्याचा मुस्लिम समाज निषेध करत आहे.

निवेदनावर मसूद शेख, अ‍ॅड. परवेज काझी, कादरखान पठाण, वाजीद पठाण, आयाज शेख, एजाज काझी, अ‍ॅड. फेरोज शेख, तौफिक पठाण, अन्वर शेख, खलील पठाण, इरशादअली सय्यद, अफरोज पीरजादे, इस्माईल काझी, बाबा मुजावर, रउल्ला शेख, इम्रान खान, अ‍ॅड. जावेद काझी, साबेर सय्यद, अतिक शेख, तौफिक शेख, अल्ताफ शेख, हसीब काझी, बिलाल तांबोळी, महेमूद मुजावर, खलील शेख, इब्राहीम शेख, इस्माईल शेख व इतर समाजबांधवांची स्वाक्षरी आहे.

## रस्ता व गटार बांधण्याचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१ एप्रिल -**

नळदुर्ग शहरातील शास्त्री चौक ते चावडी चौक व चावडी चौक ते बोरीघाट या दोन महत्वाच्या रस्त्यांचे व गटार बांधण्याचे काम पावसाळ्यापुर्वी तातडीने करावे अशी मागणी नागरीकांनी केली असुन याबाबत आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी नगरपालिका प्रशासनाला आदेश द्यावेत अशी मागणी होत आहे.

सध्या नळदुर्ग शहरात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातुन विविध भागात सिमेंट रस्ते बांधण्याचे व गटार बांधण्याचे काम सुरु आहे. मात्र यातील एकही काम शहरातील जुन्या भागात सुरु नाही.

वास्तविक पाहता जे रस्ते वाहतुकीसाठी महत्वाचे आहेत किंवा जे रस्ते मिरवणुक मार्ग म्हणुन ओळखले जातात त्या रस्त्यांचे काम अगोदर होणे गरजेचे होते मात्र दुर्दैवाने तसे झाले नाही.

नळदुर्ग शहरात ग्रीन पार्क, जगताप नगर, रहीम नगर, मुळे प्लॉटिंग यासह विविध भागात सध्या सिमेंट रस्ते व गटार बांधणीचे काम सुरु आहे.

या रस्ते तसेच गटार बांधणीमुळे शहराच्या सुंदरतेत भर पडणार आहे. तसेच नागरीकांसाठीही हे सोईचे होणार आहे.

नगरपालिकेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार हे स्वता या कामावर जातीने लक्ष देऊन होत असलेली सर्वच कामे चांगल्या दर्जाचे व दीर्घाकाळ टिकणारे करून घेत आहेत.

शहरातील शास्त्री चौक ते चावडी चौक व चावडी चौक ते बोरी घाट हे दोन्ही रस्ते अतीशय महत्वाचे म्हणुन ओळखले जातात. मात्र सध्या या दोन्ही रस्त्याची मोठी दुरावस्था झसली आहे. या दोन्ही रस्त्यावर सध्या मोठ मोठे खड्डे पडले आहेत त्यामुळे या रस्त्यावरून जाताना वाहन चालक तसेच पायी चालत जाणाऱ्या नागरीकांना अक्षरशा तारेवरची कसरत करावे लागत आहे.

त्याचबरोबर हे दोन्ही रस्ते मिरवणुक मार्ग म्हणुनही ओळखले जातात. याच रस्त्यावरून सर्व धर्मियांच्या मिरवणुका काढल्या जातात त्यामुळे या रस्त्यांची कामे होणे गरजेचे आहे.

चावडी चौक ते बोरीघाट या रस्त्याची तर सध्या मोठी दुरावस्था झाली आहे. हा रस्ता पुर्णपणे उखडला असुन याठिकाणी असणाऱ्या गटारीतुन सांडपाणीही वाहुन जात नाही. त्यामुळे या रस्त्याचे काम तात्काळ होणे गरजेचे आहे.

पावसाळ्यापुर्वी या दोन्ही रस्त्यांची कामे व्हावेत यासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नगरपालिका प्रशासनाला आदेश द्यावेत अशी मागणी नागरीकांनी केली आहे.

## कृषी महाविद्यालयातील सात विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्यूमध्ये निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ एप्रिल -**

व्ही.पी. एज्युकेशनल कॅम्पस मधील कृषी म हाविद्यालयात दिनांक २१ मार्च रोजी झायडेक्स बायोफर्टीलायझर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचा कॅम्पस इंटरव्यू कार्यक्रम पार पडला. सदर निवड प्रक्रियेमध्ये महाविद्यालयाच्या अंतिम सत्रातील एकूण ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्यांमधून अंतिम सात विद्यार्थ्यांची निवड कंपनीच्या निवड समितीने केली.



झायडेक्स बायोफर्टीलायझर प्रायव्हेट लिमिटेड ही जैविक कृषी निवेष्ठा उत्पादने आधारित अग्रगण्य कंपनी असून जैविक खत निर्मिती मध्ये मोलाची कामगिरी बजावत आहे. सध्याच्या बेरोजगारीच्या काळामध्ये महाविद्यालयाच्या अथक पाठपुराव्यातून झायडेक्स बायो फर्टीलायझर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला महाविद्यालयात कॅम्पस इंटरव्ह्यू साठी आमंत्रित करण्यात आले होते. कंपनीच्या कॅम्पस इंटरव्यू मध्ये राऊत रवींद्र, बाराते सुनील, इंगळे यशोदीप, गव्हाणे चंद्रकांत, जाधव अजय, देशमुख पार्थ, देशमुख अभिषेक या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली सदरील निवड झालेले विद्यार्थी हे महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांच्या कंपनीच्या कार्यक्षेत्रात कंपनीचे कृषी क्षेत्र संलग्न काम पाहणार आहेत. विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी एक सक्षम रोजगार मिळवून देण्याचा उत्तम प्रयत्न महाविद्यालयाने सदरील उपक्रमातून दर्शविला आहे.

कॅम्पस इंटरव्ह्यू मधून निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कॅम्पस प्लेसमेंट यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतिसिंह पाटील, महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्राध्यापक हरी घाडगे, प्लेसमेंट सेल प्रमुख डॉ. शेख मोहसीन, डॉ. गांधले अमित, डॉ. इंगळे रोहित, डॉ. खोसे प्रताप, प्रा. सुमिथा पाटील, प्रा. दळवे सतेश, प्रा. डोके आकाश, प्रा. माळी प्रवीण, प्रा. शेटे देवानंद, प्रा. भालेकर सुनील, प्रा. शिंदे अक्षय, प्रा. मुंडे नवनाथ, प्रा. गोटे प्रिया, प्रा. नागरगोजे विजय, सुतार रामचंद्र, मुजावर गुलाब, गिरी ओंकार यांनी म ोलाची भूमिका बजावली.

लातूर
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## उपसभापती प्रा.डॉ. नीलम गोऱ्हे यांचा उद्या दौरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ एप्रिल -**

महाराष्ट्र विधानपरिषद उपसभापती प्रा.डॉ.नीलम गोऱ्हे ह्या ३ एप्रिल रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.सोलापूर येथून मोटारीने सकाळी ७.४५ वाजता तुळजापूर येथे आगमन व आई तुळजाभवानी देवीजींचे दर्शन घेतील. सकाळी ८.३० वाजता तुळजापूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन. सकाळी ९ वाजता तुळजापूर देवस्थानाबाबत शासकीय विश्रामगृह येथे बैठक घेतील.

सकाळी १०.३० वाजता धाराशिवकडे प्रयाण करतील. सकाळी ११ वाजता धाराशिव शासकीय विश्रामगृह येथे आगमन.

सकाळी ११.३० वाजता शिवसेना पदाधिकारी यांचे समवेत बैठक घेतील. दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सभागृह येथे भूकंपग्रस्त भागात सामाजिक वनीकरण, उन्हाळ्यात जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याचे नियोजन, जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था आणि अमली पदार्थविरोधी कार्यक्रमाचा तसेच ऊसतोड महिला कामगार योजनेबाबतचा आढावा घेणार आहे.

सायंकाळी ५.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात पत्रकार परिषद घेतील व सायंकाळी ६.३० वाजता शासकीय वाहनाने लातूरकडे प्रयाण करतील.



# औसा मतदारसंघात अंगणवाडी सेविका व मदतनीसांना नियुक्तीपत्राचे वाटप

### आ. अभिमन्यू पवारांच्या हस्ते ५८ नियुक्तीपत्र वाटप...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१ एप्रिल -**



मुख्यमंत्री शंभर दिवशी कती कार्यक्रम अंतर्गत औसा मतदारसंघात अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची भरती प्रक्रिया ३१ मार्च २०२५ अखेर पर्यन्त पूर्ण करण्याबाबत आदेशीत करण्यात आले होते. औसा मतदारसंघात भरती झालेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीसांना आ. अभिमन्यू पवार यांच्या हस्ते १३ सेविका व ४५ मदतनीस अशा ५८ कर्मचाऱ्याना नियुक्तीपत्र देण्यात आले.

औसा येथील पं.स.त नियुक्तीपत्र वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. गटविकास अधिकारी युवराज म्हेत्रे, शोभा पवार, संतोष मुक्ता, सुभाष जाधव, भिमाशंकर राचट्टे, सुनील उटगे, शिवकुमार मुर्गे, बालविकास प्रकल्प अधिकारी बालाजी कोरे, जिजाबाई डेंगळे, कांबळे, विश्वास कुंभकर्ण आदींसह विस्तार अधिकारी व अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होते. औसा प्रकल्प सेविका ४, मदतनीस १७, किल्लारी प्रकल्प सेविका १, मदतनीस १६, निलंगा प्रकल्प सेविका ८ मदतनीस १२ असे औसा मतदारसंघांतील १३ सेविका व ४५ मदतनीस असे एकूण ५८ जणांना आ. पवार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र वाटप करण्यात आले.

**सुसंस्कृत पिढी घडविण्याची संधी : गटविकास अधिकारी म्हेत्रे**

नवनियुक्त अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना शुभेच्छा देऊन समाजातील सर्वात मोठी जबाबदारी व महत्वपुर्ण कार्य यापुढे आपणास करायचे असून २१ व्या शतकातील सर्व आव्हानं पेलण्याची क्षमता असलेली नवी पिढी निर्माण करुन देशाच्या मजबुतीकरणाला मदत करावी. असे आवाहन करुन या माध्यमातून नवीन सुसंस्कृत पिढी घडविण्याची संधी मिळत असल्याने मत गटविकास अधिकारी युवराज म्हेत्रे यांनी यावेळी व्यक्त केले.

**संस्कार घडविण्याचे केंद्र अंगणवाडी : आ. पवार**

चिखलाच्या गोळ्याला आकार देण्याचे काम अंगणवाडीच्या माध्यमातून होते. त्यामुळे अंगणवाडी हे लहान मुलावर संस्कार घडविण्याचे केंद्र आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी कोव्हीडच्या काळात केलेले काम उल्लेखनीय असून एक चांगली पिढी घडविण्यासोबत लहान मुलांना देशाबद्दल प्रेम व जेष्ठा बद्दल स्नेहाची भावना निर्माण होण्यासाठी लहान मुलांवर अंगणवाडी च्या माध्यमातून संस्कार घडविण्याचे काम करावे असे आवाहन आमदार अभिमन्यू पवार यांनी केले.

# श्री ग्रामदैवत महादेव मंदिर यात्रानिमित्त विविध कार्यक्रम



- ९ एप्रिल रोजी जिल्हास्तरीय भव्य पशुपक्षी प्रदर्शन...
- १० एप्रिल रोजी शिवपार्वती विवाह सोहळा...

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.१ एप्रिल -**

शहरातील श्री ग्रामदैवत महादेव मंदिर यात्रा महोत्सव निमित्त दि.३० मार्च ते ११ एप्रिल पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये दि.३० मार्च ते ११ मार्च एप्रिल पर्यंत दररोज सकाळी ९ ते १२ संगीत महारुद्राभषेक तर रात्री ९ ते ११ शिवभजन मंगळवारी दि.८ एप्रिल रोजी रात्री ९ ते १२ दयानंद महाराज नागपल्ले देवर्जनकर यांचे शिवकर्तन होणार आहे. बुधवारी दि.९ एप्रिल रोजी जिल्हास्तरीय भव्य पशुपक्षी प्रदर्शन होणार आहे. यामध्ये सकाळी ८ वाजता नोंदणी तर तर दुपारी १ वाजता निवडी होणार आहेत. बुधवारी सायंकाळी ७ वाजता शिवपार्वती हळदी सोहळा संपन्न होणार आहे. यानंतर गुरुवारी दि.१० एप्रिल रोजी दुपारी १ वाजता शिवपार्वती विवाह सोहळा संपन्न होणार आहे. तर शुक्रवार दि.११ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता भव्य भव्य जंगी कुस्तीचे आयोजन करण्यात आले. आहे यामध्ये प्रथम येणाऱ्या ११ हजार, द्वितीय ७ हजार, तृतीय ५ हजार असे आयोजन करण्यात आले आहे. तर शेवटची कुस्तीच जिंकणाऱ्या पैलवानास दिनेश तपसाळे यांच्याकडून तीन फुटी चांदीचे गदा बक्षीस देण्यात येणार आहे.

तरी देवणी पंचक्रोशीतील सर्व सदभक्तांनी या सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त समिती व यात्रा महोत्सव समिती श्री ग्रामदैवत महादेव मंदिर आणि ग्रामस्थांनी यांनी केले आहेत.

# गुडी पाडव्यानिमित्त दिड लाख भाविकांनी घेतले उदगिरी बाबाचे दर्शन





**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१ एप्रिल -**

उदगीरचे आराध्या दैवत उदागिरी बाबा महाराज समाधी उदागिरी किल्लात गुडीपाडवा व नववर्षानिमित्त उदगीर शहर व परिसरातील दिड लाख भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

उदगीरच्या ऐतिहासिक किल्लयात असलेले उदगीरचे आराध्य दैवत उदागिरी बाबा महाराज यांची सजीवन समाधी स्थळी उदागिरी बाबा महाराज उत्सव हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, किर्तन तसेच दररोज महारुद्रअभिषेक आदि विविध धार्मिक कार्यक्रमाने प्रारंभ झाला. हरिनाम सप्ताह व ग्रंथाराज ज्ञानेश्वरी पारायणाची सांगता झाली. बाबा महाराज मठ संस्थानचे मठाधिश जयशगिर गुरु सतिशगिर महाराज यांच्या हस्ते महारुद्र अभिषेक संपन्न होवून नववर्ष गुडीपाडव्यानिमित्त दर्शनास प्रारंभ झाला. रात्री १२ वाजता सुरु झालेली दर्शनाची रांग रात्री १२ वाजता समाप्त झाली.

उदयगिरी बाबा महोत्सवानिमित्त २९ मार्च रोजी राधाई ब्लड बँक तर गुडीपाडव्यानिमित्य कै. नागप्पा अंबरखाने ब्लड बँकेच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते रक्तदान शिबिराचे उद्धाटन किरण महाराज राम मोतीपवळे यांच्या हस्ते सद्गुरु उदागिर बाबाच्या प्रतिमेचे पुजन करुन झाले. यावेळी खरेदी विक्री संघाचे चेअरमन भरत चामले, सरपंच उदसिंह मुंडकर, डॉ. विजय चिखले आदी उपस्थित होते. रक्तदान शिबीरात एकुण ४१ रक्तदात्यांनी रक्तदानाच्या राष्ट्रीय कार्यक्रमात सहभाग नोंदविला.

उदागिरी बाबा उत्सवानिमित्त सकाळी १० वाजल्या पासुन ६ वाजेपर्यंत विविध भजनी मंडळाचे भजन संपन्न झाले. यात गोपाळ जोशी, प्रा. जामखंडे, उध्दव महाराज हैबतपुरे, यांच्या व इतर भजनी मंडळांनी भजन गायन करुन सेवा केली.

उदागिरी बाबाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी शेटकार गल्ली येथे गणेश मंडळाच्या वतीने अल्पोहाराची व्यवस्था करण्यात आली. मलकापुरचे ग्रा.प. महेश तोडकर, यावेळी सदस्य अजय शेटकार, तम्मा शेटकार, उपस्थित होते. तर नकाशे परिवाराच्या वतीने व किल्ला गल्ली युवक मंडळाच्या वतीने जलपानाची व्यवस्था केली होती. उदागिरी बाबाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मुख्य कमानीपर्यंत रांगा लावण्यात आल्या होत्या.

उदागिर बाबा महोत्सव पार पाडण्यासाठी जयशगिर गुरु सतिष गिरी महाराज, तेजस महाराज, किरण महाराज, नागेश महाराज, संतोष रावणकोळे, अर्जुन जाधव, संजय हलकुडे, विशाल तानंशेट्टे, रामकिशन नागरगोजे, माधव बेलूरे, सचिन महाराज, दत्ता गिरी, अतुल गिरी, अमित गिरी, सचिन भारती, अमोल घवळे, माधवी भोसले, राठोड, संदीप उपरवावडे, आलोक नृत्य सचिन कारामुंगे, अमोल लोहकरे, प्रज्वल हायवतपुरे, बालाजी पवार, सचिन जाधव, कडप्पा आठाने, बालाजी बिरादार आदींनी परिश्रम घेतले.

# उस्तुरी टॅलेंट सर्च परीक्षेतील विद्यार्थ्यांना तहसीलदारांच्या हस्ते बक्षीस वाटप



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१ एप्रिल -**

तालुक्यातील उस्तुरी येथे श्री. नागनाथेश्वर यात्रेनिमित्त नागनाथेश्वर टॅलेंट सर्च परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या टॅलेंट सर्च परीक्षेत ६७५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. विविध गटात प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांच्या हस्ते बक्षीस वाटप करण्यात आले.

यावेळी पुरवठाचे विभागाचे नायब तहसीलदार अमोल पाटील, नायब तहसीलदार प्रवीण आळंदकर, महसुल अधिकारी बस्वराज बिराजदार, सरपंच मल्लिकार्जुन दानाई, यात्रा कमिटी अध्यक्ष संतोष शेट्टे आदी उपस्थित होते.

चौथी ते पाचवी गटात प्रथम कैवल्य शैलेश नकाते जि.प.प्रा. शाळा-उस्तुरी, व्दितीय अमित संजय कांबळे-मारियाज पोद्दार लर्न स्कुल-निलंगा, तृतीय नमन सचिन डोईजोडे-वसंतराव पाटील विद्यानिकेतन-औराद शहाजनी, सहावी ते सातवी गटात प्रथम सोमवंशी गायत्री गोविंद-महाराष्ट्र विद्यालय निलंगा, व्दितीय हरीओम दत्ता बनसोडे-लालबहादुर शास्त्री विद्यालय हासोरी, तृतीय राजवीर किशोर जाधव-महाराष्ट्र विद्यालय निलंगा, आठवी ते नववी गटात प्रथम सोमवंशी अस्मिता गोविंद-महाराष्ट्र विद्यालय-निलंगा, व्दितीय सानवी शाहुराज बरमदे-महर्षी दयानंद विद्यालय भुतमुगळी, तृतीय अग्निवेश लक्ष्मण थेटे-वसंतराव पाटील विद्यानिकेतन-औराद शहाजनी या विद्यार्थ्यांना ट्राफी व बक्षीस देऊन सत्कार करण्यात आले.

या बक्षीस वाटप कार्यक्रमास ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. या टॅलेंट सर्च परीक्षा यशस्वी करण्यासाठी गावातील शिक्षक, प्राध्यापक व तरुणांनी परिश्रम घेतले.

उस्तुरीत श्री. नागनाथेश्वर यात्रेनिमित्त दररोज विविध धार्मिक कार्यक्रम होत आहेत.

# शिरूर अनंतपाळ तालुक्यात रमजान ईद उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१ एप्रिल -**

या अल्लाह सारे मुल्कमे अमन और सूकुन अता फरमाभारत देश को अखंड रखते हुए भाईचारा बनाए रखना अशी अल्लाहकडे प्रार्थना करुन मुस्लिम समाजात पवित्र समजल्या जाणाऱ्या रमज़ान मधील महिन्याभराच्या रोजा नंतर शिरूर अनंतपाळ शहरासह तालुक्यात सोमवारी ईद-ऊल-फित्रची नमाज अदा करुन रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

शिरूर अनंतपाळ शहरासह तालुक्यातील गावांमध्ये ईद उल फित्रची नमाज अदा करण्यात आली. व रमजान ईद निमित्त अल्लाह कडे सर्वसमावेशक दुवा मागण्यात आली. ईद उल फित्र च्या नमाजनंतर सर्व समाजातील सर्व जाती धर्माच्या लोकांनी मुस्लिम समाजातील बांधवांना शुभेच्छा दिल्या. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, उद्योग क्षेत्रातील मान्यवरांनी ईदगाह मैदानावर जावून मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर मुस्लिम समाजातील बांधवांनी मित्रपरिवार यांच्यासोबत शिरखुर्मा व विविध प्रकारच्या पक्वानांचा यावेळी आस्वाद घेतला.

# गणेशनाथांच्या पालखी रथाचे भक्तांच्या महापुरात पंढरपुरला प्रस्थान

### ज्ञानोबा तुकाराम, टाळ मृदंगाच्या गजरात अवघी दुमदुमली नगरी अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आमदार पवारांची उपस्थिती...





**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१ एप्रिल -**

चैत्र एकदशीनिमित्त पंढरपुर येथील पांडुरंगाच्या दर्शनासाठी तालुक्यातील उजनी येथील संत गणेशनाथ महाराज यांच्या पालखी रथाचे धाराशिव तालुक्यातील भंडारी येथील पहिल्या मुक्कामासाठी सोमवार दि.३१ मार्च रोजी सायंकाळी ७ वा. सुमारास प्रस्थान झाले. लाडक्या संताला पाठविण्यासाठी उजनी व पंचक्रोशीतील हजारो भक्तगणांसह आ. अभिमन्यू पवार यांनी दर्शन घेत ज्ञानोबा तुकाराम चा गजर करीत चौरस्त्यापर्यंत दिंडीत सहभाग घेतला होता.

यावर्षी ७५ व्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त पालखी सोहळा व रथ यात्रेचे विशेष आयोजन करण्यात आले. मंदीराच्या मुख्य प्रवेशद्वारातून भक्तांनी पालखी खांद्यावर घेऊन विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी, विठ्ठल तोंडी उच्चारा चा मुखी गजर करीत टाळ मृदंगाच्या साथीत रथामध्ये पालखी ठेवण्यात आली. यानंतर नगराप्रदिक्षणा सुरु झाली.

पालखी व रथाच्या नगरप्रदिक्षणे दरम्यान गावातील महिला भाविकांनी सायंकाळच्या सुमारास दारात सडा टाकून रंगीबेरंगी रांगोळी काढून फुलांच्या पाखळ्यांनी दारासह अख्खे रस्ते सजविले होते. सायंकाळी नगर प्रदिक्षिणेच्या सुमारास रस्त्यावरील रंगीबेरंगी रांगोळी आणि फुलांच्या पाखळ्यांनी सजवलेले रस्ते डोळ्याचे पारणे दिपुन टाकत होते. या अमृतमहोत्सवी पालखी रथ यात्रेत सहभागी झालेल्या भाविक भक्तांना महेश्वरी समाजबांधवांनी मठ्ठा चे आयोजन करण्यात आले.

**नाथांच्या दिंडीत सहभागी होणारच : आ. अभिमन्यू पवार**

चैत्र एकादशीनिमित्त नाथांचा पालखी रथ यात्रा सोहळ्यात सहभागी झालेल्या हजारो महिला व पुरुष भक्तांच्या सहभागाने डोळे दिपुन गेले. या पालखी रथ यात्रेत सहभागी झालेल्या भक्तांना निरोप देण्यासाठी आलेले आ. अभिमन्यू पवार यांनी यावेळी या दिंडीत सहभागी होणारच असा संकल्प यावेळी केला.


याचा हजारो भाविकांनी स्वाद घेतला. सलग पंधरा दिवशीय रथ यात्रा व पालखी सोहळ्यात उजनीसह भंडारी, एकंबी, काजळेचिंचोली, आशिव, धुता व परिसरातील भाविकांनी सहभाग घेतला आहे.

यामध्ये यावर्षी महिलांसहा पुरुष भक्तांचा लक्षणीय सहभाग वाढला आहे. टाळ मृदंगाच्या साथीला ज्ञानोबा तुकाराम चा गजर करीत पालखी व रथ यात्रा नगरप्रदिक्षिणा करीत उजनी चौरस्त्यावर पोहंचली. लाडक्या संताला निरोप व दिंडीत सहभागी झालेल्या भक्तांच्या महापुराने राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुक रथयात्रा मार्गस्थ होईपर्यंत दुतर्फा थांबली होती. पहिल्या मुक्कामाच्या प्रस्थानानंतर हळूहळू वाहतुक सुरळीत झाली.

सरपंच युवराज गायकवाड, भाजपाचे जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष नारायण लोखंडे, बाजार समितीचे माजी सभापती योगीराज पाटील, संचालक प्रवीण कोपरकर, चेअरमन गौतम दरेकर, व्हा. चेअरमन सागर तापडे, माजी व्हा. चेअरमन भागवत जाजू, शिवसेनेचे श्रीरंग वळके, औसा खरेदी

विक्री संघाचे उपाध्यक्ष शेखर चव्हाण, भाजपाचे गिरीराज सोमाणी, माजी व्हा. चेअरमन सिध्देश्वर गंगणे, बाळासाहेब मुळे आदी उपस्थित होते.

# शास्त्री विद्यालयात दहावीत प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१ एप्रिल -**

पुढील शैक्षणिक वर्ष वर्षातील दहावीत प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पालक मेळावा दि.२८ रोजी लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात संपन्न झाला.

व्यासपीठावर प्रमुख उपस्थितीत पालक मेळाव्याचे अध्यक्ष व्यंकटराव गुरमे, स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासूणे, मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे उपमुख्याध्यापक अरूण पत्की पालक प्रतिनिधी सयाजी दराडे, अजय कुलकर्णी दहावी प्रमुख संतोष गजलवार, प्रशांत राजूरकर, अंजली नळगीरकर यांची उपस्थिती होती.

मूल्यमापन प्रमुख बालाजी पडलवार यांनी एकूण परीक्षा व अतिरिक्त गुण कशा प्रकारे मिळतात यावर चर्चा केली. तर शिक्षक मनोगतामध्ये प्रीती शेंडे यांनी विद्यार्थ्यांनी आरोग्याकडे लक्ष द्यावे आहार समतोल व सकस असावा तसेच क्रीडा, कला, संगीत यातून मिळणाऱ्या वाढीव गुणांबाबत चर्चा केली. पालक प्रतिनिधी सयाजी दराडे यांनी मुलांकडे पालकांनी लक्ष द्यावे व पाल्याच्या आहार, आरोग्य, मित्रसंगत याकडे लक्ष द्यावे.

पालक प्रतिनिधी अजय कुलकर्णी यांनी लाल बहादुर शास्त्री विद्यालयात गुणवत्तेबरोबर संस्कार दिले जातात. शाळा हे विद्यार्थ्यांच्या जडणघडणीचे महत्वाचे साधन असते. ताणतणाव कमी करण्यासाठी प्राणायाम व योगा अत्यंत महत्त्वाचे आहे त्याचे आयोजन विद्यालयात करावे, अशी सूचना केली.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास करावा, अभ्यासाचे नियोजन कसे करावे यासंदर्भात माहिती दिली. शिक्षणाबरोबरंच राष्ट्रप्रेम, संस्कार देणारी आमची शाळा विद्यार्थ्यांना घडवण्याचे कार्य करते.

अध्यक्षीय समारोपात व्यंकटराव गुरमे यांनी मुलांमध्ये शिस्त असली पाहिजे व पालकांनी मुलांचे अतिरिक्त लाड करू नये, पालकांनी आपल्या पाल्याच्या बाबतीत जागरुक असले पाहिजे, असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक दहावी प्रमुख संतोष गजलवार यांनी केले. स्वागत परिचय व सूत्रसंचालन लक्ष्मी चव्हाण व आभार राहुल नेटके यांनी व्यक्त केले.



याप्रसंगी माता-पिता पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पर्यवेक्षक कृष्णा मारावार, पर्यवेक्षक माधव मठवाले, पर्यवेक्षक किरण नेमट, दहावी प्रमुख संतोष गजलवार, सहप्रमुख दिलीप पाटील तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षकांनी परीश्रम घेतले.

जान्हवी देशमुख यांच्या कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

# चाकूर येथे रमजान ईद उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१ एप्रिल -**

चाकूर येथील इदगाह मैदानावर सोमवार दि.३१ मार्च रोजी सकाळी रमजान ईदची नमाज मुस्लिम बांधवांनी अदा केली. विविधेत एकता हे आपल्या देशाचे वैशिष्ट्ये आहे. यामुळे हिंदू मुस्लिम, सिख इसाई हम सब भाई-भाई असा अनोखा संदेश ईद निमित्त आज देण्यात आला.

चाकूर येथील इदगाह मैदानावर मुस्लीम बांधवानी रमजान ईदची नमाज पठण केली. यानंतर हिंदू बांधवांनी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. इदगाह मैदानावर लहान मुले, तरूण, वयोवृध्द मुस्लिम बांधव उपस्थित होते. ३० मार्च रोजी सायंकाळी चंद्रदर्शन झाले आणि ३१ मार्च सोमवारी रमजान ईद साजरी करण्यात आली. आणी अल्लाकडे प्रार्थना करण्यात आली. माणसाला सुखी कर, मानवाला क्षमा कर, अशी प्रार्थना मानवजातीसाठी, आरोग्यसाठी दुवा मागण्यात आली. यावेळी ईदगाह मैदानावर नगराध्यक्ष कपील माकणे, बालाजी सुर्यवंशी, भागवत फुले, युवराज पाटील, शिवदर्शन स्वामी, अनिल वाडकर, सागर होळदांडगे, राम कसबे, शिवशंकर हाळे, संदीप शेटे, सजंय पाटील, नरसिंग गोलावार, चिंतामणी सिरसाठे आदींनी मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सरपंच नागरगोजे यांच्यासह अनेकांचा भाजपत प्रवेश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** आमदार रमेश कराड यांच्या नेतृत्त्वावर विश्वास ठेऊन रेणापूर तालुक्यातील दवणगाव येथील सरपंच रवींद्र नागरगोजे यांच्यासह अनेकांनी लातूर येथील भाजपच्या संवाद कार्यालयात सोमवारी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

भाजपचे नेते आमदार रमेश कराड यांच्या माध्यमातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील विविध गावात विशेषत: रेणापूर तालुक्यातील दवणगाव येथे विविध विकासकामांना मोठ्या प्रमाणात निधी मिळाला आहे, अनेक विकासकामांना गती मिळाली आहे.

शासनाच्या वैयक्तिक लाभाच्या विविध योजनांचा गरजू आणि पात्र बहुसंख्य लाभार्थ्यांना लाभ मिळाला. दवणगाव येथे सध्या होत असलेली विकास कामे लक्षात घेऊन आणि भविष्यात या कामांना अधिक गती मिळावी यासाठी आमदार कराड यांच्या नेतृत्त्वावर विश्वास ठेवून सरपंच रवींद्र नागरगोजे यांच्यासह अनेकांनी भाजपत प्रवेश केला.

यावेळी भाजप किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रम शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, विधी आघाडीचे मनोज कराड, तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, मुरढवचे सरपंच लक्ष्मण यादव, घनसरगावचे शरद दरेकर, दवणगावचे श्रीमंत नागरगोजे, सांगवीचे परमेश्वर जाधव, गुणवंत जोगदंड, बावचीचे नरेश चपटे, संतोष चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सरपंच रवींद्र नागरगोजे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य रविकांत नागरगोजे, उध्दव नागरगोजे, किशन नागरगोजे, मुकुंद नागरगोजे, महादेव नागरगोजे, राम काळसे, शिवाजी नागरगोजे, नागनाथ नागरगोजे, विभिषण नागरगोजे, बाळासाहेब नागरगोजे आदिंची उपस्थिती होती.



**संक्षिप्त वृत्त...**

### शाळांच्या गुणवत्ता मूल्यांकनासाठी तिसऱ्यांदा मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखड्याबाबतची माहिती भरण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने तिसऱ्यांदा मुदतवाढ दिली. तीनवेळा मुदतवाढ देऊनही शाळा गुणवत्ता मूल्यांकन भरण्याकडे कानाडोळा करीत असल्याची बाब समोर आली आहे.
विशेषत: सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांनी स्वयं मूल्यांकन करून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने वेबसाईटवर टॅबवर स्क्रेटि डाटा नावाने स्वयं मूल्यांकनासाठीची लिंक उपलब्ध करून दिली आहे. याबाबत प्रथम पंधरा मार्च, नंतर ३१ मार्च अशी दोनवेळा मुदतवाढ देण्यात आली होती. आजपावेतो शंभर टक्के शाळांनी स्वयं मूल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण झालेली दिसून येत नाही. त्यामुळे शाळांचे स्वयं मूल्यांकन करण्यासाठी आता १० एप्रिल २०२५ पर्यंत तिसऱ्यांदा मुदवाढ देण्यात आली आहे. शिक्षण उपसंचालक, डाएट, शिक्षणाधिकाऱ्यांनी आपल्या विभागांतील सर्व व्यवस्थापनांच्या शाळांचे स्वयं मूल्यांकन नोंदणी व पुर्तता करावी, अशी दक्षता घेण्यास राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालकांनी बजावले आहे.

### विश्वस्त परिषद व कार्यशाळेचे लातुरात आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** राज्य शासनाच्या शंभर दिवसांच्या कृती आराखड्याच्या निर्देशानुसार तसेच राज्याचे धर्मादाय आयुक्त अमोघ कलोती यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर धर्मादाय आयुक्त व धर्मादाय वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.२) सकाळी १०.३० वाजता विश्वस्त परिषद व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

लातूर येथील अंबाजोगाई रोडवरील कॉक्सिट कॉलेजमध्ये ही कार्यशाळा होणार असून या परिषद व कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी लातूरचे धर्मादाय सह आयुक्त राजेश अ. सासणे राहणार आहेत. यावेळी धर्मादाय उपायुक्त एच. व्ही. एच. कादरी, सहाय्यक धर्मादाय आयुक्त -१ श्रीमती पी. आर. निकम आणि जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ड. शरद इंगळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या परिषदेत सी.ए. गणेश महापूरकर व पांडुरंग काबरा तसेच ॲड. एस.टी. जाधव व एस. एन. नागरगोजे हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहे. या परिषद व कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे आवाहन कार्यक्रमाचे निमंत्रक व संयोजक यांनी केले आहे.

### शाळांची वेळ सकाळी सात ते सव्वाअकरा करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** उन्हाळ्यामुळे सर्व शाळांच्या वेळा सकाळच्या सात ते सव्वाअकरा या वेळेत कराव्यात, असे पत्र शुक्रवारी शिक्षण संचालकांनी काढले आहे. या पत्राच्या अधारे मराठवाड्यातल्या हिंगोली, नांदेड जिल्ह्यांतील शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळाच्या वेळा बदलल्या. लातूर जिल्ह्यात कधी बदल होणार, याकडे लक्ष लागले आहे.

उष्णतेच्या लाटांमुळे आरोग्यविषयी गंभीर समस्या निर्माण होण्याची संभावना लक्षात घेऊन जिल्हास्तरावरून उष्णतेचा लाटेचा प्रभाव कमी करण्यासाठी संबंधित प्रशासकीय विभाग, महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांनी करावयाच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शक सूचना केल्या आहेत. राज्यात वाढलेल्या उन्हाच्या कडाक्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारा विपरित परिणाम टाळण्यासाठी विविध संघटनांकडून शाळेची वेळ सकाळची करण्याबाबत निवेदन प्राप्त झालेली आहेत. काही जिल्ह्यांनी सकाळ सत्रात शाळा भरविण्याबाबत कार्यवाही केली.

सध्या लातूर जिल्ह्यात शाळांची वेळ सकाळी सव्वाआठ ते दुपारी एकपर्यंत ठेवली आहे. ही वेळ बदलून आता सकाळी सात ते सव्वाअकरा करण्याबाबत शिक्षण संचालकांनी सूचवले आहे. शाळांची वेळ बदल्याबाबत जि. प.च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या मान्यतेने निर्णय घेण्यास संचालकांनी सूचवले आहे. उन्हाळ्यात विद्यार्थ्यांच्या मैदानी, शारीरिक हालचाली टाळाव्यात. उन्हात वर्ग घेऊ नयेत. विद्यार्थ्यांना उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी शिक्षित करावे अशा सुचना देण्यात आल्या आहेत.

## 'जल जीवन'चा १० टक्के लोकवाटा भरण्यास ९२८ गावांचा कानाडोळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** गेल्या २०२१, २२ पासून जिल्ह्यातील ९२८ गावांमध्ये जल जीवन मिशन अंतर्गत कामे सुरू झाली. या मिशनसाठी केंद्र व राज्य सरकारने प्रत्येकी ४५ टक्के निधी दिला. १० टक्के निधी त्या त्या गावांतून लोकवाटा गोळा करून हे मिशन यशस्वी करण्याचे दोन्ही सरकारांनी ठरविले. मात्र, ९२८ गावांपैकी एकाही गावाने अजून स्वत:चा १० टक्के हिस्सा जिल्हा परिषदेकडे भरलेला नाही.

लोकवाटा भरला जात नसल्याने जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागासमोर एक नवा पेच निर्माण झाला आहे. ९२८ ग्रामपंचायतींकडे सुमारे २९ कोटी लोकवाटा थकला आहे. सद्य:स्थितीत ३८३ गावांची जल जीवन मिशन योजना पूर्ण झाली. ही गावे देखील १० टक्के लोकवाटा देण्यास तयार नाहीत. त्यामुळे योजनेच्या पूर्णत्वात अडथळे येत आहेत. शासनाच्या ९० टक्के उपलब्ध निधीतूनच जल जीवन मिशन योजनेची कामे सुरू आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना योजनेचे महत्त्व कळावे, त्याची गरज वाटावी म्हणून १० टक्के लोकवाटा गावांनी भरावा, असा उद्देश ठेवून योजना सुरू केली. हल्ली गुत्तेदारांची बिलं केंद्र आणि राज्य सरकारांच्या ९० टक्के निधीतूनच पेड केली जात आहेत. ग्रामपंचायतींकडील १० टक्के लोकवाट्यासंबंधी सरकार काय निर्णय घेते? याकडे जिल्हा परिषदेचे लक्ष लागले आहे. जल जीवन मिशनमुळे बहुतांश गावांचा पाणी प्रश्न निकालात निघत असल्याने लोकवाटा भरण्याची तत्परता ग्रामपंचायतींनी दाखवावी, अशी अपेक्षा आहे.

लातूर जिल्हा परिषदेंतर्गत जल जीवन मिशनद्वारे ९२८ गावांत कामे सुरू असली तरी आजवर फक्त ३८३ गावांत योजना पूर्ण झाली. यातील १८ गावांतील विहिरी सध्या कोरड्या पडल्या आहेत. विहिरींची खोली ७० फुटांपर्यंतच असल्याचे सांगण्यात येत आहे.



## वाचकांची नाळ काव्य व साहित्याशी जुळली पाहिजे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** येथील संत कबीर प्रतिष्ठान व महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त व संत कबीर प्रतिष्ठान चा रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त त्रैभाषिक कवी संमेलन भालचंद्र ब्लंड बँकेच्या सभागृहात डॉ. रणजीत जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व उद्घाटक कवयत्री व शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, हिंदी चे कवी प्रकाश निहलानी, आशिष नागला, दक्खणी कवी डी. के. शेख, मराठीचे प्रख्यात कवी नारायण पुरी व योगीराज माने, प्रतिष्ठानचे सचिव डॉ. दिलीप गुंजरगे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

उद्घाटन प्रसंगी तृप्ती अंधारे म्हणाल्या, मनुष्याच्या मनात अतृप्त इच्छा आकांक्षेला अंतच नसतो. जीवनात सुखा पेक्षा पुढची आनंद अनुभूती आहे यातच जीवनाची तृप्ती आहे. ही तृप्ती काव्यानंदातुन मिळते. कविता लिहिणे- वाचणे व कविता जगणे याची अनुभूती वेगळी असते. माणसाला कवीते नुसार जगता आले पाहिजे, संत कबीर प्रतिष्ठान वाचकांची नाळ काव्य संमेलनातून साहित्यकांशी जोडत आहे याचा सार्थ अभिमान आहे.

संत कबीरांच्या मानवतावादी विचारा सोबत हिंदी राष्ट्रभाषेचा प्रचार प्रतिष्ठान करत आहे असे संबोधित केले. अकादमीचे सदस्य डॉ. सतीश यादव यांनी, महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीच्या कार्याचा आढावा घेतला. कवी प्रकाश निहलानी यांनी आजच्या समाजाचे वास्तव मांडून हास्य-व्यंग्य कविता सादर करून श्रोत्यांची मने जिंकली. शेतकऱ्यांची आत्महत्या, आजची फॅशन अनेक विषयावर हृदयस्पर्शी कवितेतून मानवी जीवनाच्या वास्तवावर प्रकाश टाकला. कवी डी. के. शेख यांनी दोन कुत्ते ही गजल सादर श्रोत्यांची मने जिंकली.

मराठीचे प्रख्यात कवी नारायण पुरी यांनी, श्रमाचं मूल्य बाजूला ठेवून अपेक्षा ठेवणारी जनता व शासनाची योजनांच्या माध्यमातून होणारी दमछाक याच्यासह स्त्रियांवर विशेषत: बालिकेवर होणाऱ्या अत्याचारा बद्दल चिंता व्यक्त केली. छत्रपती शिवरायांचा महाराष्ट्रात बालिकेवर नराधम अत्याचार करत असतील तर आम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांचा जय जयकार करण्याचा अधिकार कोणी दिला अशा संदेश देणाऱ्या कविता सादर करून रसिकांची दाद मिळवली.

युवा कवी आशिष नागला यांनी कवितांचे भावविश्व श्रोत्या समोर मांडले. कवी योगीराज माने यांनी हिंदी मराठी कवितेच्या माध्यमातून नागरीकांच्या व्यथा मांडल्या.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी डॉ. रणजीत जाधव यांनी कबीर प्रतिष्ठानच्या स्थापनेचा उद्देश विशद करून मागील २५ वर्षाच्या कार्यावर प्रकाश टाकला. प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. प्रभाकर स्वामी व अकादमीचा नंददुलारे वाजपेयी समीक्षा पुरस्कार प्राप्त डॉ. बालाजी भूरे यांचा शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ दिलीप गुंजरगे, सुत्रसंचलन योगीराज माने, विवेक सौताडेकर तर आभार प्रा. राजेश विभुते यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी कबीर प्रतिष्ठानच्या पदाधिका-यांनी परिश्रम घेतले.

## आरोग्य व अध्यात्मिक शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** आधुनिक जिवनशैलीमुळे अनेकांना शारिरिक व मानसिक स्वास्थाचे अनेक विकार होऊ लागले आहेत. शारिरिक व मानसिक स्वास्थ निरोगी राहून विकार दूर व्हावे याकरिता इंटरनॅशनल असोसिएशन फॉर सायंटिफिक स्पिरिच्युअलिझमच्या वतीने लातुरात १० ते १६ एप्रिल या दरम्यान आरोग्य व अध्यात्मिक शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सिध्देश्वर मंदीर परिसरात असलेल्या सिध्देश्वर मंगल कार्यालयात सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिरात अधिकाधिक लोकांनी सहभागी होऊन आपले शारिरिक व मानसिक स्वास्थ निरोगी ठेवावे असे आवाहन प्रसाद कुलकर्णी व डॉ. शिवानंद बिडवे यांनी केले आहे.

सध्याचे युग हे धावपळीचे आहे. यामुळे अनेक जण आधुनिक व चुकीच्या जीवनशैलीला बळी पडत आहेत. त्यामुळे अनेकांचे शारिरीक व मानसिक स्वास्थही हरवले जात आहे. यामुळे अनेक विकारही उद्भवत आहेत. विशेषत: अपचन, बध्दकोष्टता, स्थुलपणा, वाढणारे कोलेस्ट्रॉल, मधुमेह, रक्तदाब, संधीवात यासह हृदयविकारालाही सामोरे जावे लागत आहे.

बदलत्या जीवनशैलीमुळे मानसिक तणाव वाढून चिडचिडपणा, विस्मरण व निराशा आदीने अनेकजण ग्रासले जाऊ लागले आहेत. या सर्व समस्यांपासून समाधान मिळण्यासाठी व निरोगी आरोग्याकरिता इंटरनॅशनल असोसिएशन फॉर सायंटिफिकस्पिरिच्यु अलिझमच्या वतीने श्री रामचरित्र मानस या ग्रंथातील सिध्दांतावर आधारित मानस योगसाधना जीवन पध्दतीबाबत मार्गदर्शन करण्यात येते. या शिबिरात नागरिकांनी मोठ्या प्रमाणास सहभागी व्हावे असे आवाहन प्रसाद कुलकर्णी, डॉ. शिवानंद बिडवे यांनी केले आहे.

## नराधम मास्तरच्या कृत्याने 'नवोदय'ला कलंक : विद्यार्थ्यांवर अत्याचार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** येथील नवोदय विद्यालयातील एका विषय शिक्षकाने सलग तीन महिने तीन महिने तीन विद्यार्थ्यांवर अनैसर्गिक कृत्य केल्याचे चौकशी समितीच्या अहवालात सिध्द झाल्याने त्याच्याविरोधात लातूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरुजींमध्ये स्वत:च्या विद्यार्थ्यांवर अनैसर्गिक कृत्य करण्यापर्यंत विकृती निर्माण होणे शिक्षण व्यवस्थेलाच काळीमा फासणारे आहे. यामुळे लातूरचे नवोदय विद्यालयाच्या गुणवत्तेलाच कलंक फासला गेला आहे.

येथील बारा नंबर पाटीजवळ असलेल्या नवोदय विद्यालयात केंद्रीय बोर्डाचे शिक्षण दिले जाते. मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांनाही केंद्रीय बोर्डाचे शिक्षण मिळावे, यासाठी पाचवी व आठवीतील विद्यार्थ्यांची नवोदय परीक्षा घेऊन त्यांना सहावी व नववीच्या वर्गात प्रवेश दिले जातात. यासाठी अतिशय हुशार विद्यार्थीच या परीक्षेत उत्तीर्ण होतात. नवोदयचे विद्यार्थी म्हटले की, त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळाच असतो. लातूरच्या नवोदय विद्यालयातून आजपर्यंत दर्जेदार शिक्षण देण्यात आले आहे. यामुळे ते विद्यालय नामांकित आहे.

परंतु, येथेही व्यवस्थापनाचे दुर्लक्ष होत असल्याचे वारंवार होत असलेल्या दुर्घटनांवरून सिध्द होत आहे. यामुळे येथे शिक्षण घेण्यास येणारे विद्यार्थी सुरक्षित नाहीत का, असा सवाल उपस्थित होत आहे. ऑक्टोबर २०२४ ते जानेवारी २०२५ या तीन महिन्यांच्या कालावधीत याच विद्यालयातील हिंदी विषयाचा नराधम शिक्षक सोपान राजाराम कळमकर (वय ४९) याने तीन विद्यार्थ्यांवर अनैसर्गिक कृत्य केल्याचे चौकशी समितीच्या अहवालात समोर आले आहे.

त्याच्यावर लातूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलीस विविध बाजुंनी चौकशी करीत आहेत. शिक्षक कळमकर हा दारू पितो. त्याने दारूच्या नशेतच असे विकृत अनैसर्गिक कृत्य केले असावे, असा पोलिसांचा अंदाज आहे. पोलीस विविध अंगांनी तपास करीत आहेत. स्वत:च्या गुणवत्तेवर लातूरने शिक्षणाचा पॅटर्न निर्माण केला आहे. अशा या पॅटर्नमध्ये केंद्रीय बोर्डाच्या एकमेवर शाळेत असे प्रकार सर्रास घडत असल्याचे दिसून येते. या शाळेचे मुख्याध्यापक आजारी रजेवर गेले आहेत. ते काम दुसऱ्याकडे सोपविण्यात आले आहे. मागील सहा महिन्यांपूर्वी पिण्याच्या पाण्याचा हौद उघडाच ठेवण्यात येत होता. त्यात कावळ्यांची विष्ठा पडल्यामुळे सर्वच विद्यार्थ्यांना गॅस्ट्रोची लागण झाली होती. त्यापूर्वीही जेवण निकृष्ट असल्याने तेथील विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. त्यानंतर आता थेट विद्यार्थ्यांवर अत्याचार केल्याने सर्वत्र संताप व्यक्त होत आहे.

## जलयुक्त शिवारच्या दुसऱ्या टप्प्यासाठी लातूरला ११ कोटी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** राज्य सरकारने जलयुक्त शिवार टप्पा दोन सुरू केला असून, जिल्हा परिषदेला जिल्हाधिकाऱ्यांनी विशेष निधी म्हणून ११ कोटी रूपये जलयुक्त शिवारच्या कामास देण्याचे मान्य केले आहे.

जलयुक्त शिवार टप्पा दोनच्या माध्यमातून जिल्ह्यातील १२८ गावांमध्ये विविध प्रकारची कामे केली जाणार आहेत. त्यात पाझर तलावांतील गाळ काढणे, नदी, नाला खोलीकरण, रूंदीकरण तसेच पाणी अडवून जिरवण्यासह अन्य कामे केली जाणार आहेत. मात्र, हे काम करीत असताना शास्त्रशुद्ध पद्धत अवलंबावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. सध्या उन्हाळा सुरू झाल्याने ग्रामीण भागातून पाणी टंचाईच्या तक्रारी येत आहेत. जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत कामे झाली तर त्या त्या गावच्या शिवारात पाणी अडवून ते जिरवण्याचे काम होणार आहे. टप्पा दोनसाठी ११ कोटी आले असले तरी पुन्हा निधी उपलब्ध होणार आहे, असे लातूर जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले. उपलब्ध निधीतून जिल्ह्यातील १२८ गावांत जलयुक्त शिवारची विविध कामे होणार आहेत.

जलयुक्तची कामे करण्यासाठी फक्त दोन महिने हातात आहेत. या दोन महिन्यांत जास्तीत जास्त कामे करून जिल्हा परिसर पाणीदार करण्याचा प्रयत्न आहे. परंतु, कामे शास्त्रशुद्ध पद्धतीने व्हावीत, अशी अपेक्षा लातूर जिल्ह्यातुन व्यक्त होत आहे.

## प्रा. बालाजी पोद्दार यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतनचे स्थापत्य अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. बालाजी शंकरराव पोतदार सेवानिवृत्त होत आहेत त्या निमीत्त त्यांना संस्थेच्या वतीने सत्कार करून निरोप देण्यात आला.

३५ वर्ष ६ महिने सेवेच्या इतक्या प्रदीर्घ कालावधीत त्यांनी हजारो स्थापत्य अभियंते घडवले. अनेकजण देश विदेशात आपले कर्तृत्व गाजवत आहेत. शेकडो विद्यार्थी शासकीय सेवेत उच्च पदावर कार्यरत आहेत. असंख्य विद्यार्थी बिल्डर, कॅान्ट्रॅक्टर व उद्योजक आहेत व अनेकांना त्यांनी नोकरी मिळवून दिलेली आहे.. असे अनेक माजी विद्यार्थी या निमित्ताने उपस्थित होते.

पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन च्या नावलौकिकामध्ये सरांचे महत्वपूर्ण योगदान राहिले. त्यांना निरोप देण्यासाठी माजी प्राचार्य गोपीनाथ पिंपळे, प्राचार्य बलभीम कुंभार, प्राचार्य डॅा. कमलाकर बकवाड , महिला तंत्रनिकेतनचे प्राचार्य सूर्यकांत राठोड, प्रा. रघुनाथ अलियास नंदू कुलकर्णी, प्रा. डॉ. शोभा आर्य, प्रा. सुधीर पोतदार,प्रा हेमंत कुलकर्णी, प्रा. विठ्ठल आवाळे , प्रा. इंद्रजीत आवले यांच्यासह माजी विद्यार्थी महाराष्ट्राच्या विविध भागातून आले होते.

यावेळी चेतन कुलकर्णी, आनंद पंडीत, संजय आयाचित, अजय बोराडे,किरण कोरे, प्रकाश साळुंके, राजेंद्र बिराजदार, ओमप्रकाश थोरमोटे, विनोद शिवशरण, अक्षय माने, रति जोशी, सरोजा जगताप, शुभांगी माळगे, दिप्ती भुरे , ऋग्वेदा कुलकर्णी आदी उपस्थित होते.

## सामूहिक नमाज पठणाने रमजान ईद उत्साहात



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** मुस्लीम बांधवांच्या पवित्र 'ईद-उल-फित्र' अर्थात रमजान ईदनिमित्त येथील ईदगाह मैदानावर सोमवारी (दि.३१) सकाळी मुस्लीम बांधवांच्यावतीने सामूहिक नमाज पठण करण्यात आले. यावेळी मैदानावर उपस्थित राहून मुस्लीम बांधवांची गळाभेट घेऊन हिंदू बांधवांनी ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सामूहिक नमाज पठणमध्ये मौलवींनी 'नफरतों का दौर बंद हो' अशी अल्लाहकडे प्रार्थना केली.

यावेळी आमदार विक्रम काळे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, तहसीलदार सौदागर तांदळे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय शेटे, काँग्रेसचे शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव, प्रा. प्रवीण नाडे, प्रवीण कांबळे यांनी ईदगाह मैदानावर उपस्थित राहून गुलाबपुष्प देऊन मुस्लीम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. पोलीस प्रशासनाने लातूर शहरासह मैदानाबाहेर चोख बंदोबस्त ठेवला होता.

## अनैतिक संबंधातून युवकाचा खून; आरोपीच्या पत्नीनेही घेतला गळफास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ एप्रिल -** अनैतिक संबंधाच्या संशयातून पाचजणांनी ऊस तोडण्याचा कोयता व कत्तीचे सपासप वार करून एका ४० वर्षीय युवकाचा खून केल्याची घटना रविवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास घडली. या घटनेतील सर्वच आरोपींना अटक केल्याशिवाय प्रेत ताब्यात घेणार नाही, असा पवित्रा मयताच्या नातेवाईकांनी घेतल्याने तणाव निर्माण झाला होता.

दरम्यान, सोमवारी (दि.३१) सकाळी या घटनेतील आरोपीच्या पत्नीनेही गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी रात्री उशिरा चौघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयत शरद प्रल्हाद इंगळे हा गावाशेजारील खडी केंद्रावर मॅनेजरचे काम करत होता. त्याच केंद्रावर आरोपीही कामाला होता. त्याला जेवणाचा डबा देणे व इतर कारणाने खडी केंद्रावर त्याच्या पत्नीची ये-जा होती. त्यातच त्यांचे प्रेम संबंध जुळले. तीन महिन्यांपूर्वीही मयत आणि आरोपीची पत्नी गाव सोडून पळून गेले होते.

मागील दोन-तीन दिवसांपूर्वी आरोपीचे काही पाहुणे त्याच्याकडे आले होते. रविवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास शरद इंगळे हा खडी मशीनवर कामाला गेला होता. आरोपीही खडी केंद्राकडे गेले. आरोपींनी कत्ती व कोयत्याने सपासप वार करून शरद इंगळेचा खून केला. घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस निरीक्षक अशोक उजगरे व पोलीस हेड कॉन्स्टेबल बाबासाहेब खोपे, केशव सूर्यवंशी यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. सर्वच आरोपींना अटक करा, अन्यथा मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका नातेवाईकांनी घेतल्याने तणाव निर्माण झाला होता. याप्रकरणी रात्री उशिरा वैशाली इंगळे यांच्या तक्रारीवरून रोहन बाळासाहेब शिंदे, रोहित बाळासाहेब शिंदे, बाळासाहेब भारत शिंदे, गणेश भारत शिंदे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, सोमवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास या घटनेतील आरोपीची पत्नी सखुबाई बाळासाहेब शिंदे (वय ३९) यांनी गळफास लावून आत्महत्या केली. याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.